# माणूस

शनिवार


१७ डिसेंबर १९७७

७५ पैसे


## पाहावे तिकडे दैन्य.
## मूल्यविटंबना.
## तत्वशून्यता.
## संधिसाधूपणा.
## आपली अशी परवड का झाली ?

## एक मुक्त चिंतन

श्री. ना. पेंडसे



# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक एकूणतीस

१७ डिसेंबर १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


माणूस दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या ‘आम्ही आणि बदमाष काळ’ या विनय हर्डीकर यांच्या लेखावरील श्री. प्रभाकर पाध्ये आणि विनय गुणे यांच्या प्रतिक्रिया ३ डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. ही आणखी एक प्रतिक्रिया . . . मुक्त चिंतनात्मक.

# ज्या समाजात साहित्यिकाला, कलावंताला कणा नाही....

प्रिय श्री. विनय हर्डीकर,

‘आम्ही आणि बदमाष काळ’ हा लेख वाचला. आवडला. आपली प्रथम भेट झाली तेव्हा तुमच्यात ‘लेखक’ आहे याची कल्पना नव्हती. एक ‘चाहता वाचक’ म्हणून तुमच्याकडे पाहत होतो. नंतर भेटलो तेव्हा तुमचा एक लेख ‘किर्लोस्कर’ मध्ये वाचला होता. नीटसपणामुळे मला तो आवडला. तुमच्यात लेखकाची ठिणगी असावी असे वाटण्याइतका तो मला आवडला. तुमच्याकडे मी तसे बोललो असेही वाटते. नक्की स्मरण नाही.

‘–बदमाष काळ’ ने लेखक म्हणून तुमच्याविषयीच्या अपेक्षा खूपच वाढवल्या. शिस्तबद्ध विचार आणि भाषाशैली हे या लेखाचे मला जाणवलेले दोन विशेष. त्याही-पेक्षा विशेष असे त्यात आहे ते अधिक महत्त्वाचे. तुमची व्यथा आणि संभ्रम याना तुम्ही अत्यंत हळुवारपणे, संयमाने आणि सामर्थ्याने जिवंत केले आहे. ‘आणीबाणी’ विषयक माझ्या वाचनात आलेल्या लेखांतील मला सर्वांत आवडलेला हा लेख–माझ्या विषयी त्यातील उल्लेख अनुकूल वाटावा असा नाही तरी !

माझ्यावर तुम्ही अन्याय केला आहे असे मला सुचवायचे नाही. आपला संवाद झाला तसाच तुम्ही तो दिला आहे–टेलिव्हिजन-वरील माझ्या मुलाखतीचा उल्लेख वगळता.

वास्तविक माणसाने आपल्या वाट्याला आलेले काम इतरत्र लुडबूड न करता कमाल कार्यक्षमतेने, एकाग्रतेने, इमानाने करावे अशा मनाचा मी. डॉक्टर, इंजिनियर, कारकून, उद्योगपती, हमाल, लेखक वगैरे वगैरेंनी. यामुळे स्वत.चे भले होते. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ‘देशसेवा–देशसेवा’ म्हणून म्हणतात त्याकरिता वेगळा वेळ द्यावा लागत नाही. अशा विचाराच्या माणसाला आणीबाणी-विषयी व्यक्तिशः काहीही वाटले तरी टी. व्ही. वर मुलाखत देण्याची काही गरज होती का ? पण माणूस अशा गफलती अधूनमधून करीत असतो. या दृष्टीने तर या मुलाखतीने मला कालांतराने मनस्तापच दिलाय; पण प्रत्यक्षात मी बोललो त्या दहा मिनिटांपैकी आणीबाणीला दिलेल्या निःसंदिग्ध पाठिं-ब्याची पहिली दोन मिनिटे सोडली तर नंतरची आठ मिनिटे सरळ कापण्यात आली. आपल्यापैकी कोणी माझी मुलाखत ऐकली असली तर ती अचानक ‘तोडली’ गेल्यासारखे वाटले का, अवश्य विचारा. ‘आणीबाणी सर्वप्रथम मंत्र्यांना लावावी, भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात त्या सर्वांना तुरुंग दाख-वावा,’ हा उल्लेख त्यात होताच. शिवाय ‘अराजका’च्या उंबऱ्यावर असलेल्या परि-स्थितीवर अन्य तोडगा दिसत नसला तरी आणीबाणीचे यथार्थ समर्थन सामान्य माण-साच्या जीवनावर ती काय परिणाम करते, यावर अवलंबून राहील–’ वगैरे, असे मी बोललो, ते कापले गेले. याला आज एकमेव

पुरावा ज्यांनी माझ्या घरी येऊन मुलाखतीचे रेकॉर्डिंग केले ते. 'खाजगी' रित्या ते याचा पाठपुरावा करतील—त्यांना करावा लागेल. पण अधिकृतरीत्या ? रेकॉर्डिंग करणारापैकी माझ्या एका अ—मराठी मित्राला चिडून मी विचारले,

'व्हाय डिड यू चीट मी सो शॅविली ?'

असो. हे सर्व तुमच्याकडे बोललो होतो. त्याचाही उल्लेख तुम्ही लेखात करायला हवा होता. की मी यासंबंधी तुमच्याकडे काही बोललोच नाही ?

आणीबाणीच्या संदर्भात 'लोकशाही आणि विचारस्वातंत्र्य' या दोन शब्दांचे उल्लेख येणे अपरिहार्य असते. तुमच्या लेखातही ते आले आहेत. आपल्या देशाच्या संदर्भात या शब्दांची नव्याने तपासणी करण्याची वेळ आली आहे.

आणीबाणीने विचारस्वातंत्र्याचा हक्क हिरावून घेतला हें निश्चच. विचार देण्यासारखं आमच्या विचारवंताकडे काही असो—नसो, स्वातंत्र्य राहिले पाहिजे; पण त्याचबरोबर एक विषण्ण करणारा विचार येतो. स्वातंत्र्यानंतर तीस वर्षे आम्ही हे स्वातंत्र्य भोगले. या काळात आमच्या विचारवंतांनी कोणते विचार दिले की, ज्यांची गळचेपी होती तर गुदमरायला झाले असते ? लोकहितवादी, महात्मा फुले आणि आपल्यात वावरत होते ते र. धो. कर्वे, यांनी आजही ज्याना मोठे स्थान आहे, असे विचार समाजाला दिले. त्याकरिता किंमत मोजली. या संदर्भात फ्रँक मोरेस यांनी 'इंडियन एक्सप्रेस' मध्ये लिहिलेल्या एका लेखाचे स्मरण होते. त्या लेखाचा आरंभ होता— 'हाऊ इज इट दॅट ए नेशन ऑफ सिक्स हंड्रेड मिलियन्स इज बिइंग गव्हर्न्ड बाय ए बंच ऑफ डफर्स !' बंच ऑफ डफर्स ! आजच्या शासनाच्या संदर्भातसुद्धा हे विधान करायला संकोच वाटू नये ! रशियन विचारवंताची मुस्कटदाबी झाली तेव्हा साऱ्या जगाला धक्का बसला. जर्मन विचारवंताची हिटलरने मुस्कटदाबी केली तेव्हा असाच धक्का बसला. विचार देणारे जेव्हा जबरदस्त असतात तेव्हाच असा धक्का बसतो. साहित्य, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र सर्वच क्षेत्रात बदलत राहणाऱ्या काळाकरिता नवे विचार हवे असतात. त्याचा अभाव जीवघेणा असतो. ते 'इंपोर्ट'करता येत नाही. त्याला परिस्थितीतून, मातीतून नव्या विचाराचे घुमारे फुटावे लागतात. फक्त असे विचार समाजाची धारणा करीत असतात. ते नसले की प्रवास चालतो तो सुकाणू नसलेला. गेल्या शतकात असे 'देशी' विचार समाजाला किती मिळाले याला काहीच महत्त्व नाही का ?

आणीबाणीने लोकशाही नष्ट केली. मनात विचार येतो, या देशात मुळात 'लोकशाही' होती का ? जिथे पैशान पोत्यावारी मते विकत घेता येतात, त्याकरिता काळा पैसा उपलब्ध होतो, अशी लोकशाही नष्ट झाली ! अल्पसंख्याकांच्या मताकरिता जातीय दंगे माजविण्यात आले, असा तर जाहीर आरोप एका मुसलमान नेत्याने केला. आगामी विधानसभेच्या निवडणुकीत यादवी माजेल, असे जाहीर आश्वासन जबाबदार नेत्यानी आधीच देऊन ठेवले आहे. या निवडणुकीत घराना आगी लागल्या, मुडदे पडले तर आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही 'मेलास तरी चालेल— मते द्या' या शासनपद्धतीला 'लोकशाही' म्हणून स्वत:ची वंचना आपण किती दिवस करून घेणार आहोत ?

विचारस्वातंत्र्य, लोकशाही यांची या देशात अक्षरश: विटंबना झाली. असे का झाले ? आपण कशाकरिताच किंमत मोजलेली नाही—मोजावी लागली नाही म्हणा—या वस्तुस्थितीत या शोकांतिकेचे मूळ आहे. टीचभर आयर्लंडने सांडलेले रक्त, सध्या दक्षिण आफ्रिकेत निग्रो सांडीत असलेले रक्त याचा नुसता हिशेब मांडला तरी साठ कोटींच्या देशाला किती सांडायला हवे होते, याकरिता त्रैराशिक मांडायची गरज पडणार नाही. अनेक लोकमान्य, दादाभाई नौरोजी, नेहरू, गांधी, नेताजी फासावर जायला हवे होते, लक्षावधींचे रक्त सांडायला हवे होते, अनंत संसार उध्वस्त व्हायला हवे होते, हजारो स्त्रियांची भर चौकातून अब्रू निघायला हवी होती. (ते कार्य जमेल तेवढे आम्ही स्पृश्य मंडळी स्वातंत्र्यात करीत आहोत.) नागवे सत्य पाहायचे असेल तर ते हे आहे; पण आमचे थोर नेते आज इसवी सन १९७७ मध्ये आम्हाला सांगतात की, रक्ताचा थेंब न सांडता महात्माजींनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले ! माणसाने स्वत:ला आणि इतराना फसवायचे म्हणजे किती ? साहेबाला राज्य करणे झेपेनासे झाले. म्हणून त्याने आपल्याला राजीखुषीने स्वातंत्र्य दिले. त्यात आपल्या पराक्रमाचे श्रेय नावापुरते !

सारेच हक्क आपल्यावर किंचितही तकलीफ न पडता 'लादले' गेले. १९२० सालापर्यंत अमेरिकन स्त्रीला मतदानाचा हक्क नव्हता, १९२६ पर्यंत ब्रिटिश स्त्रीला तो हक्क नव्हता. दोघींना त्याकरिता वर्षानुवर्षं रक्त आटवावे लागले. प्रौढ मतदानाची कथा तशीच आहे. आम्ही भारतीय मात्र भाग्यवान ! १९५० च्या २६ जानेवारीला आम्हाला हे सर्व हक्क मिळाले—म्हणजे काय मिळाले, याचा मूठभर लोक सोडले तर इतरांना पत्ताही नव्हता !

झगडा करून, रक्त सांडून वस्तू मिळविली तरच त्याचं महत्त्व कळतं. त्याहीपेक्षा म्हणजे 'राष्ट्रीय चारित्र्या'ची घडण होत जाते. ही वस्तूच आज आपल्याकडे नाही. असं बोलण्याची मात्र सोय नाही. साराच मामला सस्ता असल्यामुळे तळमळीच्या पुढाऱ्यानं कळवळून काही सांगितलं, तर तत्काळ घोषणाची लक्तरं चढवून तो संदेश होता की नव्हता केला जातो. 'आराम हराम है',ची पत्रकं गल्ली-बोळापासून चिकटवून मुक्त मनाने माणूस घरी आराम करायला मोकळा होतो.

राष्ट्रीय चारित्र्य नाही म्हणजे किती नसावे ? आर्. एस्. एस्. ही या देशातील एकमेव बलिष्ठ, विराट, शिस्तबद्ध संघटना. संघाचा स्वयंसेवक गणवेष चढवून संघस्थानावर उपस्थित होतो तेव्हा तो एक आदर्श नागरिक असतो. (इथे मला तात्त्विक मतभेद अभिप्रेत नाहीत.) काही वर्षांपूर्वी मुंबईत संघाचा एक प्रचंड मेळावा भरला होता. प्रत्येक स्वयंसेवकाकडे 'पाहुणे' वाटून दिलेले होते. माझ्या भावाचे चार स्वयंसेवक पाहुणे आमच्याकडे जेवायला आले. त्यातले दोन भंगी, दोन चांभार ! त्या दिवशी माझं पोट न जेवताच भरलं.

पण हाच स्वयंसेवक पँट-बुशशर्टमध्ये वावरतो तेव्हा तो माझ्यापेक्षा किंचितही वेगळा नाही असं आढळून येते. लग्न करताना इतरांप्रमाणेच मुलीच्या बापाकडून ठोकून हुंडा

वसूल करतो, इतराप्रमाणेच खोटे इन्कमटॅक्स रिटर्न्स भरतो, इतर डॉक्टरांप्रमाणेच हा आदर्श स्वयसेवकही पेशंटला नको असलेली इंजेक्शने, औषधे चारतो, लग्न करताना जातीची बंधने तंतोतत पाळतो—ही विधाने मला आलेल्या अनुभवावरून करीत आहे.

संघ ही सर्वात प्रभावी संघटना म्हणून ते नाव सर्वप्रथम नजरेसमोर आलं. सर्वत्रच असा प्रकार. जात फक्त वेगळी. आयत्या पीठावरील कोणी शंकराचार्य अस्पृश्यतेला शास्त्रात आधार असल्याचं आव्हान देतो आणि हे आव्हान स्वीकारतो कोण ? विश्वास ठेवा, ठेवू नका—आव्हान स्वीकारते युक्राद-सारखी एक युयुत्सु संघटना ! या संघटनेतील अनेकांना मी जवळून पाहिल आहे. सामाजिक अन्याय, विषमता यांनी अक्षरशः पेटलेली पोरं पाहिली की, एकीकडे जीव सुखावतो, एकीकडे त्याचा हा दिशाहीन त्याग पाहून चित्त अस्वस्थ होतं. 'युक्राद' संघटना निखाऱ्यासारखी आहे. इथली प्रत्येक व्यक्ती अस्सल नाणं. आग दिसली की बेछूट उडी घेणारे. अशा संघटनेचे नेते एका शंकराचार्यांचे आव्हान स्वीकारायला धावतात—अस्पृश्यतेला शास्त्राधार नाही हे सिद्ध करण्याकरिता ! कोण हे आचार्य ? अस्पृश्यतेचं बेशरम समर्थन करणाऱ्या माणसाच्या बैठकीवर बसणं हा जिथे अपमान वाटायला हवा तिथे 'युक्रांद' नेते अस्तन्या सावरून आव्हान स्वीकारतात आणि या शंकराचार्यांने खरोखरच पुराव्यांचं मडकं तुमच्या गळ्यात अडकवलं तर? असलं दृश्य पाहिलं की, वर्मी घाव बसावा त्याप्रमाणे फ्रँक मोरेस यांचे शब्द डोळ्यापुढे चमकतात. 'अ बंच ऑफ डफर्स !'

आशेला कोठे जागाच दिसत नाही. राजकारण हे तर बोलून चालून 'हरामखोरांचं अखेरचं आश्रयस्थान.' पण साहित्यिक जगात तरी वेगळं काय दिसतं ? मंत्री म्हणजे परब्रह्म ! इतरांचं ठीक आहे; पण साहित्यिकसुद्धा सामील ! मंत्र्यापुढे लाचार मुद्रेनं वावरणारे साहित्यिक, यापेक्षा घृणास्पद दृश्य कोठलं नसेल; पण दुर्दैवान ते दृश्य पाहावं लागतं. मंत्र्याकडून टिचकी वाजली की साहित्यिक धावतो. का रे बाबा ? तुला काही प्रतिष्ठा नाही का ? इतर कोणी असं 'घिसाडी' आमंत्रण दिलं तर जाशील का?

मंत्र्यांनी साहित्यिकाचं पाणी केव्हाच जोखलं आहे. त्यांना काही तासांच्या नोटिशीनं बोलवा, निरोपानं बोलवा, 'सायक्लोस्टाईल'नं बोलवा — साहित्यिक धावत सुटणार, याविषयी त्यांची खात्री असते. आमचे साहित्यिकही त्यांच्या या विश्वासाला सहसा दगा देत नाहीत. ज्या समाजात साहित्यिकाला, कलावंताला कणा नाही त्या समाजाला काही तरी रोग जडला आहे, असा निष्कर्ष बिनधोक काढा. समाज केवढ्या अपेक्षेनं, प्रेमानं साहित्यिकांकडे, कलावंतांकडे पाहत असतो ? समाज-मनात आपली काही प्रतिमा आहे, ही प्रतिमा इतर सर्व प्रतिमांपेक्षा वेगळी आहे आणि या प्रतिमेशी इमान राखणं ही आपली एक जबाबदारी आहे, असं काही अपवाद सोडले तर कोठे दिसतच नाही. 'कणाहीन साहित्यिक' हा वास्तविक वदतो व्याघात; पण कसलं काय नि कसलं काय !

साहित्यिकांच्या या वृत्तीमुळेच संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड चक्क 'निवडणूक पद्धती'ने केली जाते. यात कोणाला काही वावगं वाटत नाही. वस्तुत. 'अध्यक्षपद' हा साहित्यिक जीवनातला सर्वोच्च मान, एवढ्या प्रतिष्ठेची बाब असायला हवी. सर्वानुमते या मानाची माळ आपल्या श्रेष्ठ आणि ज्येष्ठ साहित्यिकाच्या गळ्यात पडायला हवी. 'हा थोर मान या वर्षी कोणाला मिळणार?' म्हणून उत्सुकता निर्माण व्हायला हवी.

पण इथं पाहावं तर विपरीत प्रकार. आमचे श्रेष्ठ साहित्यिक हातात कंदील घेऊन चक्क 'कॅनव्हासिंग'ला बाहेर पडणार. वेळ रात्रीची म्हणून कंदील. 'मतदार' हमखास घरी भेटावा म्हणून वेळ रात्रीची. यात कोणाला खेद नाही, खंत नाही; पण जिथे कणाच नाही तिथे खेद, खत यांनी कशाच्या बळावर उभं राहावं ? प्रतिष्ठेची चाड असणारा साहित्यिक या 'माना'च्या आसपास फिरकणार नाही, इतक ओंगळ स्वरूप या मानाच्या निवडणुकीला आल आहे. अरेरे ! अध्यक्षपदाच्या या निवडणुकीला ग्रामपंचायतीच्या निवडणुकीइतकीसुद्धा शान राहू नये ना ?

पाहावं तिकडे दैन्य. मूल्यविटंबना. तत्त्वशून्यता. सधिसाधूपणा आपली अशी परवड का झाली ? परवड झाली असे आपल्याला कोणी सांगत का नाही ? अनेक प्रश्न—एक उत्तर : 'मोफतचं मिळालं, हाण सावळ्या.' कॉम्प्लिमेंटरीवर नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकाच्या खास काही अपेक्षा नसतात तसा हा मामला आहे. 'जनतेचे हक्क', 'विचारस्वातंत्र्य', 'लोकशाही', साऱ्यांचे आपण कॉम्प्लिमेंटरी उपासक आहोत. असे हे किती दिवस चालणार ?

इतिहासापासून आम्ही काही शिकायलाही तयार नाही. पुण्यात पंतप्रधानाविरुद्ध झालेली ओंगळ निदर्शने, एका माजी पंतप्रधानांना अटक झाली म्हणून 'जनतेचा उद्रेक' या गोंडस नावाखाली देशभर झालेली जाळपोळ, राजकीय पक्षातील एकात्मतेचा अभाव, अस्पृश्यांच्या वाट्याला येणारे अमानुष अत्याचारसुद्धा स्वतःच्या पक्षाकरिता राबवले जाण्याचा निर्लज्जपणा — अस्पृश्यांच्या वाट्याला येणारा अमानुषपणा हा वस्तुतः प्रत्येक स्पृश्याला शरमेने मान खाली घालायला लावणारा; पण तिथेसुद्धा प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याची वृत्ती !

मला भीती वाटते की, अशा वृत्तीमुळे पुन्हा एकदा देश अराजकाच्या उंबऱ्यावर येईल, काळाने सूड घ्यावा त्याप्रमाणे जनता-पक्षाला आणीबाणी पुकारावी लागेल आणि त्या आणीबाणीला मला पुन्हा पाठिंबा द्यावा लागेल. फक्त टी. व्ही. वर देताना विचार करीन, एवढाच फरक !

असो. तुमच्या लेखाच्या निमित्ताने मी हे पत्र लिहिले. कदाचित मूळचा संदर्भही सुटला असेल; पण अनेक दिवस ज्या विचारानी कोंडमारा होत आला त्यांचा उच्चार केल्यामुळे थोडेसे हलके वाटत आहे. हे विचार तुमच्यावर लादले गेले असल्यास क्षमस्व.

आपला

**श्री. ना. पेंडसे**

---

## महाडचा मुक्तिसंग्राम प्रा. कुरुंदकर आणि श्री. टिपणीस

---

संपादक 'माणूस'

महाडच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजातील प्रा. राम विवलकर आणि प्रा. झुबरलाल काबळे या दोघांनी लिहिलेले

'महाडचा मुक्तिसंग्राम' हे पुस्तक नुकतेच माझ्या वाचनात आले.

पुस्तक मला खूपच आवडले. कारण त्यातील ऐतिहासिक माहिती प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या आधारे मांडलेली असून लेखकद्वयानी इतिहासाचे सत्यस्वरूप मांडण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. हे पुस्तक वाचीत असताना मी पन्नास वर्षापूर्वीच्या लढ्यात प्रत्यक्ष गेलो. तो रोमहर्षक लढा पुन्हा एकदा लढलो. त्याचा अनुभव घेतला. प्रत्यक्ष डॉक्टरसाहेबांना भेटलो. त्यांच्याशी बातचीत केली. माझ्या इतर सवंगड्यांना भेटलो. त्यांच्याशी बोललो. डॉक्टरसाहेबांनी आमच्यात निर्माण केलेला जोष अनुभवला. मला चित्रे भेटले. सवादकर भेटले. मोरे भेटले. अनेक जुने सवंगडी भेटले आणि मी तरुण बनून हातात बंदूक घेऊन विरोधकांवर धावलो.

लेखकद्वयानी आणि तुम्ही मला पुन्हा तरुण होण्याची जी संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे आणि हे पुस्तक तितक्याच सुंदर प्रकारे प्रकाशित केल्याबद्दल आपले आणि प्रा. काबळे व प्रा. बिवलकर यांचे अभिनंदन करतो.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावर सुप्रसिद्ध चवदार तळ्याचे चित्तवेधक छायाचित्र आहे. आतही बाबासाहेबाचे, २० मार्च १९२७ ला ज्या शहाबहिरीच्या घाटावरून ते तळ्यात उतरले त्या घाटाचे, २६ डिसेंबर १९२७ ला जिथे मनुस्मृती दहन केली त्या भूमीचे, छायाचित्र आपण दिले. त्यामुळे पुस्तकाच्या एकूण स्वरूपात चांगलीच भर पडली आहे.

पुस्तकाच्या अंतरंगाबद्दल, त्यातल्या त्यात प्रा. नरहर कुरुंदकर या एका विद्वान व विचारवंत शिक्षणतज्ज्ञाने जी प्रस्तावना लिहिली तिच्याबद्दल मी माझे विचार मांडणार आहे. ही संपूर्ण प्रस्तावना नि:पक्षपाती व विश्लेषणात्मक आहे. त्याबद्दल प्रा. कुरुंदकरांचेही मी हार्दिक अभिनंदन करतो.

संपूर्ण प्रस्तावनेबद्दल योग्य-अयोग्य अभिप्राय देणे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे. म्हणून इथे मी संपूर्ण प्रस्तावनेबद्दल लिहिणार नाही. कुरुंदकरांनी माझ्या संदर्भात पान सोळावर पुढील प्रश्न उपस्थित केले आहेत त्याबद्दलच लिहिणार आहे. कुरुंदकर लिहितात—'पहिली बाब म्हणजे सुरबा टिपणीस नगराध्यक्ष होते. त्यांनी २४ सालचा ठराव २७ सालापर्यंत अमलात येऊ न देता राहू कसा दिला? दुसरे म्हणजे जेव्हा नगरपालिकेने आपला ठराव महाडच्या मार्च अधिवेशनानंतर रद्द केला, त्या वेळी टिपणीस नगराध्यक्ष होते, पुढेही नगराध्यक्षच राहिले त्यांनी नगराध्यक्षपद का सोडले नाही?'

आज माझे वय ७९ वर्षांचे आहे. पन्नास वर्षापूर्वी मी एक तिशीच्या आतील तरुण होतो. त्या काळी असलेल्या माझ्या स्थितीचा मागोवा घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

महाडसारख्या एका खेडेगावी राहणारा मी त्या घटनेच्या काळी एक जबाबदार नागरिक होतो. कौटुंबिक अवस्थेमुळे माझ्यावर प्रापंचिक जबाबदाऱ्या पडल्या होत्या; पण अशाही स्थितीत माझ्याभोवती जे सामाजिक व राजकीय वातावरण होते, त्यात माझा स्वाभाविक कल सामाजिक कार्याकडे वळला. त्याकाळी महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये जहाल आणि नेमस्त किंवा प्रागतिक विचारसरणीचे कार्यकर्ते असे दोन गट होते. त्या काळच्या वैचारिक संघर्षातील 'नेमस्त' विचारसरणीची छाप माझ्यावर अधिक होती व मी त्याच विचारसरणीकडे वळलो.

या भूमिकेतून सार्वजनिक जीवनाकडे पाहात असतानाच महाड नगरपालिकेचे अध्यक्षपद मजकडे आले. गतकालाकडे आणि त्या वेळच्या कार्यपद्धतीकडे नजर टाकली असता आचार-विचारात आज खूपच फरक पडला आहे.

१९२४ साली चवदार तळे सार्वजनिक असल्याचा ठराव मीच पास करून घेतला व १९२७ साली ते सार्वजनिक नसल्याचा ठराव माझ्या विरोधाला न जुमानता नगरसेवकांनी माझ्या समक्ष पास करून घेतला. या घटनेमुळे मी 'राजीनामा का दिला नाही, असा रास्त प्रश्न प्रा. कुरुंदकर विचारतात.

१९२४ साली ठराव पास झाल्यानंतर ज्या घडामोडी घडत गेल्या त्या लक्षात घेतल्यास या प्रश्नाचे उत्तर सापडेल, असे वाटते. प्रथम ठराव पास होताना कुणीही विरोध केला नव्हता. कारण त्यातून असे काही घडेल याची कुणालाच कल्पना नव्हती; पण १९२७ च्या सत्याग्रहामुळे नगर सेवकावर प्रचंड सामाजिक दडपण आले. तो दोष समाजाचाही नव्हता, त्या परिस्थितीचा होता. बरेच नगरसेवक परिस्थितीपुढे नमले व त्यानी स्वत:च पास केलेला ठराव मागे घेतला! पण हा ठराव मागे घेत असताना त्यानी माझ्यावर अविश्वास दाखविला नाही किंवा तुम्ही राजीनामा द्या, असा आग्रहही धरला नाही. सामाजिक प्रबोधनाची ती प्राथमिक अवस्था होती. राजीनामा देणे हा प्रकार त्या वेळी रूढ नसावा, असे मला वाटते. शिवाय ठराव पास करतानाचे नगरपित्याचे मनोधैर्य नंतर त्यांच्यापाशी शिल्लक राहिले नव्हते; पण माझ्यापाशी मात्र ते शिल्लक होते! पुढे घडणाऱ्या घटनाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन निश्चित होता. त्यामुळे मी अल्पमतात आलो तरी बेहत्तर, असे मला वाटले असेल. त्यामुळे कर्तव्यकर्मातून मुक्त व्हायचे नाही, तात्पुरत्या पराजयाने अपमानित व्हायचे नाही, आलेल्या अनंत अडचणींना तोंड देत देतच समाजसेवा करायची, त्याशिवाय समाजाच्या प्रगतीचा जगन्नाथाचा रथ ओढला जाणार नाही असे मला वाटले असेल. म्हणून मी राजीनामा दिला नाही. कळावे,

आपला

सुरेंद्र गोविंद ऊर्फ सुरबा टिपणीस

महाड : दि. २६-११-७७

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## ☐ अटलजी, संघ आणि राजकारण

जनता सरकार सत्तेवर आल्यापासून ज्यांच्या वाट्याला केवळ तारीफ आली आहे अशा मोजक्या मंत्र्यांमध्ये देशाचे परराष्ट्र-खाते सांभाळणाऱ्या अटलजींचा समावेश होतो. देशाचे भावी पंतप्रधान म्हणून ज्याचा अधून मधून नामनिर्देश होतो अशा तीन-चार नेत्यांपैकी ते एक आहेत. संघ-जनसंघ-जनता पक्ष असा प्रवास केलेल्या अटलजींचे संघाच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर गंभीर स्वरूपाचे मतभेद असून नानाजींच्या नेतृत्वा-खाली राजकीय काम करणारी संघाची कडवी मंडळी आणि अटलजी यांच्यामध्ये तणाव निर्माण झाले आहेत. अशी खमंग बातमी 'ऑन लूकर' ने आपल्या ताज्या अंकामध्ये पुरविली असून खऱ्या-खोट्याची सरमिसळ असलेली चुरचुरीत मुखपृष्ठी-कथा प्रसिद्ध केली आहे.

संघवाले, संघाचे बाळकडू घेतलेले आणि संघामध्ये उशिरा आलेले यामध्ये नेहमीच भेद करतात अटलजी यापैकी दुसऱ्या गटात बसतात. संघाशी संबंध येण्यापूर्वी अटलजी कम्युनिस्ट स्टुडंटस् फेडरेशन या संस्थेचे सभासद होते. संघामध्ये आल्यावरही ते डाव्या विचारसरणीचे म्हणूनच ओळखले जात. जवाहरलालजींबद्दल वाटणारा आदर त्यांनी जाहीररीत्या व्यक्त केला होता. त्यामुळे परिस्थिती अर्थातच अधिक गुंता-गुंतीची झाली; परंतु राजकीय नेत्याचा डौल वाढविणारे उमदे व्यक्तित्व, अटलजींना चौफेर व्यासंग, त्यांचे उच्च शिक्षण आणि श्रोत्यांना संमोहित करणारे त्यांचे वक्तृत्व या त्यांच्या गुणांच्या वाढत्या प्रभावाबरो-बरच त्यांचे जनसंघामधील स्थान बळकट होत गेले. अटलजींच्या खाजगी आयुष्याबद्दल बरेच बोलले जाते. 'जनसंघ-संघ आणि बलराज मधोक' या पुस्तकाच्या लेखकाला बलराजजी म्हणाले, 'मी संघवाल्यांना सांगितले- 'एक तर तुम्ही त्यांचे नेतृत्व फुलवू नका आणि तसे ते फुलवायचे असले तर त्यांच्या खाजगी आयुष्याबद्दल चर्चा करू नका. अटलजींची व्यक्तिगत कोंडी करण्याचा उद्देश असेल तर गोष्ट वेगळी. अन्यथा या दोन्ही गोष्टी तुम्ही एकाच वेळी करू शकत नाही.' अटलजी या खाजगी कुजबुजीला मोठी भीक घालतात अशातला भाग नाही. या संदर्भात टीका करणारांना त्यांनी असे उत्तर दिल्याचे समजते-'मी अविवाहित असलो तरी ब्रह्मचारी नाही.'.

### राजकीय साठमारी

अटलजींनी देशाच्या परराष्ट्रमंत्रिपदाची सूत्रे घेतल्यानंतर ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला अभिप्रेत असलेले धोरण अंमलात आणतील असे संघवाल्यांना वाटत होते; परंतु प्रत्यक्षात अटलजींनी जुन्या धोरणाचा पुरस्कार करून संघवाल्यांना धक्का दिला. संघवाल्यांची अशी अपेक्षा होती की, अटलजी संघाची विचारधारा पकडून कारभार करतील रशियाविरोधी आणि अमेरिकेला अनुकूल असलेली तटस्थता, इस्राएलच्या बाबतीत क्रियाशील सहानुभूतीचे धोरण आणि पाकला जरब बसेल असा आक्रमक पवित्रा अटलजींनी घेतला असता तर संघ-वाल्यांना ते आवडले असते; पण अटलजींनी तटस्थतेचा पुरस्कार केला, रशियाबरोबरील स्नेह-संबंधाचे गोडवे गाइले, अरब-इस्राइल-वादामध्ये तेलाच्या ताकदीवर उभ्या अस-लेल्या अरबांना सहानुभूती दाखविली आणि पाकचे आम्ही भले चिंतितो, अशी ग्वाही दिली. अटलजी संघाच्या बाबतीत डोळस आहेत. नानाजी संघ प्रमाण मानणारे आहेत. त्यांच्या या भूमिकांमुळेच दोघामध्ये तणाव निर्माण होतो.

'दारूबंदीच्या धोरणाबाबत पंतप्रधानांनी अटलजींना थोडे परखडपणे सुनावले असले तरी पंतप्रधान अटलजींना मानतात आणि त्यांच्या कामावर ते खूष आहेत. स्वामी सुब्रह्मण्यम् म्हणजे जरा तेज बुद्धिमत्तेचे राज-नारायण. त्यांनी देशाच्या परराष्ट्रीय धोरणा-वर टीका-टिप्पणी केली. परिणामी त्यांची चीन-भेट त्यांना रद्द करावी लागली. आज तरी अटलजी संघाच्या कडवट प्रचाराला भीक घालीत नाहीत. संघवाले तर असेही म्हणतात की, परराष्ट्र मंत्रालयावर ताबा मिळविण्याऐवजी अटलजी मंत्रालयामधील सनदी नोकरांच्या ताब्यात गेले आहेत. अट-लजी या कुजकट टीकेकडे दुर्लक्ष करून तटस्थ धोरणाचा हिरीरीने पुरस्कार करतात. मागच्या शासनाचेच धोरण पुढे चालू ठेवण्यात काय मतलब, असा प्रश्न कोणी विचारलाच तर ते म्हणतात, 'जुनेच धोरण मी राबवितो. कारण ते देशहिताचे आहे असे मला प्रामा-णिकपणे वाटते. शिवाय ते धोरण देशाचे होते. कोणा व्यक्तीचे अथवा पक्षाचे नव्हे. आपल्या देशाचे जास्तीत जास्त हित हेच माझ्या परराष्ट्रधोरणाचे सूत्र आहे'

संघाची सूत्रे संभाळणाऱ्या नागपूरच्या नेत्यांना परराष्ट्रमंत्र्यांचे धोरण मान्य नसले तरी ते टोकाची भूमिका घेणार नाहीत. स्वतःच्या लोकांच्या बाबतीत त्यांचे धोरण तसे लवचिक असते. अटलजींनीही संघ-वाल्यांना राम राम केलेला नाही. संघाचे सामर्थ्य त्यांनी वाढविले आहे, अनुभविले आहे. त्यामुळेच सध्या निर्माण झालेला दुरावा ही कायमची अवस्था नाही. अटलजींची लोकप्रियता, त्यांचे विद्यमान मंत्रिमंडळामधील स्थान आणि बदललेल्या परिस्थितीमधील त्यांचे भवितव्य या प्रत्येक गोष्टीवर संघ आपला हक्क सांगेल आणि कोणी सांगावे कदाचित त्यांना पंतप्रधानपदीही नेऊन बस-वील! संघाच्या एकदर राजकारणाशी ही गोष्ट सुसंगतच मानावी लागेल. ☐

## ☐ शेकापक्षाचा मेळावा आणि स्वप्ने !

महाराष्ट्रामध्ये सत्तांतर येऊ घातले आहे, असे जनता पक्षाच्या एस्. एम्. ना जेवढे वाटते तेवढेच 'शेकाप'ला वाटते, इतकेच नाही

पृष्ठ २९ वर

# काँग्रेस

## बंगलोर ते बंगलोर

वा. दा. रानडे

काँग्रेसमधील १९६९ मधल्या फुटीला बंगलोरपासून सुरुवात झाली आणि बंगलोरमुळेच म्हणजे कर्नाटकमुळेच पुनः मोठी फूट पडत आहे. हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत फुटीची अधिकृत घोषणा झालेलीही असेल किंवा पुनः डागडुजीचा प्रयत्न होऊन ती थोडी लांबली तरी फूट आता अटळ आहे. दक्षिण भारतातील तीन राज्यात आणि ईशान्य भारतात दोन महिन्यानी व्हावयाच्या निवडणुकापूर्वीच ही फूट पडत आहे. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेस पक्ष सावरला तर नाहीच; पण या फुटीमुळे तो जवळ जवळ नष्टप्राय होणार आहे. उत्तर भारत आम्ही गमावला तरी दक्षिण भारत आमच्या हाती आहे अशी फुशारकी काँग्रेस नेते मारीत होतेच, दक्षिण भारतापैकी तामिळनाडू तर त्याच्या हातून गेलाच. केरळमध्येही कम्युनिस्टांच्या आधाराने त्यानी सत्ता टिकविली आहे; पण आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्रात काँग्रेस निश्चित सत्ताभ्रष्ट होणार हे या फुटीमुळे स्पष्ट झाले आहे.

कर्नाटक हे निमित्त असले तरी १९६३ च्या फुटीप्रमाणेच या वेळच्या फुटीच्याही सूत्रधार इंदिरा गांधीच आहेत ! नवा पक्ष काढताना काँग्रेसमधील बहुमत आपल्यामागे आहे व आपलीच काँग्रेस खरी आहे असा दावा केल्याने आपणास अधिक पाठिंबा मिळेल असा त्याचा होरा. अध्यक्ष रेड्डीना अध्यक्षपदावरून दूर करून स्वतः अध्यक्ष होण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या खास बैठकीची मागणी करून मागणीपत्रावर बहुसंख्य सभासदाच्या सह्या मिळविण्याचे नाटक त्यानी त्यासाठीच केले; पण हे खरे बहुमत नाही, हे त्यांचे त्यांनाही माहीत होते म्हणूनच आपली मागणी त्यांनी त्या वेळी धसास लावली नाही कर्नाटकच्या प्रश्नावर शनिवारी काँग्रेस कार्यकारिणीत चर्चा झाली त्या वेळी उपस्थित वीस सभासदात १० विरुद्ध १० असे दोन समान गट पडले. अनुपस्थित कृष्णचंद्र पंत इंदिरा गटाचेच आहेत हे लक्षात घेता कार्यकारिणीत आमचे बहुमत आहे, असा दावा इंदिरावाद्यांनी मांडला आहे. कार्यकारिणीचे बहुसंख्य सभासद आमच्या बाजूला, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे बहुसंख्य सभासद आमच्या बाजूला, तेव्हा खरी काँग्रेस आमचीच आहे असा देखावा इंदिरा गटाने निर्माण केला आहे.

वास्तविक कर्नाटक पेचप्रसंगावर तयार करण्यात आलेला पाच कलमी तोडगा मुख्य मंत्री अरस यांना अनुकूल होता. उमेदवारनिवडीत प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष के. एच. पाटील याच्यापेक्षा अरस याच्या सल्ल्याला अधिक महत्त्व दिले जाणार होते. केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत कर्नाटकचे उमेदवार निवडले गेले, त्या वेळी श्री. अरस यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्याविरुद्धची शिस्तभंगाची कारवाई मागे घेण्यात आली होती. के. एच. पाटील अध्यक्षपदी रहाणार होते खरे; पण त्यांच्या हाती सत्ता काही राहणार नव्हती. असले नामधारी अध्यक्षपद मला नको असे म्हणून वास्तविक पाटील यांनीच या तोडग्याविरुद्ध बंड करायला हवे होते, पण शिस्त म्हणून कार्यकारिणीचा निर्णय मानण्याचे त्यानी ठरविले.

कार्यकारिणीने हा तोडगा मान्य केला तो इंदिरा गटास मान्य नव्हता तर त्याच वेळी त्या गटाच्या सभासदानी त्याला विरोध का केला नाही ? कदाचित त्या बैठकीत आपल्यामागे बहुमत नाही असे त्याना दिसून आले असावे, म्हणून ते गप्प बसले आणि रात्री इंदिरा गांधीच्या निवासस्थानी भरलेल्या बैठकीत या तोडग्याला सुरुंग कसा लावावयाचा याचा बेत शिजला. श्री. अरस यानी चव्हाण व त्रिपाठींना पाठविलेले पत्र आणि त्याना भेटण्यास दिलेला नकार हा बचाव त्या बैठकीत ठरला असला पाहिजे. मग अरस उघडपणे काहीही म्हणोत.

कर्नाटकप्रमाणेच इतर राज्यातील काँग्रेसअंतर्गत वाद इंदिरा गांधीच्या सल्ल्याने आणि त्याचे समाधान होईल अशा पद्धतीने मिटवावेत, अशी इंदिरासमर्थकाची मागणी असल्याचे अरस त्यांच्या पत्रात म्हटले आहे. केवळ काँग्रेसमधील वाद मिटविण्यातच नव्हे तर उमेदवारनिवडीत इंदिरा गांधीना महत्त्वाचे स्थान हवे होते. याचा अर्थ बहुसंख्य उमेदवार त्यांच्या पसंतीचेच निवडले जातील, हे त्याना मान्य करून घ्यावयाचे होते; पण एक नेत्या (एकमेव नेत्या नव्हे) म्हणून त्याच्या मताचा योग्य विचार केला जाईल यापलीकडे अधिक कोणतेही आश्वासन अध्यक्ष रेड्डीनी दिले नाही व तो त्याचा निर्णय लोकशाही कार्यपद्धतीच्या दृष्टीने योग्यच होता. बहुसंख्य सभासदाना आपल्या बाजूला वळवून आपल्या मनाप्रमाणे निर्णय लावून घेण्याचा लोकशाही मार्ग इंदिरा गांधीना खुला होता. आपण अध्यक्ष नसलो तरी बहुसंख्य सभासद आपल्यालाच मानतात, हे सिद्ध करण्याची वास्तविक त्याना संधी होती. लोकशाही मार्गाने त्या काँग्रेसच्या नेत्या बनू शकत होत्या. तो त्याचा मार्ग कोणी अडविला नव्हता; पण माझाच शब्द मानला गेला पाहिजे, हा त्याचा हुकुमशाही आग्रह कोण चालू देईल ? इंदिरा गांधीची मनोवृत्ती व पिंड लोकशाहीवादी नाही. लोकशाहीची भाषा त्या बोलत असल्या तरी सहकाऱ्याशी विचारविनिमय करून निर्णय घेण्याची त्याची कार्यपद्धती नाही. स्वत:च सर्व निर्णय घ्यावयाचे आणि इतरानी त्यापुढे मान डोलवायची, अशाच पद्धतीने त्या १९६६ पासून नव्हे तरी १९६९ पासून काम करीत आल्या. १९७७ च्या लोकसभा-निवडणुकीत पतप्रधानपद गेले. काँग्रेसमध्येही महत्त्वाचे स्थान राहिले नाही, ही गोष्ट त्याना डाचत होती त्याचे सहकारी त्याना न पटणारे निर्णय घेत होते आणि त्या त्याना रोखू शकत नव्हत्या. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत ज्या संजीव रेड्डीना त्यानी १९६९ मध्ये पाडले त्यांच्याच बिनविरोधी निवडीस काँग्रेस पक्षाने पाठिंबा द्यावा हा त्यांच्यावर काळाचा केवढा सूड होता आणि अगदी अलीकडची त्याना धक्का देणारी घटना म्हणजे बेचाळिसाव्या घटना-दुरुस्तीतील काही कलमे रद्द करण्यास पाठिंबा देण्याचा काँग्रेस पक्षाने घेतलेला निर्णय.

पक्षाचे नेतेपद आपल्याकडे येत नसेल तर

पृष्ठ ११ वर

मुख्यमंत्र्यांची भूमिका

# ' कर्मचारी तरी मरतील किंवा आम्ही तरी मरू ! '

माहितगार

राज्य सरकारी तसेच निमसरकारी मिळून नऊ लाख कर्मचारी केंद्रीय दराने महागाईभत्ता मिळावा म्हणून दंड थोपटून आंदोलनाच्या मैदानात उतरले आहेत. या संपाचा शेवट काय होणार ? कर्मचारी ही लढाई यशस्वी होईपर्यंत लढणार की यशस्वी माघार घेण्याची तयारी ठेवणार ? हे प्रश्न संपाला सुरुवात होत असतानाच सोडविण्याची आवश्यकता आहे. कामगार काय किंवा कर्मचारी काय, यांचे संप बारगळून जाता कामा नयेत. संप बारगळण्याने कामगारांची ताकद खच्ची होते. व त्यातून वैफल्य येते. चळवळीचा कणा मोडतो आणि पिळणाऱ्याची ताकद आणखी वाढते. यासाठी संप सुरू करीत असताना तो बारगळणार नाही, याची काळजी घेऊनच लढविला पाहिजे. १४ डिसेंबरपासून कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. त्याआधी त्यांनी ७ डिसेंबर रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप करून आपल्या ताकदीचे प्रदर्शन केले आहे. कर्मचाऱ्याचा संप म्हटला की; सरकार ग्रामीण विरुद्ध शहर असा वाद उपस्थित करते. फोडा-झोडाचीच नीति सरकार अवलंबीत असल्याने ते हा वाद खेळत असते. गरीब, भोळ्या, अज्ञानी जनतेला सरकारचा दावा खरा आहे, असे वाटू लागते.

केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांना ज्या दराने महागाई-भत्ता देते त्याच दराने आम्हाला महागाई भत्ता मिळावा अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. इतर बहुतेक सर्व राज्यांनी या दराने महागाई-भत्ता दिलेला आहे. महाराष्ट्र सरकारनेच ही मागणी मान्य केलेली नाही. राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे आम्हाला कर्मचाऱ्यांची मागणी पुरी करता येत नाही, ही सरकारची भूमिका आहे. सरकारविरुद्ध विधानसभेत पावसाळी अधिवेशनाच्या वेळी अविश्वास-ठराव मांडला तेव्हा अर्थमंत्री यशवंतराव मोहिते यांनी इतर राज्यांपेक्षा इतकेच काय, केंद्रापेक्षासुद्धा आमची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याची शेखी मिरविली होती. याचा अर्थ सर्व पैसा कर्मचाऱ्यांच्या पगारावरच वाटून टाकावा असा नव्हे; परंतु सरकारकडे पैसा नाही हे खरे नाही. सरकार म्हणते, नोकरशाहीवर दिवसेंदिवस अधिक खर्च होत आहे, हे खरेच आहे; परंतु विकसनशील देशामध्ये ते अपरिहार्य असते. विकासाच्या अनेकविध योजना विकसनशील देशांना हातात घ्याव्या लागतात. त्यामुळे या योजना पार पाडण्यासाठी यंत्रणा वाढत असते. वाढत्या यंत्रणेवर खर्चही वाढत असतो. याचा अर्थ कर्मचाऱ्यांच्या पगारासाठीच तिजोरी रिकामी होत असते असे मानण्याचे कारण नाही. लोकशाहीत पक्ष-कार्यकर्ते शासनयंत्रणा चालवीत नाहीत. पक्षीय हुकूमशाही असलेल्या देशात विकासयोजना पार पाडताना येणारा खर्च व आपल्याकडील योजना पार पाडताना येणारा खर्च, यात फरक आहे. त्यामुळेच विकास-कामे काढली की त्या प्रमाणात नोकऱ्यांचे प्रमाण व त्यावरील खर्चाचे प्रमाणही वाढणे स्वाभाविक आहे. म्हणून पगारापोटी खर्च होणाऱ्या रकमेचे आकडे देऊन भागणार नाही. पगारावरील आकड्यांची रक्कम नुसतीच पाहू लागलो तर नोकरशाही सरकारचा खजिना रिकामा करीत आहे असे वाटेल.

## ग्रामीण विरुद्ध शहरी वाद

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून प्रशासनावर महसुली खर्चाच्या तुलनेने किती खर्च झाला हे पाहिले पाहिजे. ६१-६२ साली प्रशासनावर १६·६० टक्के खर्च झाला तर १९७४-७५ मध्ये कर्मचाऱ्यांच्या भत्त्याचे प्रमाण १२·९९ टक्के झाले आहे. वेतनमूल्याच्या अवमूल्यनामुळे विसंगत वाटणारी टक्केवारी, ही वस्तुस्थिती आहे. हा अर्थशास्त्राचा किचकट विषय आहे. सरकार आणखी एक मुद्दा उपस्थित करते. तो म्हणजे शहर विरुद्ध ग्रामीण ! आकडेवारी सरकारचे हेही म्हणणे लंगडे ठरविते. एकूण दहा लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी आहेत. त्यापैकी ८० हजार पोलीस आहेत. उरलेल्या सुमारे पावणेदहा लाख कर्मचाऱ्यांपैकी ग्रामीण भागात मोडणारा कर्मचारीवर्ग साडेचार लाखांचा आहे. महानगरपालिका असणाऱ्या शहरात दोन लाख कर्मचारी आहेत, तर लाखाखाली लोकसंख्या असलेल्या शहरात एक लाख कर्मचारी आहेत. पन्नास हजार ते एक लाख लोकवस्तीच्या शहरातही एक लाख कर्मचारी आहेत. पंधरा ते पन्नास हजाराच्या गावात सव्वा लाख व ग्रामीण भागात साडेचार लाख कर्मचारी आहेत. म्हणजे शहरी भागातील लोकांची ही मागणी आहे, हा सरकारचा दावाही अत्यंत पोकळ आहे. त्यामुळे ग्रामीण व शहर हा कोंबडी झुंजविण्याचा प्रयत्न सरकारने करू नये. तसेच दहा लाखांपैकी लाख-सव्वा लाख कर्मचारी म्हणजे, १०-१२ टक्के कर्मचारी कारभारात (थोडक्यात खुर्चीत बसून काम करणारे) गुंतलेले आहेत. बाकीचे ९० टक्के कर्मचारी जिल्हा परिषद, शेतीविकास, आरोग्यसेवा अशासारख्या कल्याणकारी कामात गुंतलेले आहेत.

एवढ्या मोठ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्यावर शहरी हा शिक्का मारून महागाई भत्त्याची त्यांची मागणी नाकारणार काय ? महागाई भत्त्याचा प्रश्न आला की कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेची चर्चा सरकार करते. सरकारचे हे म्हणणे कोणीच नाकारणार नाही; पण कार्यक्षमता वाढावी म्हणून सरकारचे काय प्रयत्न असतात ? जे सरकार कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवू शकत नाही, ते सरकार तरी कार्यक्षम आहे, असे कसे म्हणावयाचे ?

## तडजोडीची भूमिका

केंद्राप्रमाणे महागाई भत्ता द्यावयाचा नाही, ही सरकारची भूमिका थोडी बदलली आहे. येथून पुढे केंद्र सरकार ज्या दराने भत्ता देईल त्याप्रमाणे आम्हीही देऊ, अशी भूमिका राज्याने घेतली आहे पुढच्या तारखेचा चेक गरजूच्या हातात द्यावा तसा हा प्रकार आहे. राज्य सरकार केंद्राने दिलेल्या मागच्या तेरा वाढी कर्मचाऱ्यांना देण्यास तयार नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे समाधान झालेले नाही. पुढच्या तारखेचा चेक व तेरा वाढीपैकी काही देण्याची भूमिका सरकारने घेतली तरी तडजोडीसाठी वाव राहू शकेल.

नाही तरी सरकारने छत्तीस कोटी रुपयांच्या मागण्या देण्याचे ठरविले आहेच ना! मग तेरा वाढीपैकी काही वाढी देण्याची भूमिका का घेता येऊ नये? कर्मचारी केंद्राप्रमाणे महागाई भत्ता मागतात व सरकार म्हणते पगारापोटी आमची एकूण रक्कम केंद्रापेक्षा जास्त आहे. यापुढे केंद्राने महागाई भत्ता वाढविला तर राज्य सरकारही त्याच दराने महागाई भत्ता देणार आहे. या निर्णयामुळे केंद्र व राज्य-कर्मचारी यांच्या वेतनात फरक राहणारच आहे. शंभर रुपये मासिक पगार असलेल्या कर्मचाऱ्याला केंद्र ११५ रु. महागाईभत्ता देते तर राज्य सरकार ८३ रु. देते. समजा, यापुढे केंद्राने १० रुपयानी महागाई भत्ता वाढविला तर शभर रुपये पगार असलेल्या केंद्रीय कर्मचाऱ्याचा महागाईभत्ता १२५ रुपये होईल व राज्य सरकारी कर्मचाऱ्याचा महागाईभत्ता ९३ रुपये होईल. म्हणजे राज्य व केंद्र याच्या कर्मचाऱ्यांतील महागाई भत्त्यात फरक कायमच राहणार आहे. शिवाय राज्य सरकार म्हणते, एकूण पगाराचा विचार करता केंद्रापेक्षा आम्ही अधिक पगार (पेपॅकेट) देतो. राज्याच्या चपराशाला मूळ पगार, महागाई भत्ता व सुधारित वेतन मिळून ३१९ रुपये ५५ पैसे मिळतात तर केंद्राच्या शिपायाला ३३३ रुपये ९० पैसे मिळतात. केंद्राच्या व राज्याच्या समकक्ष कर्मचाऱ्याला केंद्रापेक्षा १४ रु. ३५ पैसे पासून ८४ रु. ३५ पैशांपर्यंत कमी पगार मिळतो. हा आकड्यांचा घोळ आहे. 'स्टॅटिस्टिक्स इज प्रॉस्टिट्यूट' असे म्हटले जाते. म्हणूनच सरकारने तडजोडीची भूमिका ठेवली पाहिजे.

आज सरकारने ही भूमिका घेतली आहे असे मंत्रिमंडळाच्या ७ डिसेंबर ७७ च्या बैठकीतील विधानावरून वाटत नाही. या बैठकीत मुख्यमंत्री वसतराव पाटील म्हणाले, 'आता वाटाघाटी-बिटाघाटी काही नाही. आम्हाला देता येणे शक्य आहे ते सर्व त्याना दिले आहे आता ते तरी मरतील किंवा आम्ही तरी मरू! पण कोणत्याही परिस्थितीत तडजोड नाही!'

'मंत्र्यानो, तुम्हीही कर्मचाऱ्यांची शिष्टमंडळे घेऊन येऊ नका!' असेही दादा ७ डिसेंबरच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत म्हणाले. आदिवासी कल्याणमंत्री, नाशिकराव तिरपुडे आदिवासी भागात एकाधिकार योजना रद्द केल्यामुळे चिडलेच आहेत. दादांच्या वरील विधानानंतर मंत्रिमंडळ बैठकीत तिरपुडे म्हणाले, 'दादा, अशी अटी-तटीची भूमिका घेऊन कारभार करता येणार नाही. वसतराव याच्या काळापासून असेच चालत आले आहे. कर्मचाऱ्यांशी वाटाघाटी होणार नाहीत असे तेही म्हणायचे; पण शेवटी नाईक वाटाघाटी करीत होते. आम्हाला शिष्टमंडळे घेऊन येऊ नका म्हणून सागता; पण तुम्हीच त्यांच्याशी वाटाघाटी कराल! अहो, त्या कराव्याच लागतात!'

आदिवासी भागात सरकारची एकाधिकार योजना चालू ठेवू नये, म्हणून येणाऱ्यापुढे लोटांगण घालणारे दादाचे मंत्रिमंडळ कर्मचाऱ्याबाबत मात्र 'ते तरी मरतील किंवा आम्ही तरी मरू' अशी भूमिका घेत आहे. □

# रेल्वेअपघात आणि मंत्र्यांचा राजिनामा

वसुधा धागमवार

काही दिवसांपासून रेल्वेअपघाताचे सत्रच सुरू झाल्यासारखे दिसते. रेल्वेमंत्री श्री. मधू दडवते ह्यानी राजिनामा द्यावा असा थोडा-फार ओरडाही परवाच संसदेत काँग्रेस सदस्यानी केला. त्यावर मी राजिनामा देऊ केला होता; पण तो मोरारजीभाईंनी स्वीकारला नाही, असे उत्तरही श्री. दंडवते ह्यांनी दिले. सामान्य नागरिकालादेखील राजिनाम्याचे औचित्य पटत असावे असे दिसून येते. खात्याची जबाबदारी मंत्र्याची असते. Ministerial responsibility च्या तत्त्वाला अनुसरून रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यायलाच हवा. 'लालबहादूर शास्त्रीनी दिलाच होता.' हे ह्या तत्त्वाच्या पालनाचे एकुलते एक देशी उदाहरण!

केन्द्र सरकारचा असा दावा आहे की, हे सर्व अपघात राजकीय घातपातामुळे झालेले आहेत. तसे असल्यास अर्थातच राजीनामा देणे म्हणजे घातपातवाल्यांचा डाव पुरा करणे होईल; पण सरकारचा हा दावा संपूर्ण कबूल करणे कठीण आहे. समजा, काही अपघात हे राजकीय घातपातातून झालेले नाहीत. मग दंडवते ह्यांनी राजीनामा द्यायला हवा का?

संसदेच्या परंपरेत अशा प्रकारच्या राजिनाम्याचा अतर्भाव होतही असेल; पण म्हणून केवळ डोळे मिटून राजीनामा देणे बरोबर आहे का? त्याच्यामुळे काय साधले जाते हे तपासून पहायला हवे. शास्त्रीच्या राजिनाम्याने काय साधले? रेल्वेचा कारभार कुठवर सुधारला? शास्त्रीजींची प्रतिमा उजळली. रेल्वेचे खाते तिथेच राहिले.

अशा प्रकारच्या तात्त्विक राजिनाम्यांनी हितापेक्षा अहित जास्त होते. तत्त्वासाठी राजिनामा दिल्याने मंत्र्यावर कुठलाच ठपका येत नाही. उलट सत्तेला चिकटून न बसण्यासाठी त्याचे कौतुकच होते. अपघात ज्यांच्यामुळे होतात ती माणसे सुटून जातात, ती कारणे दाबून टाकली जातात. एखादा लाइन्समन, एखादा स्टेशनमास्तर वेठीस धरणे म्हणजे काही गुन्हेगाराना शिक्षा करणे नाही. ते बहुधा Scape goats असतात.

रेल्वेची संपूर्ण यत्रणा भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे, हे एक जाहीर सत्य आहे. नैनी अपघाताबद्दल एक वृत्त उत्तर भारतात प्रसिद्ध झाले होते की, नैनीला त्या विशिष्ट जागी मालगाड्या थाबवून लुटण्याचा प्रघात होता. त्या गाड्यांना ठराविक वेळानंतर सिग्नल मिळे व त्या पुढे जात. म्हणजेच टाइमटेबलवर दर्शविलेल्या वेळापेक्षा दोन गाड्यातले अंतर- (वेळ व किलोमीटर दोन्ही) प्रत्यक्षात कमी होते. त्या दिवशी मालगाडी नेहमीपेक्षाही उशीरा गेली. लाइन्समन की सिग्नलमन ह्याने चौकशी न करता हावरा-दिल्ली एक्सप्रेस सोडून दिली व म्हणून अपघात झाला. हे जर खरे असले तर त्या एका कर्मचाऱ्याला शिक्षा करणे अगदीच हास्यास्पद होईल. रेल्वे-पोलिसासकट सगळा कर्मचारीवर्ग सामील असल्याशिवाय हे प्रकार होणे शक्य नाही. नैनी अपघाताची ही मीमांसा काल्पनिक

असण्याचे कारण नाही. उदाहरणार्थ कोळशाच्या 'वॅगन्स कोळसाक्षेत्रापासून ते थेट त्यांच्या निर्दिष्ट स्थानी पोचेपर्यंत भारतभर लुटल्या जातात ह्यात कुठेही शंका नाही. ठरलेल्या मालगाड्या ठराविक जागी सिग्नल न मिळाल्याने रोजच का पडून राहतात हा प्रश्न काही तसा बुचकळ्यात टाकणारा नाही!

माझ्या खात्यात अपयश आले– मग तो चासनालाचा अपघात असो, की पानशेत धरण फुटो, की रेल्वेचा अपघात असो किंवा युद्धात मार खावा लागो– म्हणून मी तत्त्वासाठी राजीनामा देतो (किंवा दुसऱ्याला मागतो) ह्याला अर्थ नाही, तो ह्याचमुळे. राजीनामा अवश्य द्यावा; पण त्याआधी ही सर्व परिस्थिती प्रांजळपणे, आडपडदा न ठेवता मांडून व ती सुधारण्याची माझ्यात कुवत नाही हे कबूल करून थोडक्यात जिथला ठपका तिथे ठेवून मगच राजीनामा द्यावा किंवा मागणाऱ्यांनी मागावा. तीस वर्षांची काँग्रेसची जमीनदारी निस्तरायची असली तर दुसरा उपाय दिसत नाही! □

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ आंध्रच्या आघाडीवर

माझे काही मित्र परवाच आंध्र प्रदेशात जाऊन आले. मित्र तसे प्रामाणिक व सेवाभावी वगैरेही आहेत. थोडी–फार धाडसे करण्याचा शौक आहे. नुकताच आंध्रप्रदेशात वादळाने हाहाःकार उडाल्याचे त्यांनी ऐकले आणि तिथे बऱ्याच स्वयंसेवकांची जरुरी असल्याचे समजले. वर्तमानपत्रातून आवाहने वगैरेही करण्यात आली. तेव्हा साहजिकच आमच्या या मित्र–मंडळीमधला उपजत सेवाभाव जागा झाला. त्यांनी पुण्यातल्या काही ठळक वृत्तपत्र–कचेऱ्यातून चकरा मारल्या. स्वयंसेवक म्हणून आपली मदत देऊ केली; पण त्या वेळी या वृत्तपत्रासमोर कुठलीच ठाशीव योजना नव्हती किंवा दुसऱ्या कुठल्या अशा सामाजिक संस्थांची नावेही त्याना माहीत नव्हती. त्या वेळी फक्त आवाहने करण्याचा काळ असावा.

माझ्या मित्राची काम करण्याची इच्छा प्रामाणिक होती. त्यातून त्यांचा वैद्यकीय पेशाशी थोडा-फार सबंध होता. फक्त अडचण इतकीच होती की, कुठल्याच राजकीय पक्षाशी त्याचा सबंध नव्हता. तेव्हा स्वत:च्या हिंमतीवर त्यांनी आंध्रमध्ये जाण्याचे ठरवले. योजनाही तशी धाडसी होती. आंध्रमध्ये जायचे, तिथले एखादे खेडे निवडायचे आणि गटवार जाऊन या खेड्यात श्रमदान करून त्याचे पूर्ण पुनर्वसन करायचे. या रोमहर्षक मोहिमेवर गेलेले आमचे हे धाडसी वीर परवाच अयशस्वी होऊन परत आले. त्यांच्या अपयशाची खरी–खोटी कारणे काही असोत, त्यांनी सांगितलेले आंध्रमधले काही अनुभव बोलके आहेत. त्यांचा इथे विचार करावासा वाटतो.

आंध्रमध्ये विजयवाडा, अवनीगड्डा या ठिकाणी ते पोहोचले तेव्हा त्यांना आंध्रची, तिथल्या परिस्थितीची कुठलीच कल्पना नव्हती. फक्त कुठेही, कसेही जाऊन कामाला लागायचे. काम करणाऱ्याला सर्व मदत कशीही मिळेल अशी त्याची भाबडी कल्पना. आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी त्यांनी प्रथम सरकारी मदतकेंद्राकडे चौकशी केली; पण गंमत अशी की, कुठलीही माहिती देण्याआधी त्यांना एकच अट घालण्यात आली. ती अशी– 'जर आमच्या बॅनरखाली काम करणार असाल तरच माहिती देण्यात येईल!' आणि दुर्दैवाने या आयत्या वेळच्या प्रश्नाला उत्तर न सुचल्यामुळे त्याना त्या वेळी कुठलीच माहिती मिळू शकली नाही. पहिला दिवस अवनीगड्डामध्ये त्यांनी हात हलवीत काढला. शहराची पाहणी केली. नंतरच्या आंध्रच्या दर्शनानंतर त्यांना एक गोष्ट जाणवली. अवनीगड्डाला प्रत्यक्ष वादळाचा बसलेला तडाखा खूपच सौम्य आहे आणि त्यांचे झालेले नुकसान खूपसे भरून निघालेले आहे. असे असूनही मदतीचा बराचसा ओघ आज अजूनही अवनीगड्डाकडेच वाहतो आहे. यामागचे रहस्य त्यांना उकलू शकले नाही; शहरात हिंडताना त्या रहस्याची थोडी कल्पना आली. आंध्रच्या मंत्रिमंडळातील बरेच मंत्री या भागातले आहेत. एकूण हा भाग मंत्र्यांचा लाडका भाग म्हणून ओळखला जातो. तेव्हा अशा भागाचे नुकसान लवकर भरून निघणे साहजिकच नाही काय? यथावकाश इतर भागांनाही मदत जाईलच. नाही तरी व्हायचे ते नुकसान एव्हाना होऊन गेलेच आहे. थोड्या–फार दिरंगाईने त्यात मोठासा फरक थोडाच पडणार आहे?

अवनीगड्डामध्ये जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे त्या दिवसातही तिथली सर्व सिनेमागृहे भरगच्च गर्दीत चालू होती. तिकिटांसाठी रस्सीखेच होत असे. आता वादळाच्या या आपत्तीनंतर आंध्रमधील तमाम जनतेने सतत दुर्मुखलेले राहावे अशी विनोदी अपेक्षा कुणीच करणार नाही; परंतु इतर भागात आंध्र-मदतीसाठी महाविद्यालयांची संमेलने रद्द होण्याचीही चर्चा चालू आहे. त्या संदर्भात हा प्रकार थोडासा विचित्र वाटतो.

माझ्या मित्रांनी अखेर शरणागती पत्करून काही दिवस सरकारी छत्राखाली वैद्यकीय मदतीचे काम केले. तिथला सुखद अनुभव मात्र ते चवीने सांगतात. झोपायला सुंदर गाद्या, सकाळी कॉफी, ब्रेकफास्ट, साडेनऊला कामासाठी बाहेर पडणे, जवळच्या आरोग्य-केंद्रावर जाऊन बरीच औषधे घेणे आणि कुठल्याही एखाद्या खेड्यात जाऊन ती कशीही वाटून टाकणे. संध्याकाळी सरकारी गाडीतून परत येणे आणि दोन वेळा जेवण. हा एकूण दिवसाचा कार्यक्रम. औषधवाटपाच्या कामाचीही गमत और वाटली.

कितीही आग्रह केला तरी समाजसेवक डॉक्टर्स कित्येकदा वादळग्रस्त भागाच्या अतरंगात पाऊल ठेवत नसत. गुडघाभर चिखल तुडवत जाणे त्यांना अशक्य वाटे. त्यामुळे मर्यादित भागातच वैद्यकीय मदत वारंवार पोहोचत असे. तेच तेच निरोगी पेशटस् दररोज वेगवेगळ्या डॉक्टरांकडून जरूर नसताना औषधे घेत राहात. त्यातून डॉक्टरांच्या प्रत्येक पथकाने दररोज कमीत कमी शंभर तरी रोगी तपासावेत अशी अपेक्षा असे. त्यामुळे संख्या भरविण्यासाठी नेहमीच जे मार्ग अवलंबिले जातात, त्यांचा वापर होणे ओघानेच आले. या गडबडीत साध्या डोकेदुखीसाठी काही रोग्यांना दोन महिन्यापर्यंत पुरतील एवढ्या व्हिटॅमिनच्या गोळ्यांचा साठाही दिला गेला. औषधांच्या या वाटपामध्ये बऱ्याच वेळा एकच निकष वापरला गेला–'बरोबर आणलेली सर्व औषधे संपलीच पाहिजेत,' या निकषाच्या पूर्ततेसाठी अशा गोष्टी अपरिहार्यच होत्या. बाकी मदतीचा ओघ इतर भागांकडून येतोच आहे. तेव्हा तो असा वाटला गेला तर बिघडते कुठे ?

याउलट संघाच्या बॅनरखाली काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची परिस्थितीच वेगळी आहे. असा आराम त्यांच्या नशिबी नाही. सरकारी सेवकाइतके गाड्यांतून हिंडणे त्याना जमत नाही. मोटारीतून स्वयंसेवक हिंडविणे ह्या प्रकारात बराच सरकारी पैसा खर्च होतो. ते संघाला शक्य नाही. माझ्या मित्रानी फक्त एकच दिवस संघाच्या मदत-केंद्रावर काढला आणि तेथील एकच जेवण खाऊन काढता पाय घेतला. असे जेवण खाऊन दिवसभर काम करणे अशक्य आहे असा त्याचा दावा आहे. फक्त बॅनर बदलल्यामुळे तेथील स्वयसेवकाच्या परिस्थितीत एवढा फरक पडतो, मग सामान्य जनतेला मदतीचे वाटप नि.पक्षपातीपणाने होईल ही शक्यता थोडी कमीच वाटते.

बाकी आंध्रमधील परिस्थिती खूप वाईट आहेच. वादळाच्या तडाख्याचे हृदयद्रावक वर्णन माझे मित्रही करतात. फक्त या मदत-कार्याविषयीचा त्यांचा आणखी एक अनुभव थोडा नमुनेदार वाटतो.

हा अनुभव पुण्यातल्या एका नामवत संस्थेने पाठविलेल्या मदत-पथकाचा आहे. एक मोठा रिलीफ फंड उभारून हे पथक आंध्रला आले होते. या पथकाबरोबर माझे मित्र एक दिवस हिंडले. त्याची स्वत:ची मेटॅडोर गाडी होती आणि त्यातून मंडळी मनसोक्त हिंडत असत. या प्रवासातलीच ही हकीकत आहे. पथकाचे आंध्रमधील भ्रमण जवळ जवळ संपत आले होते. सारी प्रसिद्धी पुरेशी झाली होती. आता फक्त एकच त्रुटी पथकाच्या प्रमुखाला जाणवत होती. पथकाने अजून एकही प्रेत जाळले नव्हते. त्यामुळे प्रमुखाचा एकच धोशा सारखा चालू होता. आजच्या आज एक प्रेत शोधून काढा. ते मी जाळणार ! आपण या दहनाचा एक फोटो काढू या. दुर्दैवाने ते तेव्हा ज्या कोरड्या भागात फिरत होते तिथे प्रेत मिळण्यासाठी फारच झगडावे लागले. अखेर बऱ्याच प्रयासाने एक प्रेत सापडले. मग ते प्रमुखाच्या हस्ते विधिपूर्वक जाळले गेले. त्याचा विधिपूर्वक फोटो निघाला. त्याची बातमी तयार झाली आणि प्रमुखाचा जीव शात झाला !

यानंतर उत्साहाच्या भरात पथकाच्या काही तरुणांनी आणखी एक प्रेत जाळले. तेव्हा मात्र त्यांना तबी देण्यात आली–'एक प्रेत जाळायचे होते, ते जाळून झाले आहे. तेव्हा आता उगीच वेळ न घालवता परत फिरा बघू !' अशा रीतीने हे मदत-पथक कार्य करून परत फिरले. याच पथक-प्रमुखाची आणखीही एक गोष्ट सांगतात. आंध्रला आल्यासरशी नागार्जुनसागर आणि इतर काही प्रेक्षणीय स्थळे पाहण्याची त्यांची मनस्वी इच्छा होती. असे करण्याची काही स्वयंसेवकाना लाज वाटत होती; पण यावर प्रमुखाचा एकच प्रश्न कायम होता, इतक्या लाब पुन्हा फुकटात थोडेच यायला मिळणार आहे ?

माझ्या मित्राचे हे अनुभव त्याचे व्यक्तिगत म्हणायला माझी हरकत नाही; पण ते लक्षणीय आहेत हे मात्र नक्की ! हे अनुभव कदाचित बरेच अस्पष्ट आणि vague वाटतीलही; पण ते प्रामाणिक आहेत हेही अगदी नक्की !

शेवटी मदतीचा आपला प्रयत्न अर्धवट सोडूनच माझ्या मित्रांना परत फिरावे लागले. स्वतंत्र खेडे घेऊन श्रमदान करावे तर आर्थिक बोंबाबोंब. कुणाच्या तरी बॅनर-शिवाय कुठलीच मदत मिळणे शक्य नाही. अगदी पार जेवणाचीसुद्धा वाताहत होण्याची शक्यता. सरकारी बॅनरखाली काम करावे तर तिथला आराम बोअर करणारा. खेड्यात लोकांना प्यायला पाणी मिळण्याची मारामार आहे आणि अशी परिस्थिती असताना आपण दोन वेळा पोटभर जेवून फक्त मनसोक्त गोळ्या वाटाव्यात ही जाणीव टोचणी देणारी. कुठल्याच राजकीय पक्षाच्या बॅनर-खाली काम करण्याची इच्छा नाही. कारण राजकीय बांधिलकी नको. कुठल्या प्रसिद्ध संस्थेच्या मागे धावावे तर त्यांची अशी फोटोसाठी मोहीम निघालेली. अशा वातावरणात परत फिरण्याशिवाय गत्यतरच नव्हते असे माझे मित्र म्हणतात आणि म्हणूनच त्यानी आंध्रच्या आघाडीवरून यशस्वी माघार घेतली. तरी या अयशस्वी आंध्र–मोहिमेचे फायदे काही थोडे नव्हेत. उद्ध्वस्त आंध्र जवळून पाहायला मिळाला. उपटली गेलेली झाडे, कणा मोडलेले खांब, होत्याची नव्हती झालेली खेडी वगैरे वगैरे आणि या दु:खाबरोबर काही समाजसेवकाचे नमुने- फोटोसाठी लढणारे, मजा मारणारे, आंध्र–मोहिमेचे हेही फलित काही थोडे नाही ! □

## कॉंग्रेस : पृष्ठ ७ वरून

नवा पक्ष काढावा, हा विचार गेले काही महिने इंदिरा गांधींच्या मनात येऊ लागला होता आणि त्याच मार्गाने जाण्याचे त्यांनी आता ठरविले असल्याचे दिसते. महाराष्ट्र कॉंग्रेसलाही याची झळ लागल्याशिवाय राहणार नाही शकरराव चव्हाणाच्या नेतृत्वाखाली एक गट कॉंग्रेसबाहेर यापूर्वीच पडला असून त्याने महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस स्थापन केली आहे. आता इंदिरा गट बाहेर पडून कॉंग्रेस आणखी खिळखिळी होईल. महाराष्ट्रात इंदिरा गटाला किनपत पाठिंबा मिळेल ? बॅ. अतुले, नाशिकराव तिरपुडे, वसंत साठे ही मंडळी त्यांच्या बाजूची आहेत. माजी मुख्य मंत्री वसंतराव नाईक यांचाही इंदिरा गांधीकडे कल आहे, असे म्हटले जाते. आणखी कोण त्यांच्या बाजूला वळतात, हे काही दिवसांतच स्पष्ट होईल. पण या फुटीने कॉंग्रेस आत्मनाश ओढवून घेत असून जनता व मित्र पक्षांना येत्या विधानसभा निवडणुकीत दक्षिणदिग्विजय मिळविणे त्यामुळे सोपे जाणार आहे. □

आर्थिक टिपणे :

# जकातकर रद्द करावा काय?

नारायण वैद्य, माजी उपमहापौर, पुणे

१९७१ मध्ये जकातकराबाबत नेमलेल्या वानखेडे अभ्यासमंडळाने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे,

'सर्वसामान्यपणे स्थानिक अर्थविकासाला व विशेष करून औद्योगीकरण व रस्तेवाहतूक ह्याच्या प्रगतीला खीळ घालणारा एक प्रकार म्हणजे जकात होय. त्याशिवाय जकातपद्धतीमुळे वेळेचा *अपव्यय* तर होतोच; परतु सबंधिताचा अकारण छळही होतो. ग्रामीण अर्थविकासावर होणारे या कराचे दुष्परिणाम इतके स्पष्ट आहेत की, ते सागण्याचीही जरुरी नाही. ग्रामीण भागातला शेतकरी. आपले जीवन तो कसे-बसे जगत असतो. शेतीमाल विकूनच मुख्यत: त्याला उत्पन्न मिळते. जवळपासच्या भागात किंवा नेहमीच्या बाजारात आपल्याला बरी किंमत मिळेल अशी त्याची अपेक्षा असते; परतु शेतमालाच्या ने-आणीवर एकापेक्षा अधिक स्थानिक स्वराज्यसंस्था जकात आकारतात, शेतकऱ्याच्या उत्पन्नातला मोठा वाटा घेऊन जातात व त्याला दरिद्री ठेवतात. उद्योगधदे आणि कारखाने याच्यावर होणारे जकातकराचे दुष्परिणाम फारच गंभीर आहेत. मालाची तपासणी करून घेण्यासाठी किंवा भरलेली जकात परत घेण्यासाठी जकातनाक्यावर लागलेल्या वाहनाच्या लांबच लाब रांगा, ही आता सवयीची गोष्ट झाली आहे. त्यामुळे सर्वसाधारण वाहतुकीचा मोठ्याप्रमाणावर खोळबा होतो व त्याचबरोबर व्यापारी माल व जीवनोपयोगी वस्तूच्या ने-*आणीला विकसनशील अर्थव्यवस्थेत* अक्षम्य विलब होतो. इतकेच नव्हे तर औद्योगिक व इतर कार्यक्षमतेवरही विपरीत परिणाम होतो. म्हणून सध्याच्या जकातकरपद्धतीतून स्थानिक स्वराज्यसस्थांचा जो काही फायदा होत असेल त्यापेक्षा जनतेचा तोटाच अधिक होतो आणि हा तोटा सहजासहजी लक्षात येत नाही. जकातकराचे समूळ उच्चाटन यापूर्वीच व्हावयास हवे होते. अर्थरचनेच्या प्राथमिक अवस्थेतील राहिलेला अवशेष म्हणून जकातकर होय. आपल्या देशातल्या विकसनशील आणि विस्तारशील अर्थरचनेत या कराला काहीही स्थान नाही.

वरील सर्व वादातीत मुद्द्यांचा विचार केल्यावर आम्ही एका निर्णयाप्रत येत आहोत आणि तो निर्णय म्हणजे, जकातकर रद्द केला जावा हीच आमची खरी शिफारस आहे!'

इंडियन टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटीसमोर निवेदन देताना सर जे. स्टॅम्प यानी असे सागितले की, 'जकातकरपद्धतीत अनेक प्रकारचे दोष आहेत. तात्त्विकदृष्ट्या आणि अनुभवावरूनही माझे असे मत बनले आहे की, जो देश जकातीवर अवलबून राहील त्याची प्रगति होणे शक्य नाही!'

आतापर्यंत जकातकराबाबत ज्या काही कमिट्या नेमण्यात आल्या, त्यापैकी अनेक कमिट्यांनी जकातकराविरोधी मते स्पष्टपणे मांडली आहेत. टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटी (१९२४–२५), मोटार व्हेइकल इन्क्वायरी कमिटी (१९५०), दि टॅक्सेशन इन्क्वायरी कमिशन (१९५३–५४), स्टेट ट्रॅन्स्पोर्ट रिऑर्गनायझेशन कमिटी (१९४९), दि कमिटी ऑफ मिनिस्टर्स ऑन ऑगमेंटेशन ऑफ फायनान्शियल रिसोर्सेस ऑफ अर्बन लोकल बॉडीज् (१९६५), दि कमिटी ऑन ट्रॅन्स्पोर्ट पॉलिसी अँड को-ऑर्डिनेशन (१९६६), दि रूरल-अर्बन रिलेशनशिप कमिटी (१९६६), रोड ट्रॅन्स्पोर्ट टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटी (१९६८) या सर्व कमिट्यानी जकात रद्द झाली पाहिजे, असे मत मांडले आहे.

जकातकरापायी देशाचे व जनतेचे किती नुकसान होते याबाबत काही आकडेवारी काढण्यात आली आहे. जकातकरापोटी १ रुपया जर जमा होत असेल तर वसुलीव्यवस्था, वाहनांचा व त्यावरील सेवकाचा खर्च होणारा वेळ, त्यापायी जळणारे इंधन, त्याचा देशावर पडणारा बोजा ७·२७ रु. पडतो, असे म्हणतात. या हिशेबाने आकडेशास्त्रज्ञांचे म्हणणे असे की, दरवर्षी भारताचे राष्ट्रीय नुकसान ५०० कोटी रुपयाचे होत असावे. जकातनाक्यावर वाहनांचा जो वेळ मोडतो, त्याचा उपयोग मालाची ने–आण करण्यासाठी झाला तर मालवाहतुकीची *कार्यक्षमता* वाढेल व उद्योगधदे–कारखान्यांच्या अर्थचक्राला चांगली गति मिळेल, असेही म्हटले जाते.

वरील सर्व विवेचनावरून असे लक्षात येईल की, जकातकराविरुद्धची ओरड १९२५ सालापासून आहे. असे असताना अजूनही जकातकर रद्द करण्याची शिफारस सरकार अंमलात का आणू शकले नाही? जकातकरामुळे मालाच्या– विशेषत: शेतमालाच्या– किमती वाढतात, असे सागितले जाते. मग जकातकर अस्तित्वात असताना विक्रीकर (Sales Tax) नव्याने अस्तित्वात आणला गेलाच ना? म्हणजे जकातकर कायम ठेवूनही जेव्हा विक्रीकर बसविला जातो, तेव्हा मालाच्या विक्रीच्या किंमती *आणखीनच वाढतात. याशिवाय महाराष्ट्र* सरकारने व्यवसायकर बसविला आहे; शिक्षणकर वाढविला आहे, निवासीकर आहेच, जागेचा सर्वसाधारण कर वाढतोच आहे. यासर्व करांमुळे व्यापारी, कारखानदार याचा व्यवस्थापनखर्च किंवा देखमालखर्च वाढतोच. तो शेवटी मालाच्या किंमतीतूनच काढला जातो, त्यामुळेही मालाच्या किंमती वाढतच आहेत. तेव्हा वानखेडे समितीने जकांतीमुळे भाववाढ होते, असे जे विधान केले– आणि ते खोटे नाही– तरी इतर अनेक कर आहेत की ज्यामुळे भाववाढ होतच आहे.

दुसरे कारण पुढे केले जाते ते असे की, वाहनाचा खोळंबा होतो. रस्त्यावर रांगा लागतात. त्यामुळे वाहतुकीत अडथळा उत्पन्न होतो व वेळेच्या अपव्ययामुळे आर्थिक व कार्यक्षमतेची हानी होते. मला वाटते, या

गोष्टी किंवा हे दोष टाळावयाचे असतील तर त्यासाठी जकातकर रद्द करणे हा उपाय नाही. करवसुलीच्या पद्धतीत सुधारणा करणे अवश्य आहे. नाक्याची सख्या वाढविणे, थेट जाणारी वाहने नेण्यासाठी गावाबाहेरून रस्ते काढणे, जकात वसूल करणाऱ्या सेवकाची सख्या वाढविणे हा त्यावर उपाय आहे. जकातवसुलीबाबत निर्माण होणारा प्रश्न किंवा त्या पद्धतीमुळे होणारे नुकसान याचे मूळ सापडते भ्रष्टाचारात! या सर्व व्यवहारात कमालीचा भ्रष्टाचार आहे. समजा, सर्व व्यापाऱ्यानी वाहनातून जाणाऱ्या मालाच्या किंमतीची चलने नीट (खरी ?) भरली, ट्रकवाल्यांनी (प्रामाणिकपणे ?) ती नाक्यावर दाखल केली आणि नाकेवाल्यांनी 'एन्ट्री'ने घ्यायचे ठरविले तर काय होईल बरे ?

जकातकरासंबंधी संशोधन करून त्याबाबत पर्यायी व्यवस्था काय करता येईल, याविषयी ताबडतोब अहवाल पाठवावा व जकातकर रद्द करता येईल किंवा कसे, याचा गंभीरपणे विचार करावा' अशा सूचना जनता सरकारकडून विविध प्रातिक सरकारांना आलेल्या आहेत, असे कळते; परंतु जकातकराचा प्रश्न स्थानिक स्वराज्यसस्थाच्या अर्थव्यवस्थेशी फारच निगडित आहे हे कोणाच्याच लक्षात आले नाही काय ?

वास्तविकपणे जकातकरापासून मिळणारे उत्पन्न, स्थानिक स्वराज्यसस्थाची अर्थरचना, जमा उत्पादनाच्या बाबी, खर्च, जबाबदारी व कर्तव्य म्हणून पूर्ण करावयाची कामे या सर्वांचा सर्वांगीण अभ्यास होणे जरूर आहे. सोबतच्या कोष्टकात गेल्या १५ वर्षांत पुणे महानगरपालिकेचे एकूण जे उत्पन्न जमा झाले, त्यात जकातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा किती मोठा आहे ते कळेल. एकूण जमेच्या निम्म्यापेक्षा अधिक उत्पन्न जकातीचे आहे. घरपट्टीचे उत्पन्नसुद्धा त्यामानाने कमी, म्हणजे एकूण उत्पन्नाच्या सुमारे २०% आहे. जकातकर रद्द करून तेवढे उत्पन्न प्रातिक सरकार स्थानिक स्वराज्यसंस्थांना देणार अशी मधे बातमी होती व ते सुद्धा फक्त तीन वर्षे देणार! मग इतका मोठा खड्डा भरून काढण्यासाठी स्थानिक स्वराज्यसंस्थांना दुसरा कर तरी बसवावा लागेल किंवा आहे त्या कराची मर्यादा वाढवावी लागेल. पुण्यात काही नवीन मोठ्या इमारतींना ४० टक्क्यापर्यंत पट्टी भरावी लागते ती ६० टक्क्यांपर्यंत वाढविणे शक्य आहे काय ? शिवाय जकातकर रद्द करून त्याला भरपाई प्रातिक सरकार तीन वर्षे देणार असे म्हटले जाते. इतकी मोठी रक्कम सरकारजवळ आज देण्यास आहे काय ? त्यासाठी पुन्हा दुसरा कर बसविणे आलेच. शिवाय पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून सरकार विक्रीकर, शिक्षणकर, व्यवसायकर व करमणूककर वसूल करते. (तो सुमारे दीड कोट रुपयाच्या आसपास आहे असे म्हणतात.) तो सर्वच्या सर्व सरकार घेऊन जाते. (हल्ली त्यातला थोडासा पुणे म. न. पा. ला परत केला जातो) तरी सरकारचे भागत नाही. जकातकर रद्द करून नुकसानभरपाई सरकार कशी करणार ? दुसऱ्या कोष्टकात पुणे महानगरपालिकेचा खर्च दाखवला आहे. १९७५–७६ साली जकातकर सोडून पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न ५ कोटी ७४ लाख रुपये राहते. त्या वर्षीचा सेवकवर्गाचा खर्च ४ कोटी ३० लक्ष रुपये, भाडवली खर्च १ कोटी ५९ लक्ष रुपये व प्राथमिक शिक्षणाचा खर्च २ कोटी ११ लक्ष रुपये आहे. १९७५–७६ चा हिशोब पूर्ण झाला असल्यामुळे हे आकडे पक्के (actual) आहेत. तेव्हा ५ कोटी ७४ लक्ष रुपये उत्पन्नातून ८ कोटी ४० लक्ष रुपये खर्च करू शकणारे 'नवे'(?) अर्थशास्त्र आज अस्तित्वात आहे काय ? बाकीचा इतर खर्च यात धरलेला नाही.

म्हणून जकातकरासंबधी स्वतंत्रपणे विचार करणे, निष्कर्ष काढणे व निर्णय घेणे चुकीचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अर्थसंकल्पाशी व अर्थव्यवस्थेशी सबधित असा, हा अवघड प्रश्न आहे. तो इतक्या लवकर सहजासहजी सुटेल असे वाटत नाही. जकातकर रद्द करायचा व पर्यायी व्यवस्था शोधीत बसायचे – एकूण एकच! □

### पुणे महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न ( आकडे लाखांत )

| | वर्ष | जकात कर रुपये | घरपट्टी रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| | १९६३–६४ | ८७·१७ | ७३·११ | २१८·९३ |
| | १९६४–६५ | १०४·४७ | ८३·६२ | २५३·७८ |
| | १९६५–६६ | १२५·९३ | ९१·२३ | २९७·९१ |
| | १९६६–६७ | १५४·८५ | १०१·९४ | ३५८·२७ |
| | १९६७–६८ | १७०·१७ | ११८·०० | ४०३·८९ |
| | १९६८–६९ | १९५·८७ | १४८·३९ | ४६३·४३ |
| | १९६९–७० | २२४·७० | १७३·६२ | ५३६·७९ |
| | १९७०–७१ | २६६·४८ | १६८ ४८ | ५७५·५९ |
| | १९७१–७२ | २९६·७१ | १७४·९८ | ६५१·२० |
| | १९७२–७३ | ३४२·२० | २०२·२१ | ७३६·४९ |
| | १९७३–७४ | ४३६·१७ | २१४·५४ | ८६१·४२ |
| | १९७४–७५ | ५२२·६८ | २०९ ५८ | ९७८·८३ |
| | १९७५–७६ | ५६८·५३ | २७९·७१ | १,१४२·८० |
| ◘ | १९७६–७७ | ७१२·०० | २९६·१९ | १,३२७·०६ |
| ◘ | १९७७–७८ | ८०६·७८ | ३०७·०७ | १,४६९·२८ |

◘ मान्य अंदाज : सदर्भ–अर्थसकल्प, पुणे महानगरपालिकेचा.

### पुणें महानगरपालिकेचा महसुली खर्च ( आकडे लाखांत )

| | वर्ष | सेवक वर्गावरील खर्च रुपये | भाडवली खर्च रुपये | शिक्षणखर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| | १९६३–६४ | ८५·४७ | २२·७४ | ३६·३५ |
| | १९६४–६५ | ९०·११ | २५·७७ | ४४·१६ |
| | १९६५–६६ | ९७·९४ | ४९·२० | ४९·३१ |
| | १९६६–६७ | १२०·२४ | १३०·५७ | ५७·०० |
| | १९६७–६८ | १२९·८७ | १९४·९७ | ७६·०७ |
| | १९६८–६९ | १५१·२५ | २४१·२४ | ७९·८० |
| | १९६९–७० | १८५·१८ | १६५·३१ | ९१·८० |
| | १९७०–७१ | १८८·८० | २५७·०७ | १३६·०३ |
| | १९७१–७२ | २४१·२२ | २४३·५८ | १२४·०७ |
| | १९७२–७३ | २४५·२७ | १५४·४७ | १३७·१६ |
| | १९७३–७४ | ३३४·०० | ८०·४० | १४५·२४ |
| | ११७४–७५ | ४०७·४६ | ६१·६४ | १७६·६९ |
| | १९७५–७६ | ४३०·४९ | १५९·८३ | २११·०४ |
| ◘ | १९७६–७७ | ५१९·७७ | ६६८·६२ | २७३·७६ |
| ◘ | १९७७–७८ | ५५४·७१ | ४५४·४४ | २३४·४३ |

◘ मान्य अंदाज–संदर्भ–अर्थसकल्प, पुणे महानगरपालिका.

' थोडयाच वेळात दुसऱ्या एका PANAM च्या विमानाने त्या सर्व उतारूंना व कर्मचाऱ्यांना घेऊन न्यूयॉर्ककडे उड्डाण केले. कैरोच्या विमानतळावर प्रत्येक स्फोटाबरोबर विमानाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत होत्या आणि त्याच वेळी या येणाऱ्या बातम्यांनी इजिप्तचे अध्यक्ष नासेर यांच्या काळजाचा ठाव घेतला होता. या बातम्या कदाचित त्यांची अखेरच जवळ आणीत असाव्यात. '

पण प्रकरण एवढयावरच संपणारं नव्हतं. खरे नाटय यापुढेच घडणार होते.

# अपहरणकर्त्यांच्या जगात !

## ( उत्तरार्ध )

डॉ. श्रीकांत मुंदरगी

**BOAC**–ब्रिटिश ओव्हरसीज एअरवेज कॉर्पोरेशनचे VC–10 जेट विमान ९ सप्टेंबर रोजी सकाळी बहारिनहून निघाले. ते बैरूत-मार्गे लंडनला निघाले होते. सूर्याच्या प्रकाशात ते विमान चकाकताना दिसत होते. त्यातील बहुतेक प्रवासी हातातील वृत्तपत्रात आलेल्या अपहरणाच्या बातम्या मोठ्या चवीने वाचत होते. किंबहुना सारेच जण त्यात गुंग होऊन गेले होते. या विमानाच्या प्रवासाची सुरुवात मुंबईहून झाली असल्याने त्यात निम्मे प्रवासी आशिया खंडातीलच होते; पण त्यातील बावन्न प्रवासी ब्रिटिश नागरिक होते आणि म्हणूनच...

बहारिन सोडल्यानंतर एका तासाने नेहमीच्या सर्वसामान्य कपडयात बसलेली तीन माणसे उठून कॉकपिटकडे चालू लागली.

विमानाचा कप्तान सीरील गॉलब्रार्न याने दाराचा आवाज येताच मागे वळून पाहिले आणि त्याला समोर दिसली, एक पिस्तुलाची नळी. त्याच्या लगेच लक्षात आले की, आपलेही विमान त्या अपहरणाच्या मालिकेत जाऊन बसत आहे त्यामुळे इतर काहीच न बोलता त्याने प्रश्न केला,

' मी तुम्हाला कोठे न्यावे ते मला कृपा करून सांगाल का ? ' कारण या शब्दांमुळेच अपहरणकर्त्यांच्या मनात शंका राहणार नाही व ते वेडेवाकडे वागणार नाहीत याची त्याला कल्पना होती.

' बैरूत ! ' उत्तर आले.

बैरूतला संदेश येताच अपहरणाची सवय झालेल्या अधिकाऱ्यांनी नेहमीच्या सहजतेनें विमानास उतरण्याची परवानगी दिली.

ब्रिटिश राजदूताचा निरोप आला,

' विमानातील प्रवाशांची तात्काळ सुटका करा. ' कारण विमानातील बावन्न ब्रिटिश प्रवाशांपैकी चौतीस शाळेतील विद्यार्थी होते. त्यापैकी एकवीस तर पालकांविना प्रवास करीत होते. त्या सर्वांचे पालक बहारिनमध्ये नोकरी वा व्यापारधंद्यात होते आणि ही मुले ब्रिटनमधील शाळेत शिकत होती. उन्हाळयाची सुट्टी संपवून ती परत ब्रिटनला निघाली होती. प्रसंगात अधिक तणाव निर्माण झाला. या छोटया पोरांना ओलीस ठेवून दहशतवाद्यांना काय साधायचे होते ?

मुक्तिसेनेने आदेश दिला होता, ' एकाही ब्रिटिश उतारूला बैरूतमध्ये सोडू नका. '

ती लहानगी पोरे गडबडून गेली; पण एकानेही आवाज काढला नव्हता. ब्रिटिश शिस्तीत वाढलेली ती मुले शांतपणे काय घडते, ते पाहत होती; पण एका छोटया पोराने आपल्या खिशातील पेन्सिल तासायचा छोटा चाकू काढून शेजारी बसलेल्या हवाई-सुंदरीच्या हातात दिला अन् तिच्या कानात कुजबुजत तो म्हणाला,

' हा चाकू त्या शेजारी उभ्या असलेल्या दरोडेखोराच्या पोटात खुपस ! '

तिने हळूच मान वर करून पाहिले. शेजारी उभ्या असलेल्या अपहरणकर्त्याने हे ऐकले तर नसेल ना, अशी शंका तिच्या मनाला चाटून गेली. तिने तो चाकू चटकन् खिशात घातला आणि त्या छोटया पोराला जवळ ओढून घेऊन थोपटले.

¤

त्याच वेळी लंडनच्या पोलीस कस्टडीत असलेल्या लैला खलिदचा तिथल्या पोलिस-गार्डशी चाललेला संवाद मोठा ऐकण्याजोगा होता.

' लैला, तुला घरी जावंसं वाटतं ना ? '

' हे काय विचारतोस तू वेडयासारखं ? '

' तुला विमानतळाचा रस्ता दाखवतो बघ. '

' अरे, पण थोडे पैसेही देशील का ? '

' छे ! तुला काय करायचेत पैसे ? तुला थोडीच तिकिटाची जरुरी आहे ? वैमानिका-वर पिस्तूल रोखलं की, चालली आपल्या देशाकडे ! '

त्यावर लैला खळखळून हसली.

' अरे ! पण ते इस्राएली बंदूकधारी मोठे कडक असतात. मला त्यांची भीति वाटते बघ. '

' मग तू जाणार कशी घरी ? '

' मला माझ्या साथीदारांची अगदी खात्री आहे. ते माझ्या सुटकेसाठी काही तरी हाल-चाल निश्चितच करतील ! '

ती पोलिसगार्ड तिच्याकडे मिस्किलपणे पहात हसत होता, तोच दुसरा एक गार्ड धापा टाकत आला व म्हणाला, 'अरे स्मिथ, आत्ताच रेडिओवर ऐकलं मी.'

'काय ऐकलंस एवढं विशेष ?'

'BOAC चं एक विमान पळवलं त्या साल्यांनी. त्यावर बावन्न ब्रिटिश उतारू आहेत म्हणे!'

'मग...'

'त्या उतारूंच्या बदल्यात ते लैलाच्या...' अन् जीभ चावत त्याने चटकन ते वाक्य अर्ध्यावर सोडून सर्व बोलणे लक्षपूर्वक ऐकत असलेल्या गजाआडच्या लैलाकडे पाहिले. आता मिस्किलपणे हसण्याची पाळी तिची होती ना! तिच्या नजरेत आता विजयाचं हसू खेळत होतं.

'एका लैलासाठी बावन्न ब्रिटिश उतारूंचे प्राण आता पणास लागणार आहेत. पाहू कोण जिंकतं अन् कोण हरतं!'

¤

...या नाटकाच्या दुसऱ्या प्रवेशाची सुरुवात आता गिया–खानाच्या क्रांतिकारकांच्या धावपट्टीवर होत होती. त्या दोन विमानांच्या जोडीला तिसरे BOAC चे विमान आले होते.

रेडक्रॉसच्या अमान येथील सदस्यांनी या नव्या विमानतळाला भेट दिली आणि दहशतवाद्यानी आपल्या मागण्या पुढे केल्या.

१. झुरिच येथे इस्राएली विमानावर हल्ला करणारे तीन पॅलेस्टीनिअन दहशतवादी मुक्त करा.

२. म्युनिच येथे EL–AL च्या उतारूंवर हल्ला करणारे तीन दहशतवादी पश्चिम जर्मनीत शिक्षा भोगत आहेत. त्यांची मुक्तता करा.

३. लैला खलिदची तत्काळ मुक्तता करा.

वॉशिंग्टन येथील निरनिराळ्या देशांतील राजदूतांची बैठक झाली. अमेरिकन परराष्ट्रखात्याचा सचिव,...विल्यम रॉजर्सने इस्राएल, स्वित्झर्लंड व पश्चिम जर्मनीच्या राजदूतांची भेट घेतली. ते सारेच चिंतेत पडले होते. कारण त्यांची सरकारे अजून मौन पाळून होती. त्यानतर रॉजर्सने दहा अरब देशांच्या दूतांची बैठक घेतली. त्या साऱ्यांनी अपहरणाचा एकमुखाने धिक्कार केला; पण नुसत्या धिक्काराने थोडेच काम भागणार होते ?

या सर्व विमानांत बरेचसे अमेरिकन नागरिक असले तरी अमेरिकेत एकही पॅलेस्टाईनचा राजकीय कैदी नव्हता. त्यामुळे तडजोडीसाठी अमेरिकेच्या हातात एकही दान नव्हते. त्यामुळे सर्व देशांनी एकत्र येऊन आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसच्या मार्फत बोलणी करावीत असे ठरले आणि सुरुवातीला अलिप्त असलेले ब्रिटन, BOAC च्या अपहरणानंतर या बैठकीत आपोआपच सामील झाले.

¤

सुरुवातीच्या रात्री TWA च्या विमानातील सहा उतारू अलगदपणे उचलण्यात आले व त्यांना जॉर्डनमधील इरबीड या छोट्याशा शहरातील एका इमारतीत ठेवण्यात आले, इरबीड म्हणजे क्रांतिकारकाचा बालेकिल्ला! सारे शहर दहशतवाद्यांच्या ताब्यात होते. दुसऱ्या दिवशी आणखी दहा उतारूंना अमानच्या परिसरात असलेल्या पॅलेस्टाइन निर्वासितांच्या छावणीत हलविण्यात आले. त्यामुळे बाकी सर्व उतारूंमध्ये घबराट पसरली. अनिश्चिततेच्या या भावनेमुळे उतारू हवालदिल झाले. त्यातून वाळवंटातला तो कडक उन्हाळा आणि पाण्याचे विलक्षण हाल! वीज नाही. वातानुकूलित यंत्रे बंद झालेली. त्यामुळे आणखीनच निराशामय वातावरण पसरले.

BOAC च्या विमानातील उतारूंना याचे कोडे पडले की, एका लैलासाठी आपले सरकार इतक्या उतारूंचे जीव धोक्यात का घालीत आहे ? त्यामुळे ते उतारू पंतप्रधान एडवर्ड हिथ यांना मनातून दोष देऊ लागले; पण त्यांना हे ठाऊक नव्हत की, एडवर्ड हिथ यांच्यामुळेच आंतरराष्ट्रीय संकटनिवारण समितीच्या बर्ने येथील सदस्यानी PFLP वर दडपण आणले आणि १० सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता संपणारी मुदत आणखी बाहत्तर तासांनी वाढविण्यात आली.

. त्यातच पॉप्युलर फ्रंटने आणखी एक मागणी पुढे सरकवली. अमेरिकन नागरिकत्व असलेले ज्यू उतारू, पॅलेस्टाइन प्रतिकारक राजबंद्याची इस्राएल, मुक्तता करीपर्यंत सोडण्यात येणार नाहीत. अर्थात इस्राएलच्या विमानाचं अपहरण करण्याचा प्रयत्न फसलेला होता. त्यातून इस्राएलमध्ये प्रतिकारक राजबंद्यांची संख्या बरीच मोठी, म्हणजे कित्येक हजार होती. त्यामुळे चर्चेला वाकडे वळण लागले. इस्राएलचा पवित्रा या बाबतीत नेहमीच कडक असतो, याची इतर देशांना चागलीच जाणीव होती. वातावरणातील वाढता तणाव पाहून हिथसाहेबानी जाहीर केले—

'लैला व इतर सहा पॅलेस्टाइन दहशतवाद्यांची मुक्तता केली जाईल; पण त्यासाठी ज्यूसकट एकूण एक उतारूंची सुरक्षित मुक्तता करावी लागेल. यासाठी इस्राएली राजबंद्यांच्या मुक्ततेची अट मागे घ्यावी लागेल!'

या सदेशाने क्रांतिकारी विमानतळावर एकदम तग हवा पसरली. तिन्ही विमानांतील दहशतवादी भयकर भडकले. त्यात कडक आणि क्रूर अशी एक तरुण पोरगी ... जिला सारेजण 'बॉम्बशेल बेसी' म्हणून ओळखत, ती तर उतारूंवर आपला राग काढू लागली. मोठमोठ्याने ओरडू लागली–

'तुमच्या सरकारच्या असल्या नीच धोरणामुळेच आता आम्ही सारी विमाने तुमच्यासकट उडवून देणार आहोत. आम्ही तुमचा नाश करून टाकू. त्याशिवाय तुमचे देश जागे होणार नाहीत!'

त्या भयानक धमकीने साऱ्यांच्याच काळजाचे पाणी पाणी झाले!

वाटाघाटी परत चालूच राहिल्या.

...एके रात्री दहशतवादी अचानक गडबड करू लागले. विमानांच्या आसपास खड्डे उकरू लागले. त्याबद्दल एका उतारूने विचारताच त्याला खेकसून उत्तर मिळाले—

'इस्राएली सैनिक आकाशातून येऊन तुमची सुटका करणार आहेत म्हणे! पाहतो आम्ही कशी सुटका करतात ते!'

वास्तविक पुढे सहा वर्षांनी हे वाक्य खरे ठरायचे होते!

सहा दिवस होऊन गेले, इतक्या उतारूंची सोय करणे अवघड होत चालले होते. जगातले वातावरण दहशत वाद्याच्या विरुद्ध तापत चालले होते. अध्यक्ष नासेरने तर म्हणून सुद्धा टाकले की, 'अशा वागण्याने युरोप, अमेरिका व इस्राएलला अरब जगावर हल्ला करण्याची सुसधी तुम्ही देता आहात!'

वास्तविक अध्यक्ष निक्सनने सहाव्या

आरमाराची हालचाल सुरू केली होती. ते लेबनानच्या किनाऱ्याकडे वेगाने धावत होते.

तो युद्धाचा धोका दूर असला तरी विमानतळाजवळ सुसज्ज असलेले जॉर्डनचे राजे हुसेन याचे सैनिक चढाईच्या पवित्र्यात उभे होते. याची पाळेमुळे जॉर्डनमध्ये, पूर्वीच रुजली होती. बहुताशी दहशतवादी जॉर्डनचे नागरिक होते आणि त्यांचे व राजा हुसेन याचे विळया–भोपळयाइतकेच सख्य होते. यापूर्वीही तीन-चारदा हुसेनच्या सन्याशी त्यांचे झगडे होऊन त्यात कित्येक लोक मेले होते वा जखमी झाले होते; पण बाबा–पुता करून आतापर्यंत प्रकरणे मिटत आली होती. दहशतवाद्यांचे तीस हजार सभासद होते; पण प्रत्यक्षात पाच हजारांहूनही कमी लोकांना सैनिकी शिक्षणाचा लाभ मिळाला होता. त्यामुळेच आज ना उद्या यादवीला सुरुवात होणार, याची दोन्ही पक्षांना कल्पना होती.

PFLP ने हुकूम सोडला –

'उतारूंना क्रांतिकारकांच्या विमानतळावरून जॉर्डनची राजधानी अमान येथे हलवा. विमाने मात्र तशीच राहू देत!'

दहा-बारा बसेस विमानाजवळ येऊन थांबल्या आणि साऱ्या उतारूंना त्या बसेसमध्ये चढविण्यात आले. विमानातून उतरताना भविष्याची अनिश्चिती मनात ठेवूनच सारेजण उतरत होते; पण बाहेरच्या मोकळया हवेने काही काळ का होईना, सारे उल्हसित झाले.

त्या बसेस विमानापासून काही अंतरावर जाऊन थांबल्या आणि अचानक प्रचंड स्फोटाचे आवाज वातावरणात घुमू लागले. साऱ्यांनी माना वळवून पाहिले आणि अठरा कोटी रुपयांहून अधिक किंमतीची ती तीन विमाने ज्वाळांच्या उदरात भस्मसात होताना पाहून उतारूंनी आपले डोकी आश्चर्ययुक्त भयाने झाकून घेतली. वीस मिनिटे ते स्फोट साऱ्यांच्या कानठळ्या बसवीत होते. आणि...

अचानक राजा हुसेन याच्या रणगाड्यांनी बसेसना सर्व बाजूंनी वेढा घातला. सहा दिवस वाट पाहून सैनिकही कटाळले होते. आता त्यांना हालचाल करायची होती.

अबु-फादी... दहशतवाद्यांचा प्रमुख बसमधून उडी मारून पुढे आला आणि ओरडला,

'पाच मिनिटांच्या आत रणगाड्यांनी माघार घेतली नाही, तर सर्व बसेस उतारूंसह उडवून देण्यात येतील!'

एक ...दोन ... तीन ... चार...

नुकत्याच झालेल्या विमान–स्फोटांच्या ज्वाळा वातावरणात धुमसत होत्या, त्यामुळे ही धमकी पोकळ नव्हती याची सर्वांनाच जाण होती.

... पाचव्या मिनिटाला रणगाडे माघारी परतू लागले.

राजधानीकडे जाताना ठिकठिकाणी वाटेतील खेड्यातील लोक रस्त्यावर थव्याथव्याने उभे होते. ते कुतूहलाने बसेसमधील लोकांना न्याहाळीत होते. गोऱ्या अस्वलाना वेसण घालून त्यांना बंदिवान करणाऱ्या आणि आकाशातून विहार करणाऱ्या भांडवलशहाना विमानासह पकडून त्यांचा नाश करणाऱ्या या दहशतवाद्यांचे स्थान तिथल्या अडाणी जनमानसात उंच झाले होते.

मिरिअमला वाटले की, सहा दिवसांच्या बंदिवासानंतर अमानच्या इंटरकाँटिनेन्टल हॉटेलमध्ये जाऊन आंघोळ करायला मिळणार, कोकाकोला प्यायला मिळणार, टी. व्ही. पहायला मिळणार! पण...

काही बसेस सरळ इटरकाँटिनेन्टल हॉटेलवर गेल्या आणि त्यातील उतारूंना सोडून देण्यात आले. दोन बसेस मात्र वाटेतच वळवल्या होत्या.

रेडक्रॉसने जेव्हा उतारूंची यादी पाहिली तेव्हा त्यांच्या लक्षात आले की अजून ५६ उतारू बेपत्ता आहेत. त्यात ३८ अमेरिकन्स, ८ ब्रिटिश, ६ स्विस, २ जर्मन्स आणि २ डच होते. या छपन्न उतारूंमध्ये मिरिअमदेखील होती. बिचारीचे टबमधील गरम पाण्याच्या स्नानाचे स्वप्न अपुरेच राहिले!

त्यातील काहींना सुरुवातीच्या एक–दोन दिवसांत हलविण्यात आले होते; पण बाकीचे बरेचजण मिरिअमच्या बसमध्येच होते. ती बस वाटेतच वळून एका टेकाडावरील इमारतीसमोर थांबली. त्याना एका छोट्याशा हॉलमध्ये कोंबण्यात आले व सागण्यात आले,

'जोवर तुमचे देश आमच्या मागण्या मान्य करीत नाहीत, तोपर्यंत तुम्ही आमचे युद्धकैदी म्हणून येथेच राहणार आहात!'

आणि ते ऐकून मिरिअमला प्रथम रडूच कोसळले. तिची सुटकेची आशा पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली.

छपन्न उतारूंचा ठावठिकाणा सांगण्यास जेव्हा नकार देण्यात आला, तेव्हा पॉप्युलर फ्रंट आणि रेड क्रॉस यांच्या वाटाघाटी स्थगित झाल्या. आंतरराष्ट्रीय संकटानिवारण समितीने आपली असहाय्यता प्रकट केली. देशोदेशींच्या दूतावासांची घोर निराशा झाली आणि काही काळ स्मशानशांतता पसरली.

सुरुवातीच्या काळात छपन्न उतारूंना वेगवेगळया ठिकाणी ठेवण्यात आले होते. त्यांपैकी अमेरिकन लोकांना एका तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावर ठेवण्यात आले होते यापैकी दोन डच नागरिकांना मात्र मायकेल अॅडाम्स या अरब–ब्रिटिश सामंजस्य समितीच्या अध्यक्षाच्या मध्यस्थीमुळे सोडण्यात आले. आता उरले फक्त चौपन्न उतारू...

बाहेर यादवी युद्धाला सुरुवात झाली. कारण राजा हुसेन यानी हंगामी लष्करी सरकार स्थापून आणीबाणी जाहीर केली.

पॅलेस्टाइन छावण्यातून शस्त्रे व दारूगोळा वाटण्यात आला. जॉर्डन रेडिओवरून घोषणा झाली,

'पॅलेस्टाईन फ्रंटने आक्रमक धोरण स्वीकारल्यास त्याचा बंदोबस्त केला जाईल!'

दहशतवाद्यांच्या रेडिओने प्रत्युत्तर दिले,

'पॅलेस्टाइनच्या निर्वासितांनो, या जुलमी लष्करशाहीला नेस्तनाबूत केल्याशिवाय बंदुकीच्या चापावरील बोटे काढू नका! हे धर्मयुद्ध आहे!'

कॅप्टन श्रेवर म्हणतो,

'१७ सप्टेंबरच्या सकाळी बाहेर सर्वत्र मशिनगनचे आवाज आणि बॉम्बस्चे स्फोट ऐकू येत होते. आम्ही सारे जमिनीवर एकमेकाना चिकटून आडवे पडलो होतो. आमच्या इमारतीच्या समोरील जागेत दारू–गोळयाची प्रचंड रास होती. त्यामुळे आम्ही सारे एकाच गोष्टीला विलक्षण घाबरत होतो. ती म्हणजे एखादा जरी तोफगोळा तेथे येऊन पडला असता तरी आमची हाडेसुद्धा नंतर कोणाला सापडली नसती!'

हुसेनच्या सैनिकानी रणगाडे घेऊन इरबीड शहरातून घराघरातील दहशतवाद्यांना टिपण्यास सुरुवात केली आणि त्या चौपन्न

उतारूंच्या मुक्ततेसाठी साऱ्या शहराचे समरांगणात रूपांतर झाले. विजयाचे पारडे कलते होते. काही वेळा हुसेनचे सैनिक चढाई करीत, तर काही वेळा ते बचावाचे धोरण स्वीकारीत. चार दिवसांच्या घोर यादवीनंतर एक निराळीच कलाटणी मिळाली. १९ तारखेला सिरियाने आपले रशियन बनावटीचे रणगाडे पॅलेस्टाइन दहशतवाद्यांच्या मदतीसाठी जॉर्डनमध्ये घुसविले आणि राजे हुसेन दोन्ही बाजूंनी अडचणीत सापडले.

या सर्व प्रकारामुळे तिसऱ्या महायुद्धाची शक्यता वाढली. कारण अमेरिकेच्या अध्यक्षांनी सहाव्या आरमारास आणि जर्मनीतील आठव्या लष्करास सावधानतेचा आदेश दिला. इकडे रशियाने मध्यसमुद्रात पंधरा युद्धनौका सज्ज केल्या; पण त्याचवेळी रशियाने युद्धनैतिक पवित्रा बदलला आणि सिरियावर दबाव आणताच व हुसेनच्या लष्कराने जोर करताच सिरियाचे रणगाडे मागे हटले. महायुद्धाच्या जवळ आलेले जग सर्वनाशापासून दूर गेले.

राजा हुसेन यांनी आपल्या दिमतीतील लाल तुऱ्याची राखीव आणि जवान फौज बाहेर काढली व त्यांना हुकूम सोडला–

'वाटेल ती किंमत देऊन चौपन्न उतारूंना सोडवून आणा!' आणि ती सेना विजेसारखी दहशतवाद्यांच्या बालेकिल्ल्यावर तुटून पडली ... २५ सप्टेंबर.

तळमजल्यावरील ब्रिटिश, जर्मन आणि स्विस ओलिसांना आता धावतपळत जाणाऱ्या स्त्रिया-मुलांच्या किंचाळ्या ऐकू येऊ लागल्या आणि पाठोपाठ हातबॉम्ब्स आणि सबमशिनगन्सचे आवाज ऐकू येऊ लागले. आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी स्विस एअर फ्लाइट इंजिनियर अर्नेस्टने आपला पांढरा शर्ट खिडकीतून काढून हलविण्यास सुरुवात केली. आणि दहशतवादी पहारेकरी पाहता पाहता पळून जाताना दिसू लागले. इतक्यात दारावर धक्के बसू लागले आणि काही क्षणात दारे धाडकन उघडली आणि दारात लाल तुऱ्याचे जवान उभे असलेले दिसले. आनंदाने हसत-ओरडत त्यांनी उतारूंशी हस्तांदोलन करण्यास सुरुवात केली. उतारूंनी बाहेर पडताच पटांगणात प्रवेश केला आणि त्यांच्या स्वागतार्थ एका रणगाड्याने तोफेची नळी आकाशाकडे करून गोळ्यांची एक फैर झाडली! तीन आठवड्यानंतर ते कैदी आता मुक्त झाले होते. आता फक्त अडतीस अमेरिकन नागरिक सापडायचे होते.

¤

मध्यतरी जगभर या यादवीचे पडसाद उमटत होते. अध्यक्ष नासेरने आपला दूत अमानला पाठविला आणि तेथील हिल्टन हॉटेलमध्ये अरब राष्ट्रांच्या प्रमुखांची एक बैठक घेतली; पण राजा हुसेन आणि पॉप्युलर फ्रंटच्या यासर आराफत या प्रमुख नेत्याने बैठकीस हजर राहण्यास नकार दिला. त्यामुळे या बैठकीला तसा फारसा अर्थ राहिला नाही; पण सुदानचे अध्यक्ष निमेरींच्या नेतृत्वाखाली एक शांततामंडळ स्थापन करण्यात आले.

निमेरींनी धोका पत्करून अमानमध्ये दोन्ही नेत्यांशी २५ सप्टेंबरला बोलणी केली. पण त्याच दिवशी हुसेनच्या सैनिकांनी काही उतारूंना मुक्त केले. त्यामुळे बोलणी फिसकटण्याच्या मार्गावर होती. सायंकाळी पुन्हा बैठकीला येताना निमेरी एका गोळीबाराच्या माऱ्यातून कसेबसे वाचले. त्यामुळे दोन्ही नेत्यांनी त्यांच्या या स्वार्थत्यागाच्या सन्मानार्थ अखेर युद्धतहकुबी जाहीर केली!

त्यातून ब्रिटिश पंतप्रधान हिथ यांनी अध्यक्ष नासेरना दहशतवाद्यांवर दडपण आणण्याची विनंती केली. दहशतवाद्यांची परिस्थितीही अतिशय बिकट होती. पाणी, अन्न, निवारा अन् इतर सोई दुर्मिळ होत चालल्या होत्या. हुसेनच्या सैन्याचे दडपण वाढत होते. त्यामुळे आपल्या ओलिसांच्या सुरक्षिततेची हमी येणे त्यांनाही अशक्य होऊन बसले. २६ तारखेला अबू खलिद या एका दहशतवादी नेत्याने अमान येथील इजिप्शियन दूतावासात TWA चा कप्तान कॅरॉल वुडस् या आपल्या ताब्यातील ओलिसास एका मुलीबरोबर पाठवून खालील मागण्या मांडल्या–

'युद्धतहकुबी तत्काळ जाहीर व्हावी!

आणीबाणी व लष्करी सरकार बरखास्त व्हावे!

युद्धात मरण पावलेल्या दहशतवाद्यांच्या प्रेतांची सन्मानपूर्वक विल्हेवाट लावली जावी!'

मागण्या ताबडतोब मान्य करण्यात आल्या आणि एका दहशतवाद्याने टेकडीवरच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर जेथे अमेरिकन उतारू होते तेथे प्रवेश करून जाहीर केले–

'तुम्हाला सोडण्यात येत आहे!'

एका लंगड्या इजिप्शियन माणसाने त्या अमेरिकन्सना बाहेर काढले व जवळच रेडक्रॉसच्या बसेस उभ्या आहेत, असे सांगितले; पण अजूनही धुमश्चक्री पूर्ण थांबली नव्हती. त्यामुळे हाताला पांढरा रुमाल बांधून सारे त्या लंगड्या माणसाच्या मागून जपून, वाकून जाऊ लागले; पण जेथे बसेस थांबल्या आहेत, असे सांगितले होते तेथे एकही बस उभी नव्हती. सारे उतारू भयचकित व साशंक झाले. हा काही फसवणुकीचा प्रकार तर नसेल ना, अशी शंका साऱ्यानाच येऊ लागली.

त्या लंगड्याने अमानच्या एका औद्योगिक इमारतीत साऱ्यांना सोडून 'बसेस घेऊन येतो,' असे सांगून कूच केले. ते दोन तास साऱ्यांना दोन महिन्यांसारखे वाटले. कारण मुक्ततेच्या इतक्या जवळ जाऊनही परत सारे जीव टांगणीस लागले; पण अखेर बसेस आल्या आणि त्यात सारे चढत असताना आसपास गोळीबार चालूच होता.

'थांबू नका! चला!' आणि वेगाने त्या दोन्ही बसेस निघाल्या. दहाच मिनिटांमध्ये त्या एका रेडक्रॉस हॉस्पिटलमध्ये येऊन थांबल्या त्या हॉस्पिटलच्या खिडक्यांची तावदाने फुटून काचांचा ढीग पडला होता. आत जखमी माणसांचा खच पडला होता.

मिरीअमने पाहिलेले दृश्य इतके विदारक होते की, तिला तिने स्वतः सोसलेल्या दुःखाचा पूर्ण विसर पडला.

'तेथे अनेक जखमी पडले होते. निर्वासिताच्या छावणीतील निरपराध बालके अन् स्त्रिया विव्हळत, किंचाळत होत्या. कुणाचे हात तुटले होते, तर कुणाचे पाय. एका

## 'वाटेल ती किंमत देऊन चौपन्न उतारूंना सोडवून आणा!'

मुलाचे डोळे खोबणीच्या बाहेर आले होते. एका लहान पोराचे दोन्ही हात तुटले होते ...खांद्यापासून! त्यांच्याकडे पाहिल्यावर मला भडभडून आले. अनेक निरपराध व अजाण लोकांचे बळी या यादवीत देण्यात आले होते. नशीब एवढेच की, सारेजण जिवंत परतत होते! या दोन तत्त्वांच्या झगडयात असे किती निरपराधी मृत्युवेदीवर चढविण्यात येतील याचे उत्तर फक्त एका भविष्यालाच ठाऊक! ' मिरिअम विचार करीत होती.

अखेरीस या भीषण व क्रूर संहारातून दहशतवाद्यांनी काय साधले? या प्रश्नाचे उत्तर फार कठीण आहे. त्यांचा एक फार मोठा फायदा निश्चितच झाला होता. साऱ्या जगाचें लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यात त्यांनी यश मिळविले होते. आपल्यावर अन्याय होतो आहे, याची जाणीव त्यांनी जगाला करून दिली. त्याशिवाय जर्मनी व स्वित्झर्लंडने सहा दहशतवादी मुक्त केले. ब्रिटिशांनी पॅलेस्टाईनची रणचंडी लैला खलिद हिला मुक्त केले. तिला घेऊन जाण्यासाठी खास विमान देण्यात आले होते. हो! नाही तर तिने तिला घेऊन जाणारे प्रवासी विमानसुद्धा पळविण्यास कमी केले नसते!

आणि सर्वात शेवटचा व महत्त्वाचा फायदा म्हणजे पॉप्युलर फ्रंटने पॅलेस्टाइन निर्वासितांच्या मनात मानाचे स्थान पटकावले. जगातील सर्व देशांमध्ये त्याचा एक दरारा निर्माण केला हे वेगळेच. यापुढे सारे जग पॉप्युलर फ्रंटशी जपून वागणार होते. एवढे निश्चित!

पण या युद्धामुळे तोटेही बरेच झाले. सर्व प्रगत देशांनी आपल्या विमानांची व उतारूंच्या सुरक्षिततेची कडक व्यवस्था करण्याचे ठरविले. मोठ्या विमानतळावर उतारूंची व्यवस्थित तपासणी करण्यास सुरुवात झाली. प्रत्येक विमानात एक वा दोन सुरक्षा–अधिकारी ठेवण्याचे ठरविण्यात आले. मेटल डिक्टेटर्स बसविण्यात आले. याबाबतीत इस्राएलचा कित्ता गिरवून तसा प्रसंग आलाच तर अपहरणकर्त्यांवर तेथेच मात करण्याच्या योजना आखण्यात आल्या.

या पाचही विमानअपहरणात एकही उतारू दगावला नसला तरी त्यातून निष्पन्न झालेल्या यादवी युद्धात बळी पडलेल्यांची संख्या दहा हजारांच्यावर होती अनेक निरपराध स्त्रिया व मुलांना–विशेषतः पॅलेस्टाइन निर्वासित छावणीतील–स्वतःचे जीव गमवावे लागले! त्यामुळे केवळ जगाचीच नव्हे, तर निर्वासितांचीसुद्धा सहानुभूती दहशतवाद्यांनी गमावली.

पण या सर्वात जर मोठा बळी कोणाचा गेला असेल तर तो अध्यक्ष नासेर यांचा! या अपहरणाची अप्रत्यक्ष जबाबदारी दहशतवाद्यांनी त्यांच्यावरच टाकली. कारण त्यांनीच अमेरिकेची तहाची योजना स्वीकारली होती. त्यामुळे हा पेचप्रसंग सोडविण्यासाठी व जागतिक युद्ध टाळण्यासाठी त्यांनी दोन आठवडे जे अहोरात्र परिश्रम केले त्यामुळे त्यांना विलक्षण मानसिक थकवा आला. २७ सप्टेंबरच्या रात्री समाधानाचा निश्वास टाकून ते म्हणाले,

' मला खूप झोपायचं आहे! खूप झोपायला हवं आहे! '

...दुसऱ्या दिवशी सायंकाळी सव्वासहाला कैरोमध्ये आपल्या निवासस्थानी अरब जगाच्या या लाडक्या नेत्याने जगाचा निरोप घेतला!...हृदयविकाराचा जीवघेणा झटका...अरब जगाला न सोसता येण्याजोगा धक्का होता हा...!

यूनोच्या आमसभेत या क्रूर व निष्ठूर प्रकाराचा जोरदार शब्दांत निषेध करण्यात आला तर पोप पॉलने अपहरणकर्त्यांची जंगली व दरोडेखोर या शब्दात निर्भर्त्सना केली. जगाच्या काना-कोपऱ्यात अशाच तऱ्हेचे पडसाद उमटले.

काही थोड्याशाच गोष्टी पदरात पाडून घेऊन सर्व जगाची सहानुभूती गमावून बसणाऱ्या पॅलेस्टाइन दहशतवाद्यांना इस्राएलने जे सडेतोड व धाडसी उत्तर दिले त्याचे मात्र कौतुक होत राहिले.

लैला खलिदने ब्रिटिश पोलिसांना सांगितलेले सूत्र मात्र जगातील सर्व देशांनी जरूर ध्यानात ठेवायला हवे,

' जगात कोणीही तटस्थ असूच शकत नाही. एक तर तो दडपला गेलेला असतो वा दडपशाही करणारा! तो श्रीमंत असतो वा गरीब! स्वतःला तटस्थ वा निष्पाप समजणारे ढोंगी असतात! '

समाप्त




## पुस्तके

# बडोदा डायनामाइट केस

दादुमिया

सी. जी. के. रेड्डी यांनी 'बडोदा डायनामाइट केस'वर ग्रंथ लिहून स्वतःची बरीचशी जाहिरात केली असली तरी प्रत्यक्ष त्या ग्रंथात बडोदा डायनामाइट केसविषयी माहिती म्हणून हाती काहीच लागत नाही.

सी. जी. के. रेड्डी हे 'हिंदू' पत्राचे व्यवस्थापक. तसेच एस्. टी. सी. चे सन्माननीय प्रमुख. त्यामुळे साऱ्या जगात फिरण्यासाठी त्यांना पासपोर्ट व व्हिसा सरकारने दिला होता. त्याच्या जोरावर त्यांनी परदेशी जाऊन स्वामी किंवा मकरंद देसाई यांच्या आधी इंदिरा गांधींची भारतात हुकूमशाही कशी चालली आहे त्याची कल्पना परकीयाना दिली, हे त्यांचे फार मोठे राष्ट्रीय कार्य होय.

जॉर्ज फर्नांडीस पकडले गेल्यावर त्यांचा जेलमध्ये खून झाला नाही, याचे कारण समाजवादी युरोपियन राष्ट्राच्या प्रमुखानी इंदिरा गांधीवर फार मोठा दाब आणला होता आणि त्यांना फर्नांडीस याचे कार्य कळले कसे? ते सी. जी. के. रेड्डीमुळे कळले! 'वीकली'च्या खुशवंतसिंगांजवळ असाच पासपोर्ट व व्हिसा होता; पण त्याचा वापर सरदारजींनी कसा केला ते सर्वांनाच माहीत आहे.

'जॉर्ज पिंपरनेल' ह्या पाचव्या प्रकरणात रेड्डींनी जॉर्ज भूमिगत जीवन कसे व्यतीत करीत होते त्याचे विनोदी शैलीत उत्कृष्ट विवेचन केले आहे; पण एकदरीत या ग्रंथात इतरत्र माहीत असलेल्या माहितीची पुनरुक्ती करण्यातच सी. जी के. रेड्डी यांनी तीनचतुर्थांश पाने खर्च केली आहेत आणि उरलेल्या पाव भागात जो माहिती सांगितली आहे ती सारी फसलेल्या कटाची! तेथे ओळीओळीत एवढे नैराश्य आढळते की सांगण्याची सोय नाही.

### रेड्डींनी असे का केले असावे?

कारण रेड्डी आपल्या आयुष्यात कमालीचे 'फ्रस्ट्रेटेड' आहेत. पूर्वी समाजवादी राजकारणात त्यांनी बराच भाग घेतला होता; पण आपल्या एस्. एस्. पी. सहकाऱ्याचे खटपाळ चाळे त्यांना सहन झाले नाहीत म्हणून राजकारणाचा संन्यास घेऊन ते 'हिंदू'सारख्या वृत्तपत्राचे व्यवस्थापन बघू लागले. इंदिरा गांधींनी आणीबाणी पुकारली तरीही विरोधी राजकारणी आपले चूपच! म्हणून त्यांचे माथे भडकले. आपोआप ते जॉर्ज फर्नांडीस याच्या एकसूत्री कार्यक्रमाकडे (इंदिरा हटाव!) ओढले गेले. डायनामाइट केसचा जन्म असा झाला.

पण या ग्रंथात बडोद्याच्या डायनामाइटस्विषयी काहीच उल्लेख नाही, हे दुर्दैव आहे. गडकऱ्यांच्या लाकडाच्या भुश्श्याच्या चिवड्यासारखे हे प्रकरण वाटते.

खरे म्हणजे बडोदा डायनामाइट कट हा महाभयंकर कट होता. त्यात अंदाजे दीड हजार लोक गुतले होते. हे लोक साऱ्या भारतभर पसरलेले होते. त्यातील बहुतेक सारे समाजवादी पक्षाचे, विशेषत. लोहियांचे भक्त होते. त्यात पंधरा वर्षांच्या शाळकरी पोरापासून सध्या मद्रासचे गव्हर्नर असलेल्या साठीतील प्रभुदास पटवारीपर्यंत निरनिराळ्या वयाचे लोक होते. डॉ. गिरिजासारख्या तरुणी त्यात होत्या. वृत्तपत्र-व्यवसायातील प्रतिष्ठित मडळी होती, वीरेंद्र शहांसारखे मुकुंद स्टील अँड आयर्नचे मालकही होते आणि गोविंद सोळकीसारखा कफल्लक हरिजनदेखील होता. दुर्दैवाने, रेड्डींनी त्याविषयी आपल्या पुस्तकात काहीच माहिती सांगितलेली नाही.

हा कट म्हणजे खराच महाभयंकर कट होता. त्याच्या नियोजनाचे सारे श्रेय एका नेत्याकडे जाते; तो म्हणजे जॉर्ज फर्नांडीस! दुर्दैवाने या एकमेव माणसालाच सर्व प्रकाराची खरी कल्पना होती. कदाचित् याचे कारण जॉर्जने निवडलेली माणसे 'कच्ची मडकी' होती! राजकीय वादाची पूर्ण कल्पना असणारी नव्हती. ही कच्ची मडकी कुठे काही तरी बोलून बसतील अशी जॉर्जलाच भीती वाटत असावी! जॉर्जच्या सहकाऱ्यात काहीजण हौशे, तर काहीजण गवशे होते. काहीजण केवळ गंमत म्हणून किंवा धाडस करायला एक संधी म्हणून आत आले. तुरुगात ह्या मंडळीच्या ज्या शाब्दिक चकमकी झडल्या त्यावरून ही मंडळी खरी 'कच्ची मडकी' होती, क्रांतिकारक नव्हती ते पटते.

याचा अर्थ, या कटातील सर्वच मंडळी 'कच्ची मडकी' होती असा नाही. स्वतः जॉर्ज किंवा रेड्डी, बडोद्याचे आजचे 'लोकसत्ते'चे संपादक किरीट भट्ट किंवा डॉ. गिरिजा खऱ्या अर्थाने 'उस्ताद' होत्या व त्यांनी आपले काम फार चोखपणे, गुप्तपणे व जबाबदारीने पार पाडलेही!

मात्र बाकीचे लोक असे-तसेच होते. मागे वळून पाहता जॉर्ज फर्नांडिसचा हा दोषच समजला पाहिजे. रेड्डींनी आपल्या पुस्तकात अप्रत्यक्षपणे त्याची कबुली दिली आहे. एक वार्ताहर स्वतःस फारच हुशार समजत असे. पोलिसांना प्रश्न विचारून त्यांच्याजवळ काही माहिती आली आहे का, ते चाचपून पाहावे अशा बुद्धीने तो रोज पोलीस चौकीत जाई! पोलीस अधिकारी हुशार असतात. तेच त्याच्याकडून माहिती काढून घेत! गोविंद सोलकी हा हरिजन सामाजिक कार्यकर्ता. त्यास कोणी व कसा पकडला भगवान जाणे! कोणत्याही राजकीय रगाचे त्यास सोयर-सुतक नव्हते आणि मुख्य म्हणजे तो 'पोलिसखबऱ्या' होता. त्याने त्याच्या सहकाऱ्यांचे पुरे वारा वाजविले!

भरत पटेल! हान्स पुन्हा पुन्हा सी. जी. के. रेड्डींना विचारी, 'अरे, या भरत पटेलवर विश्वास ठेवायचा का?'

'बेलाशक, शंभर टक्के नाही, तीनशे टक्के!' याने कलकत्त्यास बरेचसे पोलाद काळ्या बाजारात विकले होते. सी. बी. आय्. ने त्याला त्यासाठी पुराव्यासकट पकडलेही होते रजनी पटेल व हितेंद्रभाई यांच्याशी त्याने बोलणी केली होती, 'या गुन्ह्यातून तुम्ही मला सोडवा. मी तुम्हाला एका फार मोठ्या गुन्ह्याची सर्व माहिती सांगेन.' त्यांनी भरत पटेलला गृहमंत्री ओम मेहता यांच्याकडे नेले. ओम मेहतांनी इंदिरा गांधींना सारा प्रकार कळविला. हे केव्हा घडले? गुन्हा प्रकाशात (पेपरात) येण्याआधी तीन महिने! सी. बी. आय्. ने सारी माहिती काढली. गोविंद सोलकीस हाती धरून एक कट रचला—डायनामाइटस्

ट्रान्स्पोर्ट कंपनीकडे नेण्याचा आणि पोलिसांनी त्यांना पकडले सापळा गोठवून !

पोलिसांना वाटले, आपण काही मोठा गुन्हा शोधून काढतो आहोत ! त्यांनी खूप मेहनत केली व गुन्ह्याच्या साऱ्या बारीक-सारीक गोष्टी प्रकाशात आणल्या. त्यावर सी. बी. आय्. चे लोक म्हणतात, 'हे तर सारे आम्हास आधीच ठाऊक होते !'

'मग झक मारायला आम्हाला ही सारी मेहनत कशाला करावयास लावलीत ? आधी का सांगितले नाहीत ? गेले पंधरा दिवस आम्ही धड झोपलो देखील नाही !'

'हॅं ऽ हॅं ऽ, आम्हाला तुमचा चोखपणा तपासायचा होता !' या उत्तराने स्थानिक पोलीस अधिकारी किती रागावले असतील त्याची कल्पनाच करा !

बडोद्यात सुरुंगवाले सापडले गेले. माझा एक मित्र ताबडतोब गुजराथच्या जनता मोर्चाच्या मंत्र्यांना भेटावयास गेला. 'त्यांना जामिनावर सोडवा !' गृहमंत्र्यानी या मित्रास सांगितले.

पण बडोद्यात तसे काहीच घडले नाही. न्यायाधिशास सांगण्यात आले होते, 'लेका, तुझी नोकरी जाईल !'

पुन्हा गृहमंत्र्यांची गाठ.

'काय करू शकणार आपण ?' एक लाचार, असहाय्य हास्य. 'आमचीच खात्री नाही, आम्ही सत्तेवर टिकू म्हणून ! दिल्लीहून आज्ञा आली आहे, या प्रकरणात गुजराथ सरकारला बायपास करा ! कॉंग्रेसवाल्याना हिरवा सिग्नल देण्यात आला आहे, खाली खेचा गुजरातल्या जनता मोर्चा मंत्रिमंडळास !'

दिल्लीहून आज्ञा ! मग काय विचारता ? कसला न्याय व कसला न्यायाधीश ? सारा तमाशाच !

म्हणून ह्या मंडळींनी विचार केला, दिल्लीस केस नेली तर निदान परदेशीय वार्ताहर असतात. त्यांना काही गोष्टी सांगू व या केसचा उपयोग इंदिरा गांधीच्या हुकूमशाहीविरुद्ध करू–

म्हणून दिल्लीला केस नेली गेली.

हे सारे नाट्य सी. जी. के. रेड्डीनी वाचकाना सांगायला पाहिजे होते. त्यांनी तसे काही देखील केलेले नाही.

सारे पुस्तक मी यव्, केलंय, मी त्यंव् केलय' अशी बढाई मारण्यातच खर्च केले आहे.

जॉर्ज मंत्री आहे, नाही तर रेड्डीनी त्याचेही वाभाडे काढण्यास कमी केले नसते. या पुस्तकातही जॉर्जच्या चुका रेड्डीनी दाखविल्या आहेतच. जॉर्ज पकडला जाणे सहज शक्य का झाले ? त्याने रेड्डीचा सल्ला ऐकला नाही म्हणून !

सुरुवाती – सुरुवातीला दहा – बारा सुरुंग एकेक व्यक्ती बडोद्याच्या बाहेर घेऊन जात असे ! जसजशी भीड चेपू लागली तसतसे धैर्य वाढू लागले व जास्त जास्त सुरुंग बाहेर पडू लागले. एका सुरुगाची किंमत अडीच रुपये असते. काळ्या बाजारात दहा ते बारा रुपये त्यास पडतात. गुजरातेत सुरुंग फार लागतात. प्रत्येक राज्याचा 'कोटा' ठरविलेला आहे. दक्षिणेच्या वाट्यास हा कोटा फारच थोडा आहे. त्यामुळे आंध्र व तामिळनाडूत या सुरुंगाना मागणी फार ! सहापट भाव मिळतो ! त्यामुळे सुरुंग गुजरातच्या बाहेर चोरून नेणे काही नवीन गोष्ट नाही. सुरुंगास एक प्रकारच्या विशिष्ट दारूचा वास येतो. हा वास नीट सांभाळला तर सुरुंग बाहेर नेणे अवघड नाही. नंतर नंतर तर दोन दोन मोटारी भरून सुरुंग बडोद्याच्या बाहेर नेण्यात येऊ लागले. भरत पटेल व शरद पटेल यांच्या दगडाच्या खाणी हलोल (पावागढ) गावी आहेत. त्यामुळे त्यांना सुरुगांचे मोठे लायसेन्स आहे. दोन-चार सुरुंग नीट लावले तर टाइम्स् ऑफ इंडियाची इमारत मोठ्या प्रमाणावर हादरेल ! दहा–बारा सुरुंग लावले तर ती इमारत खालीच येईल.

भरत पटेलच्या दगडाच्या खाणीवर जॉर्ज फर्नांडीस व इतर निवडक दोन-तीन मंडळी सुरुवातीला 'टेस्ट' करण्यासाठी गेली होती. खाणीवर रोजच स्फोट होतात; त्यात दोन-चार स्फोट कमी-जास्त ! त्यामुळे सुरुंगवाल्यांचे प्रयोग कोणाच्याही डोळ्यात आले नाहीत.

कटातील सारी मंडळी सुस्थितीतील होती.

मित्रांना सांगितले जाई, 'अहमदाबादेस जायचे आहे, तुझी गाडी पाहिजे !' आणीबाणीची वेळ ! गाडी दिली जाई; पण 'अ' 'ब'ला सांगे, 'ब' 'क'ला सांगे व 'क' शेवटी 'ड'ची गाडी देववी ! एकदा 'ड'च्या ड्रायव्हरने 'क'च्या ड्रायव्हरला, 'क'च्या ड्रायव्हरने 'ब'ला व 'ब'ने 'अ'ला सांगून टाकले, 'अरे, गाडी अहमदाबादेस या लोकांनी नेलीच नाही ! आणि गाडीतून भलत्याच गोष्टी नेल्या होत्या !'

तेव्हाच वाटले होते की, हे गुपित फार वेळ टिकून राहणार नाही. लोक 'सुरुंग', 'सुरुंग' म्हणून कुजबुजू लागले होते; पण आणीबाणीचा फार मोठा फायदा मिळाला ! रोज एवढ्या अफवा पसरत असत ! लोक म्हणू लागले, ही सुरुगांची अफवा ! ते म्हणत, गोमियात रोज दहा हजार सुरुंग तयार होतात, काय हे विरोधी लोक दोन-चार सुरुंगांच्या स्फोटांनी साधणार होते ?

सुरुंग-प्रकरणाचे रामायण मोठे आहे. रेड्डीनी त्यास न्यायच दिला नाही, असे खेदाने म्हणावे लागते. साऱ्या भारतभर एकंदर अठरा स्फोट झाले. ते रेड्डीनी नीट सांगायला नको होते ? भारतभर एवढे प्रचंड जाळे सांभाळायचे तर त्यास माणसे किती लागतील ? जॉर्जने त्यासाठी संघटना कशी केली असेल ? हे प्रशिक्षण जॉर्जने कोठे मिळविले असेल ?

एकदा जॉर्जला अहमदाबादेस जायचे होते. त्यासाठी मित्राची गाडी पाहिजे होती. हा मित्र अहमदाबादेस जाणार होता. त्याची समती घेण्यात आली. प्रवासी कोण होता हे मात्र सांगण्यात आले नव्हते; पण आयत्या वेळी हा प्रवासी फिरकलाच नाही !

हा मित्र ही गोष्ट नंतर विसरूनही गेला. 'सुरुंग-केस'मधून सुटल्यावर गप्पात विषय निघाला. 'त्या दिवशी जॉर्ज येणार होता तुझ्याबरोबर,' असे जेव्हा त्याला कळले तेव्हा या मित्राच्या हृदयाचा एक ठोका चुकला ! 'पण जॉर्ज का आला नाही ?' असा प्रश्न त्याने विचारताच उत्तर मिळाले, 'आला असता, पण गाडीत दोन स्त्रिया व मुले-बाळे आहेत असे कळले म्हणून कार्यक्रम आयत्या वेळी रद्द करण्यात आला !'

'पण त्यात काय झाले असते ?'

'जॉर्ज म्हणाला, समजा गाडी पोलिसानी पकडली असती व तुझ्या मित्राला अटक झाली असती तर चालले असते; पण त्या दोन निष्पाप स्त्रियांना व मुला-बाळाना माझ्यामुळे उगीच त्रास भोगावयाला लागला असता– ते मला चालणार नाही !'

माझ्या मित्राच्या दोन्ही गालांवरून आसवे खाली आली. □

# एका मुक्तिलढ्याची सतरा वर्षे

दत्ता सावळे । देविदास सावंत

माळशिरस तालुक्यातलं एक खेडं. कुरबावी. सोलापूर जिल्ह्याच्या एका टोकाला, पुणे–सातारा जिल्ह्याच्या सीमेवर असलेलं. सहा साखर कारखान्यांनी वेढलेलं. जिथली अर्धी–अधिक जमीन शेतीमहामंडळाकडे गेलेली आहे; जिथली शिवार पळाटी–उसाच्या पिकाने भरलेली आहेत अस. आधुनिक शेती–तंत्रे आत्मसात करीत असलेलं. आधुनिक संस्थात वावरणारं; पण आधुनिक विचारांना निकरानं विरोध करणारं एक लहानस खेडं. कुरबावी.

गावात धनगराची वसती सर्वांत जास्त. मराठे त्यामानाने थोडे; महार, मांग, ह्लर, रामोशी या दलित व इतर जाती. न्हाव्याची दोन–चार घरं. गुरव, परीट, ब्राह्मणाचं एक-एक घर. चाळीस एक घरं महारांची. वीस-पंचवीस मागांची. या दोन दलित जातीची संख्या इतराच्या मानाने थोडी जास्त. असं हे गाव उच्चवर्णियांच्या मते, साठ सालापर्यंत कसं एकीनं राहात होतं. भाडण नाही, तंटा नाही. महाराच्या डोक्यात कली शिरला नि गावाचा 'विस्कोट' झाला.

१९६० साल. महाराच्या–दलितांच्या मुक्तिलढ्याच्या सुरुवातीचं वर्ष. तो लढा आज सतत सतरा वर्षे सुरू आहे. या लढ्याने अनेक वळणे घेतली. तो लढा अनेक पदरी होत गेला. गेली सतरा वर्षे ज्या चिवटपणे व समजून हा लढा दलितमडळी लढत आहेत, त्याने आशा वाटते. अभिमानही वाटतो. त्यांनी मिळविलेल्या यशापयशातून इतराना शिकण्यासारखं खूप आहे. साठ साली मुक्तीचा विचार त्या गावात आला. त्या विचारानी दलिताची मने काबीज केली. नवे विचार खेड्यात शिरत नाहीत. शिरले तरी त्या भूमीत चिकटत नाहीत, ही तक्रार तेथे खरी ठरली नाही. साठ सालातल्या एका रात्री सारी महारमडळी एकत्र बसली. त्यात पुरुष होते, स्त्रिया होत्या. कुणी तरी हा प्रस्ताव मांडला. 'आपण महारकीची कामं सोडायची. माणसासारखं जगायचं !' कुठल्या 'राजकीय' भांडणासाठी नव्हे; कुठल्या वैयक्तिक हेव्यादाव्यापोटी नव्हे. निव्वळ माणूसपणाच्या ओढीनं. 'सर्वांकडे सुधारना होतेय. आपुनबी मागं र्‍हायाचं नाही' या ऊर्मीने ! सर्वांनी ठरवलं. 'गाव-कीची कामं करावयाची नाहीत. मयताची घार खणायची नाही. मढ्याची आरती ओवाळायची नाही. मयताची लाकडं फोडायची नाहीत. आपण देवीचं पोतराज नाही. माणसासारखं मजुरी करून जगायचं. गावातल्या मागितलेल्या शिळ्या तुकड्यावर नाही जगायच !' दुसऱ्या दिवशी हा निर्धार गावाला नम्रपणे सागितला. गावकरी मडळींना हे लागलं. 'माजली की महारं,' सर्वांना वाटलं. स्पृश्य गाव एकत्र बसलं. सारं गाव बोलावलं. वाड्या बोलावल्या. सारी पुरुष मडळी. बाया अर्थातच नव्हत्या. सकाळी दहापासून दुपारी चारपर्यंत सभा चालली. गावानं ठरवलं, 'गावाची कामं बंद, तर महाराना गाव बद !' गावात महाराना प्रवेश द्यायचा नाही. काम द्यायचं नाही. कुठली चीज-वस्तु द्यायची नाही. गिरणी बद. सारे व्यवहार बंद. हे वहिष्काराचं वृत्त दवंडीने साऱ्याना कळविण्यात आल. हा महारमडळींवरील बहिष्कार तब्बल पंधरा दिवस चालला. त्यांचे खूप हाल झाले. 'पावण्याकडनं बैल आणून जमिनीची मेहनत केली. आसू, शिंदेवाडी इकड मजुरीपायी गेलो. गावात वस्तु मिळाली नाही. चद्रपुरी सेक्शनवरील भडारातून एकदम वस्तू आणल्या. त्रास खूप झाला; पण आपल चुकलय असं वाटल नाही. जिद्द वाढली. भंडारातून आणलेल्या वस्तू वाजत-गाजत गावात आणल्या !'

बारामतीला जाऊन पवार वकिलांकडून तारा केल्या. तेव्हा बाहेरच्या जगाला हे वृत्त कळलं. चौकशीची चक्र फिरली. फौजदार गावात आले. त्यानी सदिच्छा व्यक्त केली. हे प्रकरण गावातच मिटावं. गावाची तयारी होती. वांधा होता महारांचा. फौजदारानी महारमंडळीना समजावलं, गावाचं चुकलंय.; पण शेवटी सर्वांना गावात राहायचंय. विसरून जा. मिटवून घ्या. महारमंडळी ऐकेनात. फौजदारानी नैतिक धाक घातला, 'तुम्ही मिटवून घेतलं नाहीत, तर मी गावात पाणी-देखील घेणार नाही !' मडळी बावरली. त्यांनी सागितलं. 'तुम्ही जेवून घ्या. आम्ही तुमचं ऐकू !' फौजदार जेवले. महारमडळींनी साहेबांना सागितलं, 'साहेब, आमचा दोन दिवसात माळशिरसला मोर्चा आहे. मोर्चा झाल्याशिवाय आम्हाला मिटवून घेता येणार नाही. आमच्यासाठी बाहेरची मडळी येणार आहेत. त्याचा विचार घेतल्याखेरीज आम्ही मिटवून घेणार नाही !' माळशिरसचा मोर्चा झाला. मोर्च्यानंतर फौजदारानं सर्वांना बोलावून घेतलं. गावकरी होते. महारमंडळीही होती, गावकऱ्यांनी माफी लिहून दिली. म्हणाले, 'आमी चुकलो. खाल्लेलं शेण ओकायला लावू नका!' झालं. तडजोड झाली. 'कुठल्याही प्रकारचा त्रास पुढे होणार नाही,' अस आश्वासन गावकऱ्यांनी दिलं. सर्व मडळी मिळून गावी आली आणि काही काळ गावकरी चागल वागले. चांगलं बोलले. या लढ्यात एक कमाई झाली. धनगरमंडळीतील एका लहानशा गटाची सहानुभूती महाराना मिळाली; पण एका गटाच्या मनात हे सारं सलत राहिलं. या गटाचे नेते होते व आहेत अण्णा पाटील. दुसरीही एक गोष्ट घडली. महारांनी गावकीची जी कामं सोडली, ती गावानं मागाच्यावर लादली. महाराऐवजी आता माग मेलेली गुरं ओढू लागले. मयताच्या बातम्या पोचवू लागले. तुकडे मागू लागले. आम्ही महारमडळींना विचारलं. 'यानी काय साधलं ? तुम्ही माणसं झालात. मांगाची स्थिती आणखी दयनीय झाली ! आपली मुक्ती त्यांचीही मुक्ती ठरू शकणार नाही का ?' महारमडळींनी स्पष्ट कबुली दिली. 'हे आमच्या मनाला फार लागलं; पण आम्हाला काही करता आलं नाही. मागांची परिस्थिती आमच्याहूनही वाईट आहे. त्याना

कार्पोरेशनमध्ये काम मिळत नाही. खाजगीत, शेतकऱ्याकडेच त्यांना मजुरीला जाव लागतं. ते कार्पोरेशनमध्ये काम मागायला गेले, तरी त्याना काम देत नाहीत. दोन मांगांची घरे पूर्वीपासून कार्पोरेशनमध्ये कामावर आहेत. त्यांनी गावकीची कामं तर सोडलीतच; पण चऱ्हाट वळण्याचा परंपरागत धंदाही ते करीत नाहीत. आम्ही गावकीची कामं सोडली, कारण रोजी खात्रीची होती, कंपनीकडे. पुढे कार्पोरेशनकडे खात्रीचं काम होतं. मांगाच्या रोजीच असं जमल्याखेरीज काही खरं नव्हं.' आम्ही त्यांना आणखी विचारलं, 'गावकऱ्यांनी चांभाराना का नाही सागितलं गावकीची कामं करायला ?' त्यांच उत्तर अस, 'चाभाराना सागितलं असतं तर ते गाव सोडून गेले असते. मागाना गाव सोडताही येत नाही व गावाला नाही म्हणताही येत नाही.' हे अपयश महारमडळीना तीव्रपणे जाणवले आहे.

काही वर्षे अशीच गेली आणखी एक प्रकरण उद्‌भवल. गावात एक नवीन ग्रामसेवक आले. मराठा. एके दिवशी त्यांना पंचायतीच्या स्त्री सभासदाच्या घरी जेवायला बोलावले. तिथे त्यांनी भलताच वाह्यातपणा केला. त्या घरच्या लेकीशी अयोग्य वागला. बाईनं शिव्या देऊन त्याला घरातून हाकलून दिले. गाव काही झाल्या गोष्टीबद्दल ग्रामसेवकाला जाब विचारीना. तेव्हा पंचायतीचे एक दलित सदस्य व महाराचे प्रमुख श्री. ज्ञानु दनाने यांनी त्या ग्रामसेवकाला खडसावले. शिवीगाळ झाली. गावाला राग आला, महारान एका मराठ्याला शिवीगाळ केली याचा. त्या गरीब धनगरबाईच्या लेकीची खोड काढल्याबद्दल राग येण्याऐवजी, ग्रामसेवकाला महारांनी शिव्या दिल्याबद्दल राग आला. अण्णा पाटील व त्याचे पाठीराखे जमाव करून, महारवस्तीवर आले. जमावाने दगडफेक केली. महारांनीही त्याला उत्तर दिले. प्रकरण चिघळणार, असं महारांना वाटलं. 'महारांच्या झोपड्या पेटणार' अशी वदंता कानावर आली. महारांनी रात्रीचे पहारे बसविले. शेवटी सरपंच आनदराव पाटील याच्या मध्यस्थीने हे भांडण मिटलं; पण या भाडणात, महारांची साथ करणाऱ्या एका प्राथमिक शिक्षकाची ताबडतोब बदली करण्यात आली.

आणखी काही दिवस गेले. लढ्याचं क्षेत्र आता गावाबाहेर गलं. अण्णा पाटील रामोशी मडळीशी बोलले. रामोशांचे पुढारी दगडू चव्हाण यांना सांगण्यात आले की, या महारांची खोड मोडायची. तिथे काय ठरले कोण जाणे; पण महारमंडळी चद्रपुरी सेक्शनवर जेथे वॉचमन म्हणून काम करीत होती, तिथं गुर सोडली जाऊ लागली. उसाचं वाडं तिथून चोरीला जाऊ लागलं. महारमंडळीच्या हे ध्यानात आलं की, आपल्याला त्रास देण्यासाठी हे सुरू आहे. महारमडळीनी ही सारी हकीकत ऑफिसरच्या कानावर घातली. अधिकाऱ्याने रामोशाना तंबी दिली. त्याचा डूख धरून महाराचे प्रमुख कार्यकर्ते ज्ञानु दनानेंना मारहाण झाली. केस झाली. तसे रामोशी अण्णा पाटलांना घेऊन चद्रपुरी सेक्शनवर आले. महाराना सागितलं, 'हे प्रकरण मिटवून घ्या. पुन्हा आश्वासन. 'जनावरं तुमच्या हद्दीत शिरणार नाहीत! आम्ही तुमची खोड काढणार नाही.' केस मागे घेतली. महारमडळीच्या हे लक्षात आले की, आता रामोशाना हाताशी धरून आम्हाला त्रास देणार. तेव्हा ते रामोशांच्या वस्तीवर गेले. त्यांना समजाविल. 'आपण दोघे सारखेच. महारात–रामोशात काही झगडा नाही. अण्णा पाटलांच्या सांगण्यावर जाऊ नका. आपण एकीनं राहू.' त्या वेळी रामोशी मडळी हो म्हणाली; पण पुढे वागली वेगळ्या प्रकारे. त्यांच्याकडे युनियनचे पुढारीपण पुढे आले.

## निवडणुकीतील हार-जीत

याच काळात कुरबावीत ग्रामपचायतीच्या निवडणुका लागल्या. अण्णा पाटलाचे चुलते श्री. नामदेव अप्पाजी पाटील, वॉर्ड नं. दोनमधून उभे होते. त्या वॉर्डात एक राखीव व एक जनरल अशा दोन जागा होत्या. त्या दोन्ही जागावर महारमंडळी निवडून आली. श्री. महादेव भागवत हा महार जनरल जागेवर निवडून आला. अण्णा पाटलाचे चुलते हरले. 'तू अर्ज का काढून घेतला नाहीस ? तू मला पाडलेस, महारानी मला पाडले. माझे नाक कापले !' नामदेव अप्पाजी म्हणू लागले. त्यानी महादेव भागवत व त्याच्या दोन मित्राना घरी बोलावून, आपला राग व्यक्त करून मारले. हा लढा असा अधिकाधिक गुंतागुतीचा बनत चालला. महारांच्या स्वाभिमानाची कळ कार्पोरेशनमध्ये मिळणाऱ्या खात्रीच्या रोजीत आहे हे अण्णा पाटील व त्याच्या सहकाऱ्यांना उमगायला फारसा वेळ लागला नाही. तो वेळपर्यंत कामगारांच्या युनियनमध्ये या महारमंडळीचेच वजन होते. त्या वेळी श्री. ज्ञानु दनाने आठ सेक्शनच्या शेतमजुरांच्या युनियनचे उपाध्यक्ष होते. त्यांनी आपल्या भावाला मोसमी कामावर घेतले. त्याला तीन नंबरचे काम म्हणतात. (नंबर एकचे ते कायम कामगार, नंबर दोनचे म्हणजे कायम नव्हेत; पण ज्यांना वर्षभर मजुरी मिळते. नबर तीनचे म्हणजे, फक्त मोसमासाठी घेतलेले. ) तेव्हा रामोशानी या दनानेंच्या भावाला मारहाण केली. त्याला सोडवायला गेलेल्या त्यांच्या दुसऱ्या भावाला, धनाजी दनानेंनाही मारायला सुरुवात केली. त्याना ते रामोशी वसतीकडे घेऊन जाऊ लागले; पण धनाजी पळून सेक्शन ऑफिसरच्या बंगल्यात गेले व ओरडून म्हणाले, 'आता काय मारायचे ते मारा !' अधिकारी बंगल्याबाहेर आले. त्यानी कार्पोरेशच्या फौजदाराना बोलावले. जीप आली. महारांना जीपमध्ये घेण्यापेक्षा, ज्यानी त्यांना मारले त्या रामोशीमंडळीना जीपमध्ये बसवून माळशिरसला घेऊन गेले. त्याच्याबरोबर अण्णा पाटील होते. रामोशानी गेटवर तक्रार नोंदविली. त्यांच्याबरोबर पोलीसपाटील होते. त्यांची तक्रार पक्की झाली. महारांना एस्. टी. ने माळशिरसला जावे लागले. त्यांच्या तक्रारीची नोंद कच्ची झाली. दोघावर चॅप्टर झाली. मामलेदारापुढे आली. त्यानी दोन्ही केसेस फाइल करण्यास सांगितले.

यामुळे रामोशीमंडळीना धीर आला. वामन सावंत या फोरमनला त्यानी मारहाण केली. ही केस नोदविण्यास वामन सावतबरोबर ज्ञानु दनाने गेले. हे निमित्त करून १९७४ साली बाजारादिवशी बाजार करून ते परत येत असताना त्याचा पाठलाग केला. घरी पळत येऊन, त्यांनी घराची दारेखिडक्या बद केल्या. त्यांच्या घरावर त्या दिवशी लाह्या फुटाव्यात, तसे दगड फेकले. ही बातमी कुरबावीत कळली. दनानेंच्या समाचाराला पाच–सहा महारमंडळी चंद्रपुरी सेक्शनवर आली. रामोशांना हे कळताच त्यांनी लाठ्या–काठ्यासह येऊन त्यांना बेदम

मारले. एकाचा हात मोडला. बाकी सर्वांनाही फार मार बसला. केस केली. खूप तारखा झाल्या. या केसमध्ये श्री. दगडू चव्हाणाच्या मुलाला-विश्वनाथला व आणखी एक-दोन जणांना शिक्षा होणार असा रंग दिसू लागला. तसे बोलले जाऊ लागले. तेव्हा पुन्हा भीड घालायला सुरुवात झाली. दगडू चव्हाण स्वतः दनानेकडे जाऊन म्हणाला, 'माझी लेकरं तुरुंगात घालून तुला काय मिळणार ? बघा. घ्या मिटवून !' याच सुमारास महारांना महामंडळावर नंबर दोन वा तीनच्या कामावर घेणे बंद झाले. अण्णा पाटील आले; त्यांनी गळ घातली. 'माया दाखविली' व दबावही आणला. म्हणाले, 'मिटवून घ्या ! तुमची माणसं कामावर घेतो. हात तुटलाय त्याला हलकं काम देतो. दोन वर्षं तुरुंगात गेली तरी ती केव्हा तरी बाहेर येणारच. याचं उट्टं ते काढतील ! कशाला उपाशी मरताय ? तुमची सर्व माणसं कामावर घेतो.' मधल्या-काळात दनाने याचे युनियनचे उपाध्यक्षपद गेले होते. रामोशाचे पुढारी श्री. दगडू चव्हाण अध्यक्ष झाले होते. तडजोडीच्या गुंत्यात महार सापडले. पुन्हा त्यांनी पड खाल्ली. तडजोड झाली. महारांना काम मिळाले. हात मोडलेल्याना तोडीवाल्याचं हलकं काम दिलं. तोडणी बंद झाली. कामही बंद झालं. आपण ती तडजोड मान्य केली, याचा फार पश्चात्ताप आज महारमंडळीना होतोय.

आता चालू वर्षातली घटना. या वर्षीच्या एप्रिलमध्ये सदाशिवनगर येथील शंकर सहकारी साखर कारखान्यात श्री. शंकरराव मोहिते पाटील यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणला होता. त्यासाठी कुरबावीत दोन बैठका झाल्या. अविश्वासाच्या ठरावाला पाठिंबा दर्शविण्यासाठी श्री. शामराव पाटलाची सभा झाली. या ठरावाला विरोध दर्शविण्यासाठी श्री. शंकरराव मोहित्याचीही सभा झाली. शंकररावाच्या सभेला महारांनी यावे म्हणून रामोशाचे पुढारी दगडू चव्हाण गळ घालण्यासाठी आले. त्यांना महारमंडळीने येवढेच सांगितले की, सभा अण्णा पाटील यांच्या घरी असेल, तर आम्ही येणार नाही ! त्याची सभा अण्णा पाटलाकडेच झाली. अण्णा पाटील हे शंकरराव पाटलांचे खास सहकारी. त्या साखर कारखान्याचे पदाधिकारी. बैठक त्यांच्याच घरी होणार. महारमंडळी दोन्ही सभांना गेली नाहीत. त्यांची सहानुभूती सहाजिकच अविश्वासाच्या ठरावाच्या बाजूने होती. हेही तेथल्या मंडळींना लागले. जुन्या झगडयांना नवे फुटवे येऊ लागले. जेवढे खुडाल तेवढे नवे व अधिक फुटवे फुटतच राहिले.

आणखी एक महत्त्वाची घटना याच सुमारास घडली. वालचंदनगरला शुगर वर्कर्स युनियनची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. आणीबाणीनतरची ही पहिली सभा. गेली तीन-चार वर्षे दगडू चव्हाणाचे तेथे राज्य होते. त्यांना संरक्षण होते अण्णा पाटलांचे. दुसऱ्यांना कामापायी लाचार करून, त्यांना लुटण्याचा नवा धंदा सुरू झाला. चंद्रपुरी सेक्शनवर अक्षरशः गुंडगिरीचे राज्य स्थापन झालेले आहे. हा एक स्वतंत्र लेखाचाच विषय आहे. या नेतृत्वाला विरोध करण्याचे सर्व कामगारांनी ठरविले. कुरबावीच्या महारमंडळीचा याबाबतीत पुढाकार होता. या सभेत ७५-७६ सालाचा अहवाल माडण्यात आला. कुरबावीच्या धनाजी दनानेनी विरोध केला. ७४-७५ चा अहवाल मांडून, मजूर झाल्याखेरीज तुम्हाला पुढला अहवाल माडता येणार नाही, हा त्याचा मुद्दा होता. कामगारांचा विरोध वाढला. 'आधी निवडणुका जाहीर करा ! मग अहवालाचे बघू !' कामगारानी एकमुखी सांगितले. अध्यक्ष दगडू चव्हाण यानी सभा बरखास्त केली. ते व त्यांचे सहकारी ट्रकने निघून गेले. त्या दिवसापासून कुरबावीच्या महारांना शिवीगाळ सुरू झाली. त्यांच्या नबर तीन व नंबर दोनच्या कामावरील कामगारांना चंद्रपुरी सेक्शनवर काम देणे बंद करण्यात आले. एके दिवशी सागण्यात आलं, 'कालचं काम अपुरं असेल त्यानीच फक्त आज कामावर थाबावं. इतराना युनियनच्या सागण्यावरून कामावर घेण्यात येणार नाही !' एकाचे आधले दिवसाचे काम अपुरे होते. तो कामाला लागला, तर त्याला अध्यक्षाच्या मुलाने कामावरून हाकून दिले. त्याच्या दुसरे दिवशी मंडळी हजेरीवर गेली. काम नाही. असे तीन-चार महिने काम बंद आहे. शिवपुरी सेक्शनच्या इस्टेट मॅनेजरकडे ह्या मंडळीनी तक्रार केली. त्यानी सागितले, 'कामावर घेऊ, पण आधी मालकाची चिठ्ठी आणा !' महारकामगारानी विचारलं, 'मंडळाचे मालक कोण ?' इस्टेट मॅनेजर डाफरले, 'गावचे आहात की परगावचे ? मालक कोण माहीत नाही ?' दगडु चव्हाण- हे नुकते वारले. याची मुले विश्वनाथ, चंद्रकांत ही मालकमंडळी. या मालकमंडळीनी महारांना सुटे गाठून सागायला सुरुवात केली; 'तुम्ही ज्ञानूच्या नादी लागू नका. आमच्या मागे या ! तुम्हाला कामावर घेतो !' हा बंदोबस्त बिगर कायम कामगाराचा. कायम कामगाराचा बंदोबस्त मारामारीने करण्यात आला. महाराचे पुढारी ज्ञानु दनाने यांच्या मध्यमवयाच्या बायकोच्या अंगाशी ती धुणे धुण्याला गेली असता झोबाझोंबी केली. तिला व इतरांना त्यानी दाखवून दिले की, पहा तुमच्या पुढाऱ्याच्या अब्रूची आमच्या लेखी काय किंमत आहे ?

## तेरा हजार कामगारांची साथ !

गेल्या महिन्यात भगवान भागवत, धनाजी दनाने, विलास दनाने आदी पाच-सहा मंडळी रेशन आणण्यासाठी चंद्रपुरीच्या भाडारात गेली असताना, परतताना त्यांना सुटेसुटे गाठून चोपण्यात आले. धनाजी दनाने याना खूप मारले. त्या वेळी स्वत. अण्णा पाटील जातीने हजर होते. मार्गदर्शन करीत होते. 'निशाणी होऊ देऊ नका. चागला चोपा. युनियनमध्ये विरोध करतो काय ?' धनाजीला दोन दिवस दवाखान्यात राहावे लागले. तक्रार गुदरली आहे; पण आजवरच्या तक्रारीचे जे झाले तेच याही तक्रारीचे व्हायचे. त्या दिवसापासून चंद्रपुरी सेक्शनवरील कायम कामगारही कामावर जात नाहीत. जावे तर मार बसतो, न जावे तर भुके राहावे लागते, दरम्यान युनियनच्या निवडणुका लागल्यात. दहा-पंधरा दिवसांत निवडणुका आहेत. जिद्दीचे विरोधक असे पोटात गुतलेले. पुन्हा ह्या दादामंडळीना निवडणूक जिंकण्याची आशा वाटते. ते निवडून आले तर अन्यायाचे हे दुष्टचक्र सुरूच राहणार. कायम महार कामगारानी चंद्रपूर सेक्शनवरून बदली मागितली आहे, पण या निवडणुकीत आपली दुःखे सर्व कामगारांना सांगायची, हा पण त्यानी केला आहे. तेरा हजार कामगार आहेत. त्यांनी याचे दुःख आपले मानले तर प्रश्नाची सोडवणूक शक्य आहे. ही एक त्याची शेवटची

आशा आहे.

कुरबावीच्या या मंडळीचा लढा नुसता सामाजिक नाही, नुसता आर्थिकही नाही. एकदा अण्णा पाटलाना विचारले होते, 'तुमचा महारांचा राग केव्हा व कसा जाईल?' त्यांनी उत्तर दिले ते नमुनेदार आहे. ते म्हणतात, 'त्यानी आमचे धंदे पूर्वीसारखे करावेत. पायरीने राहावे. मग सारं मिटेल.' साखर-कारखाने, शेती-महामंडळ, कामगारांच्या संघटना सारे काही आहे. विचार, नेतृत्व सरंजामी आहे. समतेचा घोषा करणाऱ्यांच्या पोटाच्या नाड्या आपल्या हाती आहेत. त्याना एकमेकांविरुद्ध उभे करण्यासाठी, हवी तशी समाजव्यवस्था आहे. गमत अशी की, एवढ्या समृद्ध भागात अद्याप किमान वेतन दिले जात नाही. अद्याप पुरुषाना अडीच व स्त्रियांना दीड-दोन रुपये वेतन खाजगी शेतकऱ्यांकडे दिले जाते. महामंडळावर जी रोजी आहे त्यात राजकीय-सामाजिक दृष्ट्या आवड-निवड करण्याची सोय हाती आहे. विरोधाभास असा की, महामंडळाच्या कामावरील कायम कामगारांना किमान वेतनाच्या जवळजवळ तिप्पट मजुरी मिळते. कायम कामगार तेरा हजार आहेत; पण या दोन्हीतून शक्ती उभी रहात नाही. राजकीय-सामाजिक जाणिवा कधी विकसित होऊ दिल्या जात नाहीत. तेथील केंद्रीय नेतृत्व अण्णा पाटलांसारख्याना मदत करणारे. युनियनचे नेतृत्व त्यांना बांधील. तेरा हजार कामगारांची संघटना असून तेथे किमान वेतनाची अंमलबजावणी होत नाही. या तेरा हजार कामगारांची जाणीव—संघटित जाणीव—ही त्यांच्या संरक्षणाची हमी आहे.

आजवर सरकारी नोकरांनी एक तर तटस्थ भूमिका स्वीकारली किंवा प्रतिष्ठिताच्या बाजूने ते उभे राहिले. उघडपणे, कधी छुपेपणे. त्याची वा तिथल्या प्रस्थापितांची या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी ही तात्पुरते पाहण्याची, तुकड्यातुकड्याने पाहण्याची राहिली. सुदैवाने अनेक चुका हातून होऊनही, कुरबावीच्या महारमंडळींनी तात्कालिकतेच्या पुढे पाहिले. सतरा वर्षे त्यावर विश्वास ठेवून झुंजत राहिले. इतिहास-प्रवाहाची आपल्याला अनुकूलता आहे, हे नैसर्गिकरीत्या त्यांना जाणवले होते. इतिहास-प्रवाहाविरोधी प्रयत्न यशस्वी होणार नाहीत, त्यांना अंतिमतः हार खावी लागणार आहे हे ते जाणून आहेत. धनाजी एकदा अण्णा पाटलांना म्हणाला होता, 'पाटील, तुमचे हजार दिवस असतील; पण आमचाही एक दिवस उजाडणार आहे.' या दलिताच्या आमूलाग्र परिवर्तनाच्या सुप्त इच्छेशी इमानदार राहील, त्याला आकार देईल व त्याकडून आकार घेईल असा राजकीय पक्ष, असे राजकीय नेतृत्व मिळेल का? तात्कालिकतेच्या शेवाळ्यापलीकडे जाणाऱ्या ऊर्मीशी साथ करणारं! □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[ टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी. ]

# महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा ( उत्तरार्ध )

## दर्जा सतत घसरताच !

सतीश कामत

मराठी रंगभूमीवर सध्या अनुवादात्मक नाटकं सादर करण्याची एक प्रथाच पडत चालली आहे. उद्देश असा की, आपल्याला नवीन कल्पना लढवता किंवा फारसं डोकं न चालवताच चांगल्या, संघर्षात्मक 'थीम्स्' मिळू शकतात; शिवाय नाटकातल्या पात्राची नाव एतद्देशीय नसणं हे नाटकाच्या मोठेपणाचच एक लक्षण हल्ली वाटू लागलं असावं. नाही म्हटलं तरी 'वातावरण-निर्मिती' ला त्यांचा उपयोग होतो.

संस्कृत विद्या मंदिरनं सादर केलेलं 'राजा इडिपस' हे याच पठडीतलं नाटक. इडिपस हा मोठा झाल्यावर आपल्या पित्याचा वध करणार आणि मातेशी विवाहबद्ध होणार, असं एक भाकित असतं. त्यामुळं तो अत्यंत लहान असतानाच त्याला जगलात सोडून दिलं जात. पुढ तो मेंढपाळांच्या सहवासात वाढतो, मोठा होतो. आपल्या पराक्रमाने राज्य स्थापन करतो. एकदा रस्त्यामध्ये त्याची गाठ त्याच्या पित्याशी पडते. हा आपला पिता आहे, हे इडिपसला माहीत नसतं, तर हा आपलाच मुलगा आहे, हे त्या वृद्ध पित्याला माहीत नसतं. दोघाची बाचाबाची होते, तलवारी उपसल्या जातात आणि इडिपस आपल्या पित्याचाच अजाणतेपणाने शिरच्छेद करतो. भाकिताप्रमाणे, ही आपली माता आहे हे माहीत नसल्याने, तो त्या वध केलेल्या राजाच्या पत्नीशी विवाहबद्ध होतो. अर्थात हे सगळं गुंपित टायरसिस नावाच्या वृद्ध मेंढपाळाकडून उलगडलं जातं आणि या सबंध प्रकाराच प्रायश्चित्त म्हणून इडिपस स्वतःचे डोळे फोडून घेतो आणि राज्यत्याग करतो.

संस्कृत विद्या मंदिरच्या या नाटकात राजा इडिपसचं काम श्री. राजन कालेकर यानी केलं आहे. त्याचं व्यक्तिमत्त्व आणि आवाज भूमिकेशी सुसंगत असाच होता; पण अभिनय आणि बोलणं या दोन्हीतही ते फार कमी पडले. त्यांनी उच्चारलेले कित्येक शब्द आणि वाक्य प्रेक्षकापर्यंत पोचलीच नाहीत. त्यामानाने टायरसिसचं काम करणारे श्री. बावा कुलकर्णी यानी वृद्ध मेंढपाळाचं बेअरिंग चागलं सांभाळलं. श्री. विश्वनाथ लिमये यांनी क्रेऑ या राजाच्या सेनापतीची भूमिका चागली वठविली. नाटकाला दिग्दर्शन डॉ. ए. डी. जोशी याच होतं; पण ते कुठेच फारस जाणवलं नाही.

आयकर-विभाग, मनोरजन व क्रीडा मंडळाच्या वतीने 'स्वर जुळता गीत-तुटे' हे तीन अकी नाटक सादर झालं. यापैकी पहिले दोन अंक म्हणजे 'अभिरूप न्यायालय' च होतं. एका 'पुणेरी' शेजाऱ्यापासून तर मिस रूपादेवी या नटीपर्यंत सर्वजण या न्यायालयात साक्ष देऊन जातात.

या न्यायालयात खटला भरला गेलाय एका नोकरी करून आपल्या बदफैली बापाला आणि तीन लहान भावडाना साभाळणाऱ्या तरुण मुलीवर. कारण या छदिष्ट बापाच्या त्रासाला कटाळून ती आपल्या तिन्ही भावंडासह समुद्रावर जीव द्यायला जाते. तसा प्रयत्नही करते. त्यामध्ये भावंडं वाहून जातात, मरण पावतात; पण हिला मात्र एक मानसशास्त्राचा प्राध्यापक वाचवितो. त्यामुळे भावडाचा खून आणि आत्महत्येचा प्रयत्न, असे दोन आरोप तिच्यावर असतात. आता नाटकच म्हटल्यावर, ती या आरोपांमधून सही-सलामत सुटते.

तिसरा अंक याच मुद्द्यावर सुरू होतो. या तरुणीचं वकीलपत्र घेतलेला तरुण वकील तिच्या प्रेमात पडतो; पण बापाला हिने विवाह करणं मान्य नसत, झेपणार नसतं. तिचा अजून बराच उपयोग त्याला करून घ्यायचा असतो. तिच यापूर्वीचं एक प्रेम-प्रकरणही त्यानं याच उद्देशानं फिसकटवून टाकलेलं असतं. या वेळी तर तो तिला त्याच्या एका गुड 'बॉस' कडे पाठवायचं ठरवितो आणि त्या बदल्यात आपलं सारं कर्ज माफ करून घेतो. आता मात्र त्या तरुणीच्या सहनशीलतेच्या मर्यादा सपतात आणि ती हातातल्या कात्रीनेच तिच्या जवळ येऊ पाहणाऱ्या निर्दयी बापाचा खून करते.

पहिले दोन अंक निरनिराळे साक्षीदार, वकिलाचे चाणाक्ष सवाल-जबाब यामुळे मनोरजन करतात; पण तिसऱ्या अंकाचा मात्र त्रास होतो. अर्थात नाटकाच्या दृष्टीने तो आवश्यक आहे. नाही तर, हे नाटक म्हणजे खरोखरच नुसतं 'अभिरूप न्यायालय' च होईल; पण या आवश्यकतेपोटीच की काय, हा तिसरा अक चिकटविल्यासारखा वाटतो. तसंच सबध नाटकच, मेलोड्रॅमॅटिक पातळीवरच कुठं तरी अडकून पडतं.

नाटकाच दिग्दर्शन श्री. मधू जोशी याचं आहे. त्या दृष्टीने अपेक्षाभंगच झाला. विनया ताबे याच काम ठीक झाल. बाकी उल्लेखनीय काही नाही.

पी. डी. ए. या पुण्यातल्या एका जुन्या आणि नामांकित संस्थेने 'लार्क' हे नाटक सादर केलं. हे नाटकही अनुवादितच आहे.

श्री. अजित सातभाई यांनी हा अनुवाद केलेला आहे.

एकाच वेळी राजसत्ता आणि धर्मसत्ता याच्याशी झगडणाऱ्या जोनची ही कथा आहे. सबध नाटक म्हणजे एक सघर्षच आहे. हा संघर्ष जोनवर केंद्रित झालेला आहे. तिला एकाच वेळी धर्मसत्तेने तिच्यावर ठेवलेल्या आरोपानाही उत्तर द्याव लागतं आणि राजसत्तेमध्ये बऱ्याच वेळा अनुभवाला येणाऱ्या आडमुठेपणाशीही मुकाबला करावा लागतो; पण शेवटी समाजातील या दोन प्रखर सघटनांपुढे जोनला हार खावी लागते आणि त्यातच तिचा अंत होतो.

श्री.अजित सातभाई यानी अनुवाद चागला केला आहे; पण नाटक प्रभावी वाटण्यासाठी अशा प्रकारच्या संघर्षामध्ये लागणारा सवा-दांचा खटकेबाजपणा त्याच्या लिखाणात नाही. बऱ्याच वेळा जोन स्वत च्या वर्तनाचे स्पष्टीकरण देताना, लाबलचक भाषणंच ठोकते. त्यामुळे काही प्रसग कंटाळवाणे होतात. नाटकामध्ये पात्र भरपूर आहेत. त्यामुळे काही वेळा स्टेजवर पात्रांची फारच गर्दी झाल्यासारखी वाटते. जोनचं काम करणाऱ्या उज्ज्वला पारसनीस प्रभावी वाटतात. स्पर्धेच्या दृष्टीने मात्र या नाटकाला चान्सेस चांगले आहेत.

भरत नाटयमदिराच्या 'आउट सायडर'ने फार मोठी हवा निर्माण करून ठेवली होती; प्रत्यक्षात मात्र नाटकाने निराशाच केली.

अल्बर्ट कामूच्या 'आउट सायडर' या कादंबरीच श्री. अरविंद भोमे यानी मराठी-मध्ये केलेलं हे नाटय रूपांतर आहे. नाटक अनुवादाच्या दृष्टिकोनातून कच्चं वाटतंच; पण एक नाटयप्रयोग म्हणूनही त्यात कच्चे-पणा राहिलेला आहे.

एका तरुणाभोवती हे सबंध नाटक गुफलेल आहे. हा एक अत्यत थड डोक्याचा निर्विकार माणूस. सर्वच गोष्टीं-बद्दल त्याला असणारा हा निर्विकारपणा, एक प्रकारचा indifference, आईच्या अंत्य-सस्कारापासून तर त्याला एका अरबाच्या खुनाबद्दल शिक्षा होते तेव्हाही कायम राहतो.

कादंबरीमध्ये घडणारे बहुतेक सर्व प्रसग हाच ठसा मुख्यत्वे उमटवितात. किंबहुना कामूची ही कादबरी डोकं भणाणून सोडते ती या पात्रामुळेच; पण नाटकामध्ये हा परिणाम फारसा कुठेच साधला जात नाही.

नाटकाच नेपथ्य सुखद आहे; पण त्यामध्ये सेटस् हलवताना फारच धादल उडते. काही वेळा तर स्पॉट लाइट चालू झालेला असतानाच खोलीच्या पार्टिशनचा एक भाग सरकत सरकत स्टेजवर येतो किंवा स्टेजवरून विंगेत ओढला जातो. सगीताचा वापर चागला आहे; पण काही वेळा हे पार्श्वसंगीत फारच कर्कश वाटते. प्रमुख पात्राच्या, तरुणाच्या भूमिकेत श्री. राजीव कानडे योग्य वाटतात दिग्दर्शनात श्री. अनत कुलकर्णी फारसा प्रभाव पाडू शकलेले नाहीत.

ललित कला महामंडळ, बिल्वदल नाटय-शाखा या सस्थेने श्री. रवींद्र देशपांडे यानी लिहिलेलं आणि दिग्दर्शित केलेल 'आवर्त' हे नाटक सादर केलं.

एका, काहीच जमल नाही म्हणून भगवी वस्त्रं धारण करणाऱ्या, बुवाबाजीचं ढोंग करत असतानाच किमान स्वत.शी प्रामाणिक असणाऱ्या, एका बुवाभोवती हे नाटक केंद्रित झालेल आहे. गावच त्याला 'बुवा' बनवतं, त्याची पूजा–अर्चा करण्यात धन्यता मानतं. गावच्या पुढाऱ्यापासून तर गरीब शेतकऱ्या-पर्यंत सर्वजण याच्याच सल्ल्याने वागत असतात; पण निवडणुकीच्या वेळी बुवा पुढाऱ्याच्या प्रचारसभेचा नारळ फोडण्याचं नाकारतो आणि एका पत्रकाराला हाताशी धरून पुढारी बुवाविरुद्ध कुभांड रचतो. बुवाला जनतेने दान म्हणून दिलेल्या पैशा-मध्ये अफरातफर केल्याच्या कारणावरून कोर्टात खेचल जातं; पण सार गाव त्याच्या मागं उभं राहातं.

या नाटकातही थोडस 'न्यायालय' आहेच. शिवाय त्यामध्ये एक ढोबळ चूक म्हणजे, फिर्यादीचा वकील आधी भाषणं करतो आणि नतर आरोपीची जबानी होते. नाटकामध्ये भजनांचा मुक्त वापर केलेला आहे. (आता बुवा म्हटल्यावर भजन आलच, म्हणा.) तसंच कोरस म्हणून सुमारे २०–२५ पात्रं स्टेजवर भजनाच्या ठेक्यावर नाचतात, हे जरा त्रासदायक होतं.

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीलाच बुवांच्या शिष्याच काम केलेले श्री. शरद करमरकर एक भजन म्हणतात. ते म्हणतात चागलं; पण प्रत्यक्ष नाटकाशी त्याचा काहीच सबध वाटत नाही. उगीच वेळ मारून नेण्यासाठी ते टाकल्यासारखं वाटतं. यातलं बुवाच पात्र हल्ली 'बुवा' म्हटल्यावर डोळ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या व्यक्तिरेखेपेक्षा बरंच निराळं आहे, सभ्य आहे. तो एक सामान्य माणूस होता, हे सिद्ध करण्यासाठी बुवाच्या पूर्वायुष्यातील एक प्रेम-प्रसंगही टाकायला लेखकानं कमी केलेलं नाही. लहान गावा-मधलं जीवनही त्यातल्या ताण-तणावासह बऱ्यापैकी उभं केलेलं आहे.

तर असा हा महाराष्ट्र राज्य नाटय-स्पर्धेच्या पुणे केंद्राचा उरूस. भयकर अपेक्षा-भंग करणारा. ही दहा-अकरा नाटकं पाहिल्या-नतर नव, देण्यासारख अस, मराठी रंगभूमी-जवळ काही शिल्लक राहिल आहे की नाही, अशी चिंता मनात निर्माण होते. कारण एक तर 'अश्रूंची झाली फुले' सारखी जुनाट सामाजिक, कौटुंबिक अश्रुपाताची नाटकं सादर होतात, नाही तर समुद्रापलीकडच्या वाङ्मयाचे ठिसूळ अनुवाद ! दिग्दर्शन अभिनयाच्या बाबतीतही या स्पर्धेमधून फार नवीन कोणी वर येताना दिसत नाही. एकूण, काय, अवघा आनंदीआनंद; पण मराठी नाटयरसिकाला खिन्न करणारा !!

## समाप्त

हिंदी चित्रपट

# परवरिश

सदानंद बोरसे

'जैसे किशन यशोदा के यहाँ पला था।' हे एक वाक्य उच्चारण्याची चूक समशेरसिंग ( शम्मी कपूर ) करतो आणि त्याचा परिणाम बिचाऱ्या प्रेक्षकाला भोगावा लागतो– 'परवरिश' नावाचा सिनेमा पाहणे त्याच्या नशिबी येते

म्हणजे होते काय की, मंगलसिंग डाकू ( अमजदखान ) वर घातलेल्या छाप्यात त्याची बायको मरताना आपले नवजात अर्भक इन्स्पेक्टर समशेरसिंगच्या हाती सोपविते आणि त्याला 'शरीफ इन्सान' बनविण्याचें वचन समशेरसिंगाकडून घेते. हा आदर्श इन्स्पेक्टर त्याला घरी आणतो आणि त्याची आदर्श पत्नी ( जी आदर्श माताही असतेच ) त्याचा आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ करते. तर इन्स्पेक्टरपुत्र किशन आणि डाकूपुत्र अमित कलेकलेने वाढू लागतात. त्यांचे लहानपणचे खेळही त्यांचे पाळण्यातील पाय दाखविणारे असणारच; म्हणजे डाकू बनलेल्या किशनला अमितने इन्स्पेक्टर बनून शोधणे, किशन शाळा बुडवून सिनेमा पाहणे, फी लपास करणे असे उद्योग करीत असल्याने वडील नेहमीच त्याला शिक्षा करीत. एक दिवस जेलमधून सुटलेला मंगलसिंग आपल्या मुलाची मागणी करायला येतो आणि 'मुलगा द्यावा की नाही,' याचा पत्नीशी विचारविनिमय करीत असलेला समशेरसिंग वरील वाक्य उच्चारतो. किशनला कोडलेले असताना तो बापाचे हे वाक्य ऐकतो आणि स्वत च मंगलसिंगचा मुलगा असल्याचा गैरसमज करून घेतो. मग या समजामुळे मंगलसिंगच्या टोळीत सामील होऊन किशनने ( विनोद खन्ना ) गुन्हे करीत राहणे, इन्स्पेक्टर अमितने ( अमिताभ बच्चन ) अनेक हिकमती लढवीत त्याच्या पाठलागावर राहणे, भाऊ–भाऊ आणि बापलेकांमधील 'कर्तव्य की नाते' हा पारंपारिक संघर्ष आणि शेवटी सर्व गुते अचानक उलगडून पोलीस कमिशनरने आपल्या गुन्हेगार बापाच्या 'हाथोंमें हथकडियाँ' घालून त्यांना 'कानून के हवाले' करण्याचा सोहळा पार पाडणे, हे आज–कालच्या हिंदी चित्रपटाच्या पाचवीला पुजलेले चक्र आलेच! आता दोन हिरो म्हटल्यानंतर जोडीला दोन हिरॉइन्स येणे अपरिहार्य आहे त्या येतात त्याही सरळ नायकाशी प्रेम करणे ( म्हणजे थोडेसे बागडणे, थोडेसे गाणे आणि थोडेसे लग्न अशी मजामजा करणे ) एवढ्यापुरत्याच येत नाहीत; तर किशनची हिरॉइन शब्बो ( शबाना आझमी ) अस्सल पाकिटमार आणि अमितची नीतू ( नीतू सिंग ) घड्याळचोर! या दोघीही सख्ख्या बहिणी. अरेच्या, हा कलंक ( बहिणी असण्याचा नव्हे, चोर असल्याचा ) या मुलींवरून कसा मिटवावा बरे? आपल्या मंगलसिंगला धरा ना वेठीला! मग मंगलसिंगने पुराण्या दुश्मनीतून त्यांच्या आई–बापांना मारल्याने या बेबस, बेसहारा मुलींना बदमाश बनवून टाका! तर अशा रीतीने हें उपकथानकाचे एक शेपूट मूळ कथेला जोडले जाते. ( किंवा मूळ कथानकाच्या शेपटाला उपकथेचा प्राणी जोडला जातो. ) गुन्हेगारीचेच कथानक म्हटल्यावर एक बॉस, काही अड्डे ( त्यांपैकी एक पाणबुडी ), किशनचा संभावितपणा, अमितच्या युक्त्या, सोबत दोघाच्या 'माँ'च्या मनाची कौटुबिक ओढाताण ही सगळी तोंडीलावणी आलीच! अरे हो, शिवाय अमितची 'मंगलसिंगचे सुपुत्र' ही ओळख पटविण्यासाठी त्याच्या गळ्यात भवानीमातेचा ताईत आला आणि तिचा अमितला असलेला आशीर्वाद पटविण्यासाठी जीवघेण्या हल्ल्यातून ताइतामुळे अमित वाचणे ओघाने आलेच. ( धंद्यासाठी निर्माते व दिग्दर्शक एखाद्या मातेवर वा बाबावर विसंबून राहण्याऐवजी जर थोडे दर्जेदार चित्रपट काढू लागले; तर–? अगदी 'आत्याबाईला मिशा असत्या; तर–?' होतय का? ) हे सगळे मिळून आबालवृद्ध स्त्री–पुरुषांना रुचणारा कौटुंबिक रहस्यमय समाजपट तयार होतो आणि इतर अनेकांप्रमाणे धदा करून जातो.

या चावून चावून चोथा झालेल्या कथला पुन्हा चरकातून काढून रसात बुडवायचा प्रयत्न केलाय तो अभिनेत्यांनी (किंवा त्यांच्या ग्लॅमरने.) अमिताभ बच्चनने गुन्हेगारांविषयी चीड असणारा नेक इन्स्पेक्टर नेहमीच्या टाइपात उभा केला आहे. विनोद खन्नालाही गुन्हेगाराच्या भूमिका आतापर्यंत बऱ्याच मिळाल्याने त्याचाही अशा भूमिकांचा सराव चांगला झाल्याचे प्रत्ययाला आले. दोघांनी मारामाऱ्याही अत्यंत मनापासून केल्या आहेत. शम्मी कपूरचे पहिल्या पाच मिनिटांतील घळे चालणे व जीपमध्ये बसणे सोडले तर रुबाब आणि शरीर दोन्ही त्याच्या वालिदांची – पृथ्वीराज कपूरची – आठवण करून देणारे. शबाना आझमी ज्या भूमिकांमध्ये चांगले 'दिसण्या'चा प्रयत्न करते, त्यात हमखास फसते. अंकुर, निशांत, स्वामी, शक इत्यादी चित्रपटांतून अभिनयाचे वेगवेगळे पैलू दाखविणाऱ्या या समर्थ अभिनेत्रीने 'चोर–सिपाही', 'अमर-अकबर-अँथनी' आणि आता 'परवरिश' या चित्रपटांमधून आवारा लडकी उभी करण्याचा लागोपाठ चालविलेला प्रयत्न धंद्याच्या (आणि कदाचित कलेच्या) दृष्टीने प्रामाणिक असेलही; पण तिला तो perfect साधला नाही एवढे खरे. याउलट उच्छृंखल, शोख, नटखट अशी गुड घड्याळचोर, नीतू सिंगने झकास उभी केली आहे गोड दिसण्याची, उत्तम नाचण्याची आणि कॅमेऱ्याची कमतरता भरून काढण्याची तिच्याकडून असलेली अपेक्षा ती पूर्ण करते, अभिनयाच्या वाटेला ती फारशी जात नाही; तरीही शबाना व नीतू या दोघीजणी जेव्हा समोरासमोर येतात तेव्हा नीतूच्या grace पुढे शबाना कमी पडते व नीतू भाव खाऊन जाते. विशेषत: दोघीच्या नाचण्याच्या वेळी तर शबानाचे नाचणे नीतूपुढे 'इस्किलाड' वाटते अमजदखान मूळात खुनशी दिसतोच, त्यातही 'शोले'मधील गब्बर त्याच्या बोलण्यात, हसण्यात डोकावला की पब्लिक हमखास टाळी देते. अमित स्वत चा मुलगा आहे, हे समजल्यावर त्याने प्रेमाने मुलाची केलेली मनधरणी मात्र चित्रपटातील विनोदाची बाजू एकदम जड करते देवकुमारने पुन्हा एकदा, त्रासिक चेहऱ्याने डोळे वटारणे व दात विचकणे याशिवाय आपल्याला काही येत नाही हे सिद्ध केले. अभिनेत्यामध्ये

आणखी एक उल्लेख करावासा वाटतो तो 'सुप्रीमो'ची भूमिका करणाऱ्या कादरखानचा. संपूर्ण चित्रपटात अक्षरशः पाच ते सात मिनिटे असलेली ही भूमिका त्याने अजितच्या शैलीत (cold-blooded चेहरा, थंड, निर्विकार बोलणे, भरीला स्वत:चा खर्जातील आवाज.) झकास वठवली आहे; पण कथानकातील त्याची एकूण व्यक्तिरेखाच बड्या बॉसला न शोभेशी, कणखरपणात कमी रंगवली आहे. पहिल्यापासूनच तो 'सुप्रीमो' न वाटता काहीसा असहाय वाटत राहतो. इंद्राणी मुकर्जीने typical हिंदी 'माँ' उभी केली आहे

दिग्दर्शक मनमोहन देसाईंबद्दल काय बरे बोलावे? 'अमर-अकबर-अँथनी' त या गड्याने अक्षरशः पाईपलाईन्स टाकून त्या तिघांच्या अंगातून त्यांच्या आईच्या अंगात रक्त भरले होते. 'परवरिश', हाही 'धरम-वीर', 'अमर-अकबर-अँथनी' च्याच पठडीतील. पोलीस कमिशनरच्याच घरातील सर्वजणांची घड्याळे वा पाकिटे एकाच वेळी मारली जाणे असे चवीपुरते हलके फुलके प्रसंग फुलविणे सोडले तर बाकी हा गृहस्थ डोक्याला फारसा ताप घेत नाही. कधी कधी तर आपण पडद्यावर चित्रमाध्यम पाहण्याऐवजी एखादे पारपारिक नाटक पाहत आहोत, असे वाटण्याइतपत हे दिग्दर्शन ठिसूळ होते. चित्रपटाची गती मात्र बऱ्यापैकी, म्हणजे उठून जाण्याइतपत कंटाळा न येण्याइतकी वेगवान ठेवली आहे. (ही किमया थोडीशी कथेची, थोडीशी संकलकाची, थोडीशी अभिनेत्याची व त्यांच्या ग्लॅमरची आणि बरीचशी आपल्या सहनशीलतेची आहे.)

लक्ष्मीकांत प्यारेलाल काही दिवसांतच 'एऽ ताशा, वाजंत्री, लग्न-मुंजीला बँड वाजवणारेऽ' अशा हाळ्या देत रस्त्याने फिरणार, याची आगाऊ निशाणी म्हणजे 'परवरिश'चे संगीत. अपवाद फक्त काही पार्श्वसंगीताच्या तुकड्यांचा आणि 'आइये, शौकसे रहिये' या गीताचा. अर्थात या गीताच्या बरेपणात एल. पीं. पेक्षा आशा भोसलेंचाच वाटा जास्त.

मजरुह सुलतानपुरीची गीते म्हणजे एक तर 'अर्थशून्य भासे मज' हे टोक, उदाहरणार्थ-'अरे व्हरो- जरा सुन लो' हे गाणे किंवा एकदम पुढील प्रसंगाची सांकेतिक भाषेत मांडणी, उदाहरणार्थ-'हम प्रेमी प्रेम करना जाने' हे गीत आणि शेवटची कव्वाली. हिंदी सिनेमातील अशी सांकेतिक गाणी म्हणजे संपूर्ण चित्रपटाचा तथाकथित कलाटणी बिंदू किंवा नाट्यमयता एका गाण्यात भरण्याचा अट्टाहास असतो आणि हा साराच प्रकार पोलिसाने चोराला 'चोरा, चोरा, मी तुला अमुक वेळी, अमुक वाजता पकडणार आहे हं ऽ,' असा फोन करून सावध करण्यासारखा असतो तरीही प्रत्येक चित्रपटात असे एक तरी गाणे घालण्याचा हट्ट असतोच. 'सब जनता का है' हे गाणे लोकसभा निवडणूक निकालानंतर खास निर्मात्याच्या 'फर्माइशी तौरपर' घातल्यासारखे वाटते.

राहता राहिले या चित्रपटातील स्टंटस् व हाणामाऱ्या. फाइट कंपोजर रवी खन्नांनी ही दृश्ये अत्यंत जोरकसपणे घेऊन दिग्दर्शकाची बरीच कामगिरी हलकी केली आहे. अर्थात यात त्यांना विनोद खन्ना व अमिताभ बच्चन यांच्या (किंवा त्यांच्या डमीजच्या) शरीरयष्टीचाही भरपूर उपयोग झाला आहे; पण या दोघांच्या एकमेकांमधील किंवा इतरांबरोबरच्या हाणामाऱ्या तरी किती पाहायच्या?

तांत्रिक अंगे ठीक, हे विधान आता हिंदी चित्रपटांच्या बाबतीत नेहमीचे व त्यामुळेच गुळगुळीत झाले आहे; पण तंत्रांबाबतीत कोणतेही वैशिष्ट्य न आढळल्याने त्याच विधानाचा मीही आसरा घेतो.

धंदा म्हणून चालून कला म्हणून हिंदी चित्रपटाचे वाटोळे करणारे जे हाताच्या बोटांवर मोजता न येण्यासारखे चित्रपट आज निघतात, त्यांच्याच परंपरेतील हाही एक! ☐


प्रकाशित झाले

कालच्या
बायसिकल थीव्हजपासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी-विदेशी
चित्रपटांची
ओळख

टच

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
दहा रुपये


टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील सभासदांनी आपले पुस्तक संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावे.

अवती – भवती : पृष्ठ ६ वरून

तर, असे सत्तांतर झालेच तर त्यामध्ये आपल्याला उजवी भागी, किमान पक्षी बरोबरीची वाटचाल मिळाली पाहिजे, असा शेकापचा दावा आहे. त्याच्या कोल्हापूर मेळाव्यातही ही सुखद स्वप्ने तरंगताना दिसली. दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'लिंक' ने कोल्हापूर मेळाव्यासंबंधी तसेच या प्रादेशिक पक्षाच्या राजकीय भवितव्यासंबंधी आपल्या ताज्या अंकामध्ये एक वार्तापत्र प्रसिद्ध केले आहे कोल्हापूरमधील हे अधिवेशन मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणामध्ये सपन्न झाले. राज्याच्या तेवीस जिल्ह्यातून चार हजारावर प्रतिनिधी या अधिवेशनासाठी आले होते. कर्नाटकातूनही काही मडळी आली होती, बेळगाव, कारवार, निपाणीसह...! हा परिचित नारा चागलाच गाजला आणि अर्थातच या मागणीचा पाठपुरावा करणारा ठरावही पास झाला शे. का. प. ची मदार दोन गोष्टींवर आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये पराभूत झालेली कॉंग्रस या दारुण पराभवानंतर हतबल झाली असून एक सतेज राष्ट्रीय पक्ष असे जे कॉंग्रेसचे स्थान होते, ते आज राहिलेले नाही. शेकापचे सस्थापक-सदस्य भाऊसाहेब राऊत, चिटणीस एन्. डी. पाटील, खासदार दाजिबा देसाई या सर्व प्रमुख नेत्यांनी कॉंग्रेसच्या एकसूत्री कारभाराचे दिवस भरले असल्याची पोच दिली. साखर–सहकाराची पेरणी करून कॉंग्रेसने ग्रामीण महाराष्ट्रात आपले पाय घट्ट रोवले असले तरीही कॉंग्रेसचा पराभव करून पर्यायी सरकार येऊ शकेल याची ग्वाही शेकापच्या नेत्यांनी दिली. महाराष्ट्रामध्ये ज्याला ग्रामीण भागामध्ये थोडे–फार वजन आहे असा शेकाप हा कॉंग्रेसखेरीज एकमेव पक्ष आहे.या पक्षाचे अस्तित्व कुलाबा, सातारा, कोल्हापूर, बुलढाणा, उस्मानाबाद आणि भिर या जिल्ह्यामध्ये विशेष प्रकर्षाने जाणवते. शेकापची स्थापना–बहुजन मराठा समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे या कल्पनेतून झाली; परंतु यशवंतरावाच्या हाती सत्ता आल्यावर त्यांनी सर्व जाती–जमातींना चुचकारून स्वत:चे स्थान पक्के केले, पक्षाची ताकद वाढविली आणि १९५७ साली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन जोरात असताना झालेल्या निवडणुकाचा अपवाद वगळता कॉंग्रेसला आव्हान देईल असा पक्षच उरला नाही. सहकाराची पेरणी करून कॉंग्रेसने आपले पाय घट्ट रोवले आणि अनेक समाजवादी आणि शे. का. पक्षामधील नेतेमंडळी कॉंग्रेसमध्ये सामील झाली शे. का. पक्षाची वाढ खुरटल्यासारखी झाली. त्यानी विधानसभेच्या काही जागा जिंकल्या तरी ग्रामीण भागामध्ये जातीय वृत्तीने काम करणारा पक्ष असेच त्या पक्षाचे स्थान राहिले. आपले कार्यक्षेत्र विस्तारले जावे आणि नागरी–भागातही आपल्याला पाठिंबा मिळावा म्हणून शेकापच्या नेत्यांनी नागरी भागातील कष्टकरी वर्गाच्या तक्रारीविरुद्ध झेडा उभारला. प्रागतिक पक्ष म्हणून शेकापने आपली प्रतिमा उजळ केली तरी प्रादेशिक मर्यादामध्ये काम करणारा पक्ष हे त्याचे स्वरूप निश्चित झाले. नेत्यानीही या मर्यादा ओळखल्या. त्यामुळे आतरराष्ट्रीय प्रश्नांवर किंवा देशाच्या परराष्ट्रीय धोरणावर मतप्रदर्शन करण्याची तकलीफ या पक्षाने कधीही घेतली नाही शे. का. प. च्या जुन्या मतप्रणालीचे दाखले आणि दाभाडी सिद्धाताची आठवण काही नेत्यानी कोल्हापूरच्या या अधिवेशनामध्ये जरूर दिली; परंतु मार्किस्ट-लेनिनिस्ट विचारसरणीचा पक्ष म्हणून आपले नाव व्हावे, असे जर या पक्षाला वाटत असेल तर शेतकरी आणि कामगार याचा विश्वास संपादन करणारी यंत्रणा पक्षाजवळ असणे जरूर आहे. आज नेमका याच गोष्टीचा अभाव आहे. अधिवेशनामध्ये भूमिहीनाची सघटना बांधण्याचा जो ठराव मजूर झाला तो अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण मानला पाहिजे.

## वाढत्या महत्त्वाकांक्षा

जनता पक्षाबरोबर हातमिळवणी करून लोकसभा निवडणुकीच्या वेळी पक्षाने पाच जागा जिंकल्यापासून पक्षाच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. कॉंग्रेस विरोधी वातावरणामध्ये आपल्याला भरपूर जागा मिळतील, असे त्याना वाटते. निवडणुकीनंतर जनता पक्षाबरोबर आपण सत्तेतील वाटेकरी होणार याबद्दल विश्वास वाटत असला तरी जनता पक्षाबरोबर दीर्घकाळ जमवून घेणे कितपत जमण्यासारखे आहे, याबद्दल शंकाच आहे. कामगारावर आणि शेतमजुरांच्या मेळाव्यावर गोळीबार करू नये असे पक्षाला वाटते गोळीबार झाल्यास चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्याना शिक्षा करावी, गोळीबाराला बदी असावी असे पक्षाचे धोरण असले तरी अपरिहार्य परिस्थितीमध्ये गोळीबार गृहीत धरलेला आहेच. कमाल जमीन धारणेबाबतचे धोरण आणि जमीनसुधारणाविषयक कायदे याबाबतही शेकापचे जनतावाल्यांबरोबर जमणे कठीणच आहे. ओरिसा आणि गुजराथमध्ये तर जमिनीच्या कमाल धारणेबाबतच्या मर्यादामध्ये वाढ करावी अशी, हालचाल आहे. सत्तासपादनाच्या आत्मविश्वासाची पायाभरणी अशी भुसभुशीत पायावर झाली आहे. जागाचे वाटप करतानाही शेकाप सध्या तरी अवास्तव भूमिका घेत आहे आज परिस्थिती अशी आहे की, महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेसचा पराभव करायचा असेल तर सर्व विरोधी पक्षानी एकत्र येऊन एक विरुद्ध एक अशी लढत देणे आवश्यक आहे. एकट्याच्या ताकदीवर आपण कॉंग्रेसची सत्ता संपवू शकत नाही हे जनतावाले ओळखून आहेत. शेकापने जनतापक्षाबरोबर हातमिळवणी करताना निर्विवाद दुय्यम स्थान स्वीकारले तरच या दोघामध्ये तडजोड होऊ शकेल. अर्थात घोडेमैदान जवळच आहे काय भले–बुरे व्हायचे आहे ते महिन्याभरात उरकून पक्षाला झरझरून निवडणुकीच्या कामाला लागावे लागेल.

## एका मंत्रिणबाईंच्या पुनर्वसनाची कथा

हरियानाच्या मजूरमंत्री सौ. सुषमा स्वराज्य याना आपण मत्रिमंडळातून वगळत असल्याची घोषणा राज्याच्या मुख्यमंत्र्यानी फरिदाबाद येथे कारखानदारांच्या मेळाव्यामध्ये बोलताना केली. फरिदाबादच्या औद्योगिक वसाहतीमध्ये १४४ वे कलम पुकारण्यात आले. या निर्णयाविरुद्ध मजूरमंत्र्यानी आवाज उठविला. लगोलग मुख्यमंत्र्यानी त्यांचीच उचलबांगडी केली; पण प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. जनता पक्षाच्या

वरिष्ठ नेत्यानी हालचाल केली आणि मुख्यमंत्री देवीलाल यांना निर्वासित केलेल्या या मंत्रिणबाईंचे पुन्हा पुनर्वसन करणे भाग पाडलें. हरियानाच्या मुख्यमंत्र्यांचे मंत्रिमंडळामधील महिला सहकाऱ्याबरोबर तेवढे पटत नसावे असे दिसते. कारण महिला–मंत्र्यांच्या बाबतीत त्यांच्या राज्यामध्ये उद्भवलेले हे दुसरे प्रकरण. या प्रकरणामध्ये गोवल्या गेलेल्या सुषमाबाईंना या साऱ्या प्रकाराबाबत काय वाटते ? मंत्रिमंडळातून वगळले गेल्यानंतर आणि पुन्हा घेण्यात आल्यानंतर त्यांनी ज्या प्रतिक्रिया नोंदल्या आहेत त्या खालील प्रश्नोत्तरांमध्ये पहावयास मिळतात.

**प्रश्न** : हरियानाचे माजी मुख्यमंत्री बन्सीलाल यांनी ज्या पद्धतीने चंद्रावती यांना मंत्रिमंडळातून काढले होते त्या पद्धतीमध्ये आणि तुम्हाला ज्या प्रकारे काढण्यात आले त्यामध्ये तुम्हाला साम्य वाटते काय ?

**उत्तर** : मला ज्या पद्धतीने काढण्यात आले ती पद्धत अतिवाईट होती. चंद्रावतीजीना राजिनामा देण्याचा पर्याय तरी सुचविला होता. त्यांनी नकार दिल्यावर त्यांना वगळण्यात आले. मला मात्र माझ्याशी कोणताही संपर्क न साधता वगळण्यात आले. मला ते कळल्याबरोबर मी जनता पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्याकडे माझा राजिनामा पाठविला.

**प्रश्न** : तुम्हाला वगळण्यात आल्याचे वृत्त कसे समजले ?

**उत्तर** : मी ते आकाशवाणीवर ऐकले.

**प्रश्न** : तुम्हाला याबद्दल काय वाटते ?

**उत्तर** : मी काय सांगणार ? ( एक उदास हास्य ) माझे नशीब, की मी घरी होते. समजा, जर मी सरकारी मोटारीमध्ये वगैरे असते तर त्यांनी गाडी थांबवून मला चंद्रावतीजीप्रमाणे खाली उतरण्यास सांगितले असते.

**प्रश्न** : हरियानामध्ये १४४ वे कलम पुकारण्याबाबत तुमचे काय मत आहे ?

**उत्तर** : त्यामुळे परिस्थिती आणखी खराब झाली. कामगारांना अशी बंधने आवडत नाहीत. एकत्र जमून आपल्या प्रश्नांची चर्चा करणेही शक्य नाही, असे त्याना वाटू लागते.

**प्रश्न** : फरिदाबाद येथील कारखानदार आणि उद्योगपती तुमच्याविरुद्ध आहेत असे तुम्हाला वाटते काय ?

**उत्तर** : नक्कीच ते माझ्या विरोधात आहेत. मला मंत्रिमंडळातून वगळण्यात यावे असेच त्यांना वाटत होते आणि त्यामध्ये ते यशस्वीही झाले.

**प्रश्न** : मुख्यमंत्र्यांबरोबर तुमचे संबंध कसे होते ?

**उत्तर** : आमच्यामध्ये कधीही संघर्ष झाला नाही.

**प्रश्न** : तुमच्या हकालपट्टीचे काय परिणाम होतील ?

**उत्तर** : पुन्हा एका चांडाळचौकडीचा उदय होतो आहे. आता त्यांना आणखी किती यश मिळते ते पहायचे.

**प्रश्न** : बन्सीलाल आणि देवीलाल यामध्ये तुम्हाला काही साम्य आढळते काय ?

**उत्तर** : हरियानाने आपली दुर्दैवी परंपरा तशीच चालवली आहे. बन्सीलाल बरे, असे म्हणण्याची वेळ देवीलाल यांनी आणली आहे.

**प्रश्न** : कारखानदाराच्या मेळाव्यात तुमच्या हकालपट्टीची घोषणा झाली याला काही विशेष अर्थ आहे काय ?

**उत्तर** : या घोषणेमुळे मुख्यमंत्री उघडे पडले आहेत. कारखानदारांबरोबर त्यांनी केलेली हातमिळवणी माझ्या हकालपट्टीबरोबर पूर्ण झाली.

**प्रश्न** : आता पुढे काय करणार ?

**उत्तर** : आता गोष्टी हाताबाहेर गेल्या आहेत. मी जनतेसमोर आणि कामगारांसमोर माझी बाजू मांडीन.

हाताबाहेर गेलेल्या या गोष्टी जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने लक्ष घातल्याने पुन्हा आवाक्यात आल्या. बाईंना पुन्हा समारंभपूर्वक मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आले. त्यानंतर...

**प्रश्न** : पुन्हा मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आले, याबाबत आपली प्रतिक्रिया काय ?

**उत्तर** : छान, मी समाधानी आहे. माझे पुनर्वसन हा जनता पक्षामधील लोकशाही शक्तीचा विजय आहे.

**प्रश्न** : मुख्यमंत्र्यांच्या विरोधी गटाबरोबर हातमिळवणी करून हरियाना सरकार उलथून टाकण्याचे तुमचे प्रयत्न होते, असे सांगितले जाते.

**उत्तर** : माझ्या हितशत्रूंनी या अफवा पसरवल्या आहेत. विशेष करून जुने जनसंघीय या आघाडीवर एकत्र आले आहेत. मला सांगा, लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेले हे सरकार, मी स्वतः त्याची एक जबाबदार घटक असताना, ते उलथविण्याचे प्रयत्न करण्याचे कारणच काय ? मी कॅबिनेट दर्जाची मंत्री असून माझ्याकडे आठ खाती आहेत, हे माझ्या विरोधकांनीही विसरू नये.

**प्रश्न** : हरियानामध्ये तुमचे काहीही काम नसताना केवळ जॉर्जच्या शिफारशीमुळे तुम्हाला मंत्रिमंडळामध्ये घेण्यात आले, हे खरे काय ?

**उत्तर** : छे, हे मुळीच खरे नाही. जॉर्जनं माझ्यासाठी कधीच शब्द टाकला नाही. माझ्या हकालपट्टीचीही त्याला माहिती नव्हती. मला पुन्हा मंत्रिमंडळामध्ये घ्यावे असा निर्णय ज्या बैठकीमध्ये घेण्यात आला त्या बैठकीलाही तो हजर नव्हता... माझ्या विरुद्ध काही मंडळींनी मुख्यमंत्र्याचे कान फुकले आणि माझी हकालपट्टी झाली. आता माझ्या पुनरागमनामुळे त्या मंडळींचा आवाज बंद झाला आहे. □

## □ कर्पूरी ठाकूर × राम जयपालसिंग यादव

वादळग्रस्त बिहारचे वादळग्रस्त मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर रविवार दि. १८ रोजी

एक महत्त्वपूर्ण निवडणूक लढवीत आहेत, बिहार विधानसभेच्या या पोटनिवडणुकीमध्ये त्यांच्याविरुद्ध कॉंग्रेसचे राम जयपालसिंग यादव दंड थोपटून उभे आहेत. मधुवानी जिल्ह्यामधील या मतदारसंघामध्ये १ लक्ष १० हजार मतदार असून यादव मतदारांची संख्या ३५ हजार आहे. ब्राह्मण सुमारे वीस हजार, रजपूत पाच हजार व मागासलेल्या जमातीचे सुमारे १६ हजार मतदार आहेत. कर्पूरी ठाकूर यांनी हा मतदारसंघ 'सुरक्षित' म्हणून निवडला असला तरी निवडणूक चुरशीची होईल असा अंदाज आहे. या मतदारसंघात सात हजार मुसलमान मतदार असून हरिजन मतदारांची संख्या बारा हजार आहे. कर्पूरीजींना हा गुतागुतीचा मतदारसंघ तसा नवीनच आहे. १९७४ पर्यंत त्यानी समस्तिपूर जिल्ह्यातील ताजपूर मतदारसघाचे प्रतिनिधित्व केले आहे. छात्र युवासंघाच्या मागणीप्रमाणे त्यांनी राजिनामा दिला आणि गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ते समस्तिपूरहून निवडून आले. ते आता ज्या मतदारसघातून विधानसभेची निवडणूक लढवीत आहेत तो मतदारसंघ झांझरपूर लोकसभा मतदारसंघाचा भाग असून या मतदारसघातून मंडल हे समाजवादी उमेदवार लोकसभेवर निवडून गेले आहेत. तथापी नजीकच असलेल्या झांझरपूर व मधापूर विधानसभा मतदारसंघातून गेल्या वेळी कांग्रेस उमेदवार विजयी झाले होते. आता कर्पूरी ठाकूर यांच्या विरोधात असलेले राम जयपालसिंग यादव हे छात्र मतदारसंघातून पूर्वी पराभूत झाले होते. आता या पोटनिवडणुकीमध्ये त्यांना कॉंग्रेसपक्षाचे पूर्ण सहाय्य असून माजी मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रा हे त्याच्यासाठी काम करीत आहेत. बिहारमध्ये जाती–जमातीचे वर्चस्व आहे आणि या मतदारसघामधील जातवार जडण-घडण यादव यांना अधिक अनुकूल आहे. मुसलमान, हरिजन व ब्राह्मण यांचा आपल्याला पाठिंबा मिळेल, असे यादव यांना वाटते. हरिजन व अन्य मागासलेल्या जातीची मते अर्थातच आणि निश्चितपणे कर्पुरी ठाकूर याना मिळतील. त्यात कर्पूरीजींनी राज्य सरकारच्या सुमारे पन्नास टक्के जागा या मागासवर्गीयासाठी राखून ठेवल्या जातील, अशी घोषणा त्यांनी अलीकडेच केली आहे. निवडणुकीवर डोळा ठेवून केलेल्या या घोषणेचा त्यांना फायदा मिळेल. बिहारच्या जनता सरकारने कांग्रेस पक्षाला आणि आणीबाणीला नावे ठेवण्या खेरीज काहीही केलेले नाही. या नकारात्मक कामगिरीची पुंजी फार काळ टिकणार नाही. कारण त्यानी केले नाही ते झाले; पण 'सत्ता मिळाल्यापासून तुम्ही काय केले ते सांगा!' असे मतदार विचारतात आणि त्याला उत्तर नाही. तथापि भ्रष्टाचाराने बजबजलेल्या बिहारमध्ये कर्पूरीजी– निष्कलंक म्हणून ओळखले जातात, या गोष्टीचा त्यांना फायदा मिळेल. खेरीज जयप्रकाशांचे आशीर्वाद आणि त्याचे स्वत.चे सत्तास्थान या त्यांना अनुकूल असलेल्या अन्य दोन गोष्टी आहेत. या निवडणुकीबद्दल देशाच्या सर्व भागात दांडगी उत्सुकता आहे. □




लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर
श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा............



# । मॅक्झिम गॉर्की ।

## । सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**